CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, ४ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २०६ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही






# विराट कोहलीची स्वप्नपूर्ती; 'बंगळुरू' आयपीएलचा नवा चॅम्पियन

## ● आरसीबीने १८ वर्षांनी ट्रॉफीवर कोरले नाव



**अहमदाबाद, दि. ३ जून-**

शेवटच्या क्षणांपर्यंत रंगलेल्या थरारक सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने आयपीएल २०२५चे विजेतेपद पटकावत इतिहास रचला आहे. १८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आरसीबीचं नाव आयपीएलच्या विजेत्यांच्या ट्रॉफीवर कोरलं गेलं. विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली अनेक अपयश पाहिलेल्या या संघाने रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदाच ट्रॉफी जिंकली.

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्ज यंदा पहिल्यांदाच फायनलमध्ये पोहोचून विजेतेपदाच्या खूप जवळ आला होता. मात्र अंतिम क्षणी आरसीबीने केलेल्या उत्कृष्ट खेळीने पंजाबचं स्वप्न भंगलं. विराट कोहलीसाठी हा क्षण अत्यंत भावनिक ठरला. आयपीएलमध्ये अनेक वैयक्तिक विक्रम गाठणाऱ्या या दिग्गज खेळाडूचं संघाला चॅम्पियन बनवण्याचं स्वप्न अखेर पूर्ण झालं. कोहलीच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या आरसीबीने याआधी अनेकदा प्लेऑफ आणि फायनल गाठल्या होत्या. परंतु ही ट्रॉफी नेहमी हुलकावणी देत होती. यंदा मात्र, रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली संघाने समतोल कामगिरी करत अखेरच्या क्षणी बाजी मारली.

## विचारपुष्प



निःआपला संघ परमेश्वराच्या कृपादृष्टीला सदैव पात्र झाला आहे व होत राहील असा माझा पूर्ण विश्वास आहे. कारण आपल्या अंत:करणातील भावना परमेश्वराला कळतात. आपले अंत:करण पवित्र आणि शुद्ध आहे. त्यात पापाचा अंशदेखील नाही.

**- डॉ. केशव बळीराम हेडगेवार**
रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगही स्वतंत्रपणे कार्यरत राहणार

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

◆ **मुंबई, ३ जून**

केंद्र सरकारच्या अनुसूचित आयोगाच्या धर्तीवर राज्य सरकारने आदिवासी समाजासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या आयोगाला तसेच आयोगासाठी पदनिर्मिती, जागा व अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.

केंद्रीय स्तरावर देशात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग आहेत. या दोन्ही आयोगांशी निगडीत विषय वेगेवगळे आहेत. त्यामुळे दोन स्वतंत्र आयोग



असणे आवश्यक असल्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. ५१ व्या जनजाती सल्लागार परिषदेत महाराष्ट्रात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार हा आयोग स्थापन करण्यात आला आहे. या आयोगाची रचना राज्य अनुसूचित जाती आयोगप्रमाणेच एक अध्यक्ष व चार अशासकीय सदस्य अशी राहील.

आयोगाकरिता नव्याने २६ पदे निर्माण करण्यात येणार आहेत. या पदांसाठीचे तसेच आयोगाचे सदस्य यांचे वेतन, भत्ते आणि कार्यालयासाठी भाडे तत्त्वावर जागा, फर्निचर, वीज, दूरध्वनी, इंधन यासह अनुषंगिक खर्चासाठी ४.२० कोटी रुपयांच्या तरतुदीस बैठकीत मान्यता देण्यात आली. दरम्यान, अनुसूचित जाती आयोगही स्वतंत्रपणे कार्यरत राहणार आहे. या दोन्ही आयोगांना वैधानिक दर्जा मिळावा यासाठी मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता दिली. त्यासाठीही आगामी काळात कार्यवाही करण्यात येणार आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

### अमरावती, बल्लारपुरातील ईएसआयसी रुग्णालयांसाठी जमीन

छ. संभाजीनगर येथे राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयासाठी १५ एकर जमीन देण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

यासह बिबवेवाडी (पुणे), अहल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर (चंद्रपूर), सिन्नर (नाशिक), बारामती (पुणे), सातारा आणि पनवेल (रायगड) येथील प्रस्तावित रुग्णालयांसाठीही शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. छ. संभाजीनगर शहरातील औद्योगिक विस्तार आणि वाढत्या कामगारवर्गाच्या आरोग्य गरजांचा विचार करून कर्मचारी राज्य विमा निगमचे २०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. यासाठी मौजे करोडी येथील १५ एकर गायरान जमीन देण्यास आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ■

# परराज्यात जाणाऱ्या शेतमालाचा खर्च केंद्राकडे

## कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांची माहिती



◆ **पुणे, ३ जून**

नोंदणीकृत सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतमाल विक्रीसाठी परराज्यात पाठविल्यास यापुढे वाहतुकीचा खर्च केंद्र सरकार करणार आहे. यासंदर्भातील निर्णय मागील आठवड्यात केंद्राने घेतला असल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मंगळवारी दिली.

विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव उपबाजार केंद्रात पदयात्रा आणि कृषी विज्ञान केंद्र येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, केंद्रीय कृषी विभागाचे सहसचिव फ्रॅक्लीन खोंडग, कृषी आयुक्त सूरज मांढरे उपस्थित होते. चौहान म्हणाले, विविध भागांत मागणीनुसार शेतीचे उत्पादन घेण्यात यावे यासाठी केंद्र सरकार राज्यांसोबत काम करीत आहे. सहकारी संस्थेच्या माध्यमातून शेतमाला परराज्यात विक्रीसाठी नेल्यास वाहतुकीचा सर्व खर्च सरकार करणार आहे. ही माहिती कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावी. ◂*(वृत्तसंस्था)*

### शेतकऱ्यांशी थेट संवाद साधा

केंद्राच्या कृषी विभागांतर्गत १६ हजार शास्त्रज्ञ असले तरी कर्मचारी, अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी शेतकरी मेळावा अभियान सुरू करण्यात आले. ओडिशा येथून अभियानाला सुरुवात झाली त्यानंतर हरयाणा, उत्तरप्रदेश, बिहार येथून आता महाराष्ट्रात मेळावा पार पडल्याचे चौहान म्हणाले. ■

## महत्त्वाचे

### अग्निवीरांना शासकीय नोकरीत २० टक्के आरक्षण

**लखनौ :** उत्तरप्रदेश सरकारने मंगळवारी राज्य पोलिस दल आणि इतर शासकीय नोकरीतील थेट भरतीत अग्निवीरांना २० टक्के आरक्षण आणि वयोमर्यादेत तीन वर्षांची सूट देण्याचा निर्णय घेतला. अग्निवीरांसाठी हा आजपर्यंतचा सर्वांत मोठा निर्णय आहे. या माध्यमातून त्यांना सेवा संपल्यानंतर राज्यात सरकारी नोकरीत सेवा देण्याची संधी मिळणार आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या अध्यक्षतेत मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. यावेळी अर्थमंत्री सुरेश कुमार खन्ना यांनी अग्निवीरांना शासकीय नोकरीत २० टक्के आरक्षण आणि वयोमर्यादेत तीन वर्षांची सूट देण्याचा प्रस्ताव मांडला, याला सर्वोनुमते मंजुरी देण्यात आली. बैठकीनंतर खन्ना म्हणाले, योगी मंत्रिमंडळाने माजी अग्निवीरांना राज्य पोलिस दलात, प्रशासकीय पदे आणि स्पर्धा परीक्षांमार्फत भरल्या जाणाऱ्या शासकीय पदभरतीत आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. कार्यकाळ पूर्ण केलेल्या अग्निवीरांना सेवेनंतर सरकारी सेवेत संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आले. सरकारने जाहीर केलेले आरक्षण खुला प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग अशा सर्व श्रेणींना लागू होणार आहे. सहा महिन्यांत प्रक्रिया सुरू खन्ना म्हणाले, अग्निवीरांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्यांसाठी आगामी सहा महिन्यांत शासकीय नोकरीत भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे आणि या योजनेंतर्गत पहिली तुकडी २०२६ मध्ये नियुक्त केली जाईल.

# पाकिस्तानला आठ तासांत गुडघे टेकण्यास भाग पाडले

## सीडीएस अनिल चौहान यांचे रोखठोक वक्तव्य

**पुणे, ३ जून**

१० मे रोजी मध्यरात्री एक वाजता त्यांचे (पाकिस्तानचे) लक्ष्य भारताला ४८ तासांत गुडघे टेकण्यास भाग पाडणे होते. अनेक हल्ले करण्यात आले आणि त्यांनी हा संघर्ष आणखी वाढवला. आम्ही त्यांना असे सणसणीत प्रत्युत्तर दिले की अवघ्या आठ तासांत पाकिस्तानलाच आमच्यासमोर गुडघे टेकणे भाग पडले, असे रोखठोक वक्तव्य चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल अनिल चौहान यांनी केले.

पुणे विद्यापीठात मंगळवारी आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. भविष्यातील युद्ध आणि युद्धकला हा त्यांच्या भाषणाचा विषय होता. आपल्या अतिशय अभ्यासपूर्ण आणि मार्मिक भाषणात सीडीएस चौहान यांनी ऑपरेशन सिंदूरचे विविध पैलू उलगडले. हे युद्ध केवळ स्ट्राईक नसून राजकारणाचा देखील भाग आहे हे ऑपरेशन सिंदूरमुळे सिद्ध झाले आहे, असेही त्यांनी सांगितले. 'ऑपरेशन सिंदूर'मागील कारणांबद्दल बोलताना सीडीएस जनरल अनिल चौहान म्हणाले, पहलगाममध्ये जे घडले ते अत्यंत क्रूर होते. पाकिस्तानकडून राज्य पुरस्कृत दहशतवाद थांबवणे



हा 'ऑपरेशन सिंदूर'मागचा उद्देश होता. भारत आता दहशतवाद आणि आण्विक ब्लॅकमलिंगच्या सावटाखाली मुळीच राहणार नाही. अपयश आणि तोट्याचा व्यावसायिक लष्करी दलांवर कोणताही परिणाम होत नाही, नुकसान महत्त्वाचे नाही, तर परिणाम महत्त्वाचे आहेत, या आपल्या वक्तव्याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

**पहलगाम दहशतवादी हल्ला**

हाच संघर्षाचा प्रारंभ बिंदू सीडीएस जनरल अनिल चौहान म्हणाले की या संघर्षाचा प्रारंभ बिंदू पहलगाम दहशतवादी हल्ला होता. दहशतवाद ही युद्धाची तर्कसंगत पद्धत आहे का? मला असे वाटत नाही. कारण दहशतवादाला कोणतेही स्पष्ट तर्क नाही. मात्र, भारताला हजारो जखमा देऊन रक्तपात करण्याचा निर्णय आमच्या शत्रूने घेतला आहे. १९६५ मध्ये, झुल्फिकार अली भुट्टो यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेला संबोधित करताना भारताविरुद्ध एक हजार वर्षे युद्ध लढण्याच्या वल्गना केल्या होत्या.

# एसटी कर्मचाऱ्यांना जूनपासून ५३ टक्के महागाई भत्ता

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई, ३ जून**

राज्यातील राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना मुळ वेतनावर जून २०२५ पासून ४६ टक्के ऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे केली.

महामंडळातील कर्मचाऱ्यांना महात्मा फुले जनआरोग्य योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक निवडण्याचा पर्याय, एक कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच लागू करण्याचा तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास पास नऊ ऐवजी १२ महिन्यासाठी देण्याचा निर्णयही उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. सह्याद्री अतिथीगृह येथे एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनीधींची बैठक झाली.



यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सदाभाऊ खोत, माजी खासदार आनंदराव अडसुळ, कॅप्टन अभिजित अडसूळ, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महामंडळाचे उपाध्यक्ष माधव कुसेकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. सामान्यांसाठी जीवनवाहिनी असलेल्या एसटीच्या बससेवेच्या माध्यमातून लोकांना अपेक्षित अशी चांगली सेवा मिळाली पाहिजे. बसगाड्या सोबतच बसस्थानके देखील स्वच्छ असली पाहिजे. स्वच्छतागृह, विश्राम कक्ष यांच्या स्वच्छतेसाठी प्राधान्य दिले पाहिजे. एसटीच्या माध्यमातून कार्गो सेवा सुरू करण्यावर भर देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

# महिलेचा व्हिडीओ शुटींग करून विनयभंग

## ● ॲमेझॉन डिलीव्हरी बॉयविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जून -**

महिलेचे व्हिडीओ शुटींग करून तिचा विनयभंग करणाऱ्या ॲमेझॉन डिलीव्हरी बॉयविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन ॲमेझॉन डिलीव्हरी बॉय सर्फराज अल्लाउद्दीन नदाफ (रा. साईनाथ नगर भाग ३, अमन चौकाजवळ, मजरेवाडी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील महिलेच्या मोबाईल क्रमांकावर सर्फराज नदाफ याने २ मे रोजी दुपारी कॉल करून घराच्या बाहेर थांबून तुमचे ॲमेझॉनवरून पार्सल आले आहे, मी तुमच्या घराच्या बाहेर थांबलो आहे असे सांगितले. त्यामुळे पिडीता या घरातून बाहेर आल्या व पार्सल घेतले. ॲमेझॉन डिलीव्हरी बॉय सर्फराज याने आपल्या मोबाईलमध्ये पिडीत महिलेचे व्हिडीओ शुटींग केल्याबाबत पिडीतेला संशय आल्याने पिडीतेने सर्फराज नदाफ याचा मोबाईल चेक करण्यासाठी घेतला. त्यावेळी सर्फराज नदाफ याने पिडीतेला शिवीगाळ करून धमकी दिली व पिडीतेचा हात पकडून ओढून घेऊन तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून पिडीतेचा विनयभंग केला.

या दरम्यान पिडीतेने आरडा ओरड केल्याने परिसरातील लोक तसेच गोरक्षक सुधीर बहिरवाडी, पंकज काटकर यांनी घटनास्थळी धाव घेत सर्फराज नदाफ याला पकडून विजापूर नाका पोलिस ठाण्यात आणले. पोलिस ठाण्यात पिडीतेच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक रिया बोधे पुढील तपास करीत आहेत.


شولاپور سوشل اسوسی ایشن، سولاپور۔

सोलापूर सोशल असोसिएशन, सोलापूर.

तरक़्क़ीयों की दौड में उसी का ज़ोर चल गया।
बना के अपना रास्ता जो भीड से निकल गया।
ज़रा सी देर के लिए मैं आ गया था अब्र में।
उधर ये शोर मच गया के आफताब ढल गया।।



कै. डॉ. एम. एन. वडवान
संस्थापक अध्यक्ष



सोलापूर सोशल असोसिएशन च्या अध्यक्षपदी
डॉ. अखलाक अहमद वडवान
यांची नियुक्ती व कार्यकारी मंडळास धर्मादाय उपायुक्त सोलापूर यांनी मान्यता दिल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन

grafitech art

* एस.एस.ए. उर्दू प्रायमरी स्कूल, सोलापूर.
* एस.एस.ए. ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर. (डी.एड.)
* एस.एस.ए. उर्दू हायस्कूल अॅन्ड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स,सोलापूर.
* एस.एस.ए. न्यु इंग्लिश मेडियम स्कूल, सोलापूर.
* एस.एस.ए. कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर. (बी.एड.)
* सुशिलकुमार शिंदे एस.एस.ए. उर्दू प्रायमरी स्कूल, विडी घरकूल, सोलापूर.
* एस.एस.ए. आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर.
* सुशिलकुमार शिंदे एस.एस.ए. उर्दू हायस्कूल, विडी घरकूल, सोलापूर.

# वैष्णवी हगवणे प्रकरण सीआयडीकडे वर्ग करा

**मुंबई, दि. ३ जून-**

वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरण तसेच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष अशा अनेक मुद्यांवरून महाविकास आघाडीच्या महिला शिष्टमंडळाने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांची भेट घेतली. यावेळी वैष्णवी हगवणे प्रकरण हे सीआयडीकडे वर्ग करण्यात यावे तसेच, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर असलेल्या चाकणकरांना पदावरून दूर करून, २४ तास वेळ देईल, अशा महिलेची निवड करण्यात यावी, अशा मागण्या महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने यावेळी केल्या. रोहिणी खडसे, सुषमा अंधारे, किशोरी पेडणेकर, विद्या चव्हाण, ज्योती गायकवाड यांचा या शिष्टमंडळात समावेश होता. राज्यपालांच्या भेटीनंतर रोहिणी खडसे माध्यमांशी संवाद साधताना म्हणाल्या की, राज्यपालांचे मी मनापासून आभार व्यक्त करेन की, त्यांनी आम्हाला भरपूर वेळ दिला. आमच्या मागण्या त्यांनी ऐकून घेतल्या तसेच योग्य



निर्णय घेण्याबाबत आश्वासन दिले आहे. महिला आयोगाने पक्षपातीपणा केला आहे, असे आम्ही आम्ही राज्यपालांच्या निदर्शनात आणून दिले आहे. पूर्णवेळ जी महिला आयोगाला अध्यक्ष म्हणून वेळ देऊ शकेल अशा व्यक्तीची तिथे निवड करण्यात यावी, अशी मागणी आम्ही यावेळी त्यांच्याकडे केल्याची माहिती त्यांनी दिली. वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण हे सीआयडीकडे वर्ग करावे, अशी मागणीदेखील यावेळी केल्याचे त्यांनी सांगितले.

# 'ऑपरेशन सिंदूर'च्या मुद्यावर संसदेचे विशेष अधिवेशन बोलवा

## इंडिया आघाडीतील १६ पक्षांचे पंतप्रधान मोदी यांना पत्र

**नवी दिल्ली, ३ जून-**

पहलगाम येथील अतिरेकी हल्ला, ऑपरेशन सिंदूर तसेच भारत पाकिस्तान संघर्षात अमेरिकेने केलेली मध्यस्थी या मुद्यांवर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी इंडिया आघाडीतील १६ राजकीय पक्षांनी सोवारी केली. इंडिया आघाडीतील १६ पक्षांची बैठक आज राजधानी दिल्लीतील कॉन्स्टिट्युशन क्लब मध्ये झाली. या बैठकीत ऑपरेशन सिंदूरनंतर उद्भवलेल्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तशा आशयाचे पत्रही पाठवण्यात आले. या पत्रावर बैठकीला उपस्थित १६ राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या बैठकीला काँग्रेस,




तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, नॅशनल कॉन्फरन्स, माकप, भाकप, शिवसेना उबाठा, इंडियन युनियन मुस्लिम लीग, केरळ काँग्रेस, आरएसपी, एमडीएमके, व्हीसीके आणि भाकपा (माले) या पक्षांचे नेते उपस्थित होते. बैठकीनंतर आयोजित संयुक्त पत्रपरिषदेत तृणमूल काँग्रेसचे नेते डेरेक ओ ब्रायन म्हणाले की, पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर उद्भवलेल्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी बैठकीला उपस्थित १६ राजकीय पक्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून केली आहे. पुंछ, उरी आणि राजौरी येथील अतिरेकी हल्ल्याबाबतही संसदेत स्वतंत्रपणे चर्चा करण्याची मागणी या पत्रातून करण्यात आली आहे. सरकार संसदेला उत्तरदायी आहे, आणि संसद जनतेला उत्तरदायी आहे, त्यामुळे संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यामची मागणी आम्ही केली आहे, असे ब्रायन म्हणाले. या पत्रपरिषदेला काँग्रेसचे दीपेंदर हुडा, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव, राजदचे मनोजकुमार झा तसेच शिवसेना उबाठाचे संजय राऊत यांनीही संबोधित केले.

### पंतप्रधान मोदींना पाठवलेल्या पत्रावर आप, राष्ट्रवादीच्या सह्या नाहीत

इंडिया आघाडीच्या राजधानी दिल्लीत झालेल्या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि द्रमुक या पक्षांचे नेते उपस्थित नव्हते. त्यामुळे इंडिया आघाडीत फूट पडल्याचे मानले जात आहे. विशेष म्हणजे, पंतप्रधान मोदी यांना पाठवलेल्या पत्रावर राष्ट्रवादी काँग्रेस आणि आपच्या नेत्यांनी स्वाक्षऱ्या केल्या नाहीत. दिल्लीतील विधानसभा निवडणुकीपासून आप आणि काँग्रेस यांच्या संबंधात तणाव निर्माण झाला आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीतील आपच्या पराभवाला काँग्रेस जबाबदार असल्याचा आपचा आरोप आहे. आपचा राग काँग्रेसवर आहे, त्यामुळे ज्या बैठकीत काँग्रेस हजर असेल, त्या बैठकीत आप सहभागी होणार नाही, असे आपने सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे परदेश दौऱ्यावर आहेत, त्यामुळे त्या बैठकीला उपस्थित नव्हत्या. शरद पवार आज दिल्लीत नसल्यामुळे ते या बैठकीला उपस्थित नव्हते.

# डॉ. अखलाक वडवान हेच संस्थेचे कायदेशीर अध्यक्ष

## बोगस बदल अहवाल दाखल करून दिशाभूल केल्याप्रकरणी अल्ताफ जमादार विरुद्ध फौजदारी गुन्हा

### धर्मादाय उपआयुक्तांचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जून-**

सोलापूर सोशल असोसिएशन या संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या वादात डॉ. अखलाक अहमद वडवान यांच्या अध्यक्षीय नेतृत्वाखालील विश्वस्त मंडळास धर्मादाय उपआयुक्त प्रवीण कुंभोजकर यांनी मंजुरी दिली.

डॉ. वडवान यांची निवड २०१२च्या निवडणुकीत १७ विश्वस्तांसह झाली. या निवडणुकीत इस्माईल जमादार हे देखील सचिवपदी निवडून आले होते. त्यांनी बदल अहवाल दाखल केला होता. दरम्यानच्या काळात डॉ. महमदअली वडवान यांचे निधन झाले. जमादार यांनी दाखल केलेला बदल अहवाल हा खोटा आणि चुकीचा असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. दरम्यानच्या काळात जमादार हे मयत झाले. यातील हरकतदार सलीम सुभान शेख यांनी सभासदत्वाचा राजीनामा दिला होता. परंतु याचे कोणतेही पुरावे उपलब्ध नव्हते. त्यामुळे शेख यांनी राजीनामा दिला नसल्याची भूमिका कोर्टात घेतली होती. याची अंतिम सुनावणी झाल्यानंतर शेख यांचा मूळ राजीनामा हा डॉ. वडवान यांच्याकडे मिळाला. तो कोर्टात सादर करण्यात आला. मात्र हा दस्त दाखल झाल्यानंतर शेख यांनी तो नाकारला नाही.

दरम्यान, फारुक कमिशनर यांनी स्वतःची सचिवपदी निवड झाल्याचे दर्शविणारा बदल अहवाल दाखल केला. त्यात इस्माईल जमादार आणि शेख हेदेखील निवडून आल्याचे दर्शविले. डॉ. वडवान यांच्या बदल अहवालास अर्जदार अल्ताफ जमादार, सलीम शेख आणि फारुक कमिशनर यांनी हरकती घेतल्या आणि हा बदल अहवाल नामंजूर करण्याची विनंती कोर्टाकडे केली होती. यात डॉ. अखलाक, सईद वडवान, सलीम शेख, फारुक कमिशनर आणि अल्ताफ जमादार यांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेऊन डॉ. अखलाक यांची अध्यक्षपदी झालेली निवड ही कायदेशीर असल्याचा निर्वाळा देऊन बदल अहवाल मंजूर करण्यात आला. त्याचबरोबर खोटी कागदपत्रे सादर करणे, खोटा जबाब नोंदविणे अशा कृत्याखाली अल्ताफ जमादार यांच्याविरुध्द फौजदारी दाखल करण्याचे आदेश देखील धर्मादाय उपआयुक्त यांनी दिले आहेत. यात वडवान यांच्यातर्फे अ‍ॅड. नितीन हबीब, अ‍ॅड. रमेश रोडगी, अ‍ॅड. रोहित हबीब, अ‍ॅड. अमरनाथ हबीब यांनी तर जमादार आणि कमिशनर यांच्यातर्फे अ‍ॅड. एस. आर. मुंढे यांनी काम पाहिले.



### माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यातर्फे सत्कार

डॉ. अखलाक वडवान यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी त्यांचा सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी हाजी दाऊद मंगलगिरी, इम्तियाज शेख, अशपाक सातखेड, माजी मुख्याध्यापक जब्बार शेख, मुख्याध्यापक डॉ. आसिफ इक्बाल काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, अल्पसंख्याक शहराध्यक्ष जुबेर कुरेशी आदी उपस्थित होते.

# महिला आयोगाने भविष्यातील दिशा, कार्यपद्धतीचे नियोजन करण्याची गरज : डॉ. नीलम गोऱ्हे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ जून -**

महिलांच्या प्रश्नात संवेदनशील राहून महिलांचे संरक्षण, महिला सबलीकरण या बरोबरच पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने गेल्या २०- २५ वर्षापासून काम करत आहे. या पुढील काळातही भविष्यातील दिशा, कार्यपद्धती व धोरणात्मक नियोजनाच्या दृष्टीने राज्य महिला आयोगाने ''स्टॅटेजिक प्लॅनिंग'' करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मंगळवारी केले.

महाराष्ट्र विधिमंडळाचे उपसभापती कार्यालय व राज्य महिला आयोगाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या कार्यपद्धती व कार्यक्षमतेबाबत संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या संवाद कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, भाजपाच्या महिला प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ, प्रज्ञा सातव, महिला व बाल विकास विभागाचे उपयुक्त राहुल मोरे, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया, आयोग माजी अध्यक्ष सुशीबेन शहा, निर्मला सामंत प्रभावळकर, राजलक्ष्मी भोसले, नीता केळकर, उत्कर्षा रूपवते, मुमताज शेख, यांनी सहभाग घेत आपले विचार मांडले.



उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या,आयोगाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी यंत्रणा बळकट कराव्या लागतील. यामध्ये सामाजिक संस्थांचा सहभाग, कायदे सल्लागार यांच्या सेवाही घेणे गरजेचे आहे. अत्याचार प्रकरणातील दोषसिद्धीचे प्रमाणाबाबत महिला आयोग, गृहविभाग, महिला व बालकल्याण विभाग आणि न्याय विभाग यांच्यातील एकत्रित बैठक घेण्याबाबत त्यांनी सूचित केले .

यावेळी संगीता चव्हाण, कला शिंदे, प्रतिभा जगताप, सारिका पवार, सुनीता मोरे, कोयना विटेकर, नीरजा भटनागर, सुदर्शना त्रिगुणाईत, संगीता खोदना, वर्षा मोरे, उपस्थित होते.

### मनोधैर्य योजनेची व्याप्ती वाढवणार : आदिती तटकरे

यावेळी मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, वन स्टॉप सेंटर्स योजना केंद्र शासनाच्या नव्या नियमावलीनुसार ही केंद्रे राज्य शासनाने चालवण्याची आहेत. या अगोदर ही केंद्रे चालविण्याची जबाबदारी एनजीओकडे होती. शासन ही केंद्रे चालवणार असल्याने वन स्टॉप सेंटर्सची संख्या वाढविण्यात येणार आहे. तसेच मनोधैर्य योजनेचीही व्याप्ती वाढविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. त्या म्हणाल्या १५० सामाजिक संस्था आयोगासोबत काम करत आहे. आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन महिलांच्या प्रश्नांना न्याय देण्याची भूमिका आयोग सातत्याने करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर पूर्ण वेळ काम करणारी व्यक्ती हवी

### महिला नेत्यांचे राज्यपालांना साकडे

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई दि. ३ जून -**

राज्यात महिला वरील अत्याचारांच्या घटना सातत्याने वाढ होत आहेत. त्यांना न्याय देण्यासाठी राज्य महिला आयोगावर अध्यक्ष म्हणून पूर्णवेळ काम करणारी व्यक्ती नेमावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या महिला नेत्यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे मंगळवारी केली. विद्यमान अध्यक्षा रुपाली चाकणकर या राजकीय कामात व्यस्त असल्याने त्या या पदाला न्याय देऊ शकत नाही, असा आक्षेप त्यांनी घेतला आहे.



पुण्यातील वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवावा, महिला वरील वाढत्या अत्याचाराच्या घटना, राज्य महिला आयोगाचा कारभार, रिक्त पदे, आदी मुद्यांवरून महाविकास आघाडीच्या महिला शिष्टमंडळाने राज्यपाल यांची भेट घेतली. त्यामध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील महिला अध्यक्षा रोहिणी खडसे, ,काँग्रेसच्या आ. ज्योती गायकवाड किशोरी पेडणेकर, विद्या चव्हाण आदींचा या शिष्टमंडळात समावेश होता. यावेळी वैष्णवी हगवणे प्रकरण आरोपीचे मामा व आयपीएस अधिकारी जालिंदर सुपेकर, त्यांचे मेहुणे पोलीस निरीक्षक चव्हाण यांच्या मालमत्तेची चौकशी करावी, या गुन्ह्याचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात यावा. तसेच, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी २४ तास वेळ देईल, अशा महिलेची निवड करण्यात यावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने केली आहे. राज्यपालांच्या भेटीनंतर रोहिणी खडसे साधताना म्हणाल्या की, '' महिला आयोगाने पक्षपाती काम केलेले आहे. अशा अनेक गोष्टी आम्ही राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये हुंडाबळी असेल किंवा महिला अत्याचाराच्या घटना त्यांना महिला आयोगाकडे तक्रारी नोंदवण्यास अडचण येत आहे. बदलापूरच्या घटनेमध्ये बघितले की एका लहान मुलीवर अत्याचार झाला. त्यांची तक्रारही आंदोलन झाल्यानंतर घेण्यात आली. जर राजकीय दबाव असेल तर त्या तक्रारी घेतल्या जात नाहीत. त्यांच्याचकडून दिरंगाई होते.''

### चाकणकर काय रश्मिका आहेत का?

राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी आपल्यावर टीका केल्याने विरोधकांना प्रसिद्धी मिळते अशी टीका केली होती, त्याला शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, त्या काय आहेत, रश्मिका की स्मृती इराणी आहेत?, आमचा मुद्दा हा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदाच्या कामाबद्दल आहे. ज्यांना सुमोटो काय असते हे माहित नाही,कायदेशीर बाबी माहीत नाहीत त्यांना आम्ही मी जमेत धरत नाही.

# संसदीय लोकाभिमुख सुवर्ण कारभाराची वर्षपूर्ती

**रस्ते वीज पाणी रेल्वे आणि विविध सामाजिक प्रश्नांना हात घालत खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी आपली पहिली एक वर्षाची कारकीर्द संसदीय लोकाभिमुख सुवर्णकारभाराने नटवली असून असंख्य प्रश्न सोडवताना अनेक प्रश्न पूर्णत्वाच्या मार्गावर नेऊन ठेवले आहेत. त्यांचा ३६५ दिवसाचा कार्यकाल पाहता सर्वसामान्य लोकांचे सर्वांगीण हित डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आपली ही वर्षपूर्ती केल्याचे स्पष्ट दिसते.न भूतो न भविष्यती असा वर्षभराचा काळ त्यांनी तेजोमय करून लोकांमध्ये एक नवा विश्वास निर्माण केला आहे त्यामुळे पुढील काळ माढा लोकसभा मतदारसंघात दैदिप्यमान कामगिरीने उजळलेला दिसणार आहे.**







लोकशाहीमध्ये लोकांना मोलाचे स्थान असते आणि लोकांच्या मनातील उमेदवार पुढे जाऊन लोकांच्या हिताचे काम करत असतो. खा.धैर्यशील मोहिते पाटील हे देखील लोकांनी निवडलेले आणि लोकांनी संसदेत पाठवलेले असामान्य नेतृत्व आहे. गतकाळात झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये अनेक राजकीय उलथापालथी पाहायला मिळाल्या. तन-मन-धनाने पक्षासाठी काम करणाऱ्या खा.धैर्यशील मोहिते पाटील यांना उमेदवारी देताना डावलले आणि लोक भावनेचा उद्रेक झाला. राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षातून त्यांनी निवडणूक लढवावी असा आग्रह पुढे आला आणि त्यांनाही जनरेट्यापुढे लोकभावनेचा आदर राखावा लागला. राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाने मात्र याच जनभावना जाणल्या आणि धैर्यशील मोहिते पाटील यांना रणमैदानात उतरवले. दरम्यान लोकांच्या आग्रहास्तव दिनांक ११ एप्रिल २०२४ रोजी भाजपातील पदाचा त्यांनी राजीनामा वरिष्ठांकडे सुपूर्द केला. १४ एप्रिल २०२४ रोजी स्वतः शरद पवार यांनी शिवरत्न वर येऊन चर्चा केली आणि सायंकाळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात त्यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश केला.जन इच्छेला त्यांनी मोकळी वाट करून दिली.दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजी कुठलेही शक्ती प्रदर्शन न करता शिस्तीचे प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर सुद्धा अनेक शॉकिंग घटना घडत गेल्या मागील ९०च्या दशकापासून राजकीय शत्रू असणारे उत्तमराव जानकर यांनी देखील त्यांना पाठिंबा दिला. या काळात मोहिते पाटील यांना खिंडीत पकडण्याचे अनेक प्रयोग विरोधकांकडून या निवडणुकीत झाले भूतकाळातील त्यांच्यावर असणाऱ्या गुन्ह्यांना उजाळा देऊन दहशतवाद दबावाचे राजकारण गुंडगिरी असा अपप्रचार करण्यात आला. चारही बाजूने धैर्यशील मोहिते पाटील यांना घेरण्याचा प्रयत्न झाला. सत्यानाश होईल पर्यंत वरिष्ठ नेत्यांची भाषणे गेली. पण धैर्याने आणि शांततेने पुढे जात माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने धैर्यशील मोहिते पाटील हे अशा काळात सुद्धा डगमगलेले दिसले नाहीत.७ मे २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली आणि तदनंतर सुद्धा आडवा आडवीचे धोरण मात्र वरिष्ठ पातळीवरील काही कूटनीती करणाऱ्या नेत्यांनी सोडले नाही. गळतीच्या नावाखाली पाणी अडवण्यात आले. अकलूजला कृत्रिम पाणीटंचाई निर्माण करण्यात आली पण अशा संकटांना भेदण्यात आले. दिनांक ४ जून २०२४ रोजी निकाल लागला. सव्वा लाख मताधिक्क्याने धैर्यशील मोहिते पाटलांचा विजय झाला. झिमझिम पाऊस आणि त्यात आपल्या हक्काचा माणूस निवडून आल्याचा आनंद लोकांचा उर भरून टाकणारा होता. अनेकांच्या डोळ्यात पावसात न दिसणारी आनंदाची अश्रूफुले वाहताना दिसत होती.आनंद गगनाला मावेनासा झाला होता. गुलालाने भरलेल्या जेसीबी ने रस्ते फुल झाले होते तर रात्रीच्या उडणाऱ्या तोफांनी अवकाशाला रंगीबेरंगी करून टाकले होते. म्हणूनच ही ४ जून तारीख स्वाभिमानाची, अभिमानाची आणि आपल्या अस्तित्वाची होती म्हणून कधीही विसरता येणार नाही.

आज या संसदीय कारभाराची वर्षपूर्ती झाली असली तरी लोकांच्या भावनांना त्याच पद्धतीने खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी न्याय दिलेला दिसतो आहे. वर्षभरात झालेल्या ठळक घडामोडी मध्ये मल्टी मॉडेल कार्गो टर्मिनल व किसान रेल्वे पुन्हा सुरू करावी, शेतकऱ्यांना जीएसटीचा परतावा मिळावा, हुतात्मा एक्सप्रेसला दोन जनरल बोग्या, केळी निर्यात क्षेत्रात समावेश करण्याची मागणी, सातत्याने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी संपर्कात राहून व भेटीगाठी घेऊन मतदार संघातील रस्त्यांचे प्रश्न सोडवण्याला प्राधान्य, नवोद्योजक घडवण्यासाठी प्रयत्न, प्रकल्पग्रस्त व गावठाणा संदर्भातील प्रश्नांचा पाठपुरावा, कुर्डूवाडी येथील रेल्वे जंक्शन व वर्कशॉपच्या प्रश्नासंदर्भात सातत्याने सोडवण्यासाठी प्रयत्न, एफएम केंद्र सुरू करण्याची मागणी, पंढरपूर देहू दरम्यान रेल्वे सुरू करण्याची मागणी, चौंडी येथे मंत्रिमंडळाची बैठक घ्यावी यासाठी पाठपुरावा, जल नियोजनासाठी सातत्याने केंद्रात आणि राज्यात बैठका घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न, महिला महाराष्ट्र केसरीची मागणी, अनेकांना रेशन धान्य मिळत नसल्याच्या तक्रारी आल्यानंतर इष्टांकात वाढ करण्याची मागणी, आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची मागणी, सांगोला येथील वासुद ते सूतगिरणी जाणाऱ्या रेल्वे पुलाच्या खाली भुयारी मार्गावरील पाणी साचत होते त्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देत तो प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न, नवीन प्राथमिक आरोग्यांना मंजुरी मिळवण्यासाठी प्रयत्नशील, दिल्ली येथील महत्त्वाच्या बैठकांना उपस्थित राहत मतदार संघातील अनेक प्रश्नांना चव्हाट्यावर आणून तो सोडण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न ते करताना दिसत आहेत. महामार्ग संदर्भात लोकांच्या तक्रारी आल्यानंतर प्रत्यक्ष रस्त्यावर जाऊन थेटपणे अधिकार्यांना सूचना दिल्या, कॅनॉल फुटल्यानंतर त्या ठिकाणी भेटी देत तातडीने मदत करण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना, जिल्हा नियोजनाच्या बैठकीच्या माध्यमातून अनेक प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न, महाबोधी बौद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्याची मागणी, मराठा अधिवेशनात अतिशय अनमोल मार्गदर्शन, अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्तांना भेटी व तातडीने मदत देण्याची कारवाई करण्याच्या सूचना, फलटण पंढरपूर, जेऊर चौंडी आष्टी रेल्वे प्रकल्पासाठी राज्य शासनाने ५० टक्के हिस्सा देण्याची राज्य सरकारकडे मागणी,१९ मार्च २०२५ रोजी महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांची ग्रेट भेट आणि ३० मे २०२५ रोजी उपराष्ट्रपती महामहीम जगदीप धनकड यांची भेट असा हा वर्षभराचा दैदिप्यमान आणि थक्क करणारा प्रवास खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केला आहे. याशिवाय विविध सामाजिक प्रश्नांना न्याय देण्यासाठी त्यांनी आवाज उठवला. दिल्लीच्या संसदेत अनेक प्रश्न मांडून ते सोडवण्याच्या दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू असल्याचे दिसते.त्यामुळे या वर्षभराच्या काळात त्यांनी माढा लोकसभा मतदारसंघातील लोकांच्या भावनांना खऱ्या अर्थाने न्याय दिला असून पुढील चार वर्षात देखील त्यांची दैदीप्यमान कारकीर्द जनहितासाठी झालेली पहावयास मिळणार आहे. लोकांनीच मागणी करून दिल्लीत पाठवलेला एक खासदार म्हणून व आपल्या हक्काचा माणूस म्हणून खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी आपली ओळख जनसामान्यात ठळकपणे निर्माण केली आहे. वर्षभराच्या कारकीर्दनुसार त्यांनी लोकांच्या विश्वासाला सार्थ ठरवल्याचे स्पष्ट दिसते आहे. म्हणून त्यांचा वर्षभराचा काळ माढा लोकसभा मतदारसंघाला पुढे घेऊन जाणारा अनेक प्रश्नांचा निपटारा करणारा ठरलेला आहे.

**- डी. एस. गायकवाड**

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित




## उपमुख्यमंत्री शिंदेंची उद्या अक्कलकोटला जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ जून-**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची गुरूवारी अक्कलकोट येथे जाहीर सभा होणार असून यासभेत माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे हे शक्तिप्रदर्शन करीत हजारो कार्यकर्ता समवेत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश करणार आहेत. सुमारे ५० ते ६० हजार पदाधिकारी व कार्यकर्ते बसतील अशा भव्य मंडप उभारण्यात येत आहे.या बाबत माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे सह कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी तालुक्यात झंझावाती दौरा करून आढावा बैठक घेत तयारी करीत आहे



माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिवसेनेसोबत शिंदेंच्या सेना मध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. गुरुवार, ५ जून रोजी अक्कलकोट येथील मंगरूळे प्रशालेच्या शेजारच्या मैदानात पक्षप्रवेशाचा जाहीर कार्यक्रम होणार आहे.या सभेची जय्यत तयारी सुरू आहे. याचा आढावा शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे यांनी घेतला. गुरुवारी सकाळी साडेअकरा वाजता सिद्धाराम म्हेत्रे हे शिवसेनेत शक्ती प्रदर्शन करत जाहीर प्रवेश करणार आहेत. या कार्यक्रमाला मंत्री उदय सामंत, निलम गो-हे, प्रताप सरनाईक,संदीपान भुमरे, भरत गोगावले, संजय राठोड, संजय शिरसाट, अब्दुल सत्तार, मीनाताई कांबळे, सचिव राम रेपाळे, रवींद्र पंगेकर, ज्ञानराज चौगुले आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख महेश साठे, जिल्हा लोकसभा महिला संपर्कप्रमुख अनिता माळगे, प्रथमेश म्हेत्रे, रवीना राठोड, प्रियंका परांडे, संजय देशमुख, वैशाली हावनुर, स्वामीनाथ हेगडे, वर्षा म्हेत्रे, विश्वनाथ भरमशेट्टी, सरपंच व्यंकट मोरे, बाबासाहेब पाटील, शाकीर पटेल, अश्फाक आगसापुरे, काशिनाथ कुंभार, सोमनाथ चिखलंडे, विश्वनाथ हडलगी, सुनील इसापूरे, संजय चांभार, योगेश माळगे, गंगाबाई स्वामी आदीसह सभेच्या तयारीचा परिश्रम घेत आहे.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी करणारे जेरबंद

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूर मोहिमेदरम्यान लष्कराच्या हालचाली आणि सैन्य तळांची माहिती पाकिस्तानला देणाऱ्या दोन हेरांना पंजाब आणि राजस्थान पोलिसांनी मंगळवारी अटक केली. पंजाब पोलिसांना पकडलेल्या आरोपीचे नाव गगनदीपसिंग असून, तो तरणतारण जिल्ह्याचा रहिवासी आहे, तर राजस्थान पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव शकूर खान आहे. तो जैसलमेर येथे राहणारा आहे. आरोपींच्या ताब्यातून मोबाईल, सिमकार्ड, रोख आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली.

# कापणी झालेल्या पिकांच्या नुकसानीसाठी भरपाई देणार

## ● मुख्यमंत्र्यांचे निर्देश, मंत्रिमंडळ बैठकीत पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ जून-**

राज्यातील विविध भागात नुकत्याच झालेल्या पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचे मोठ्या प्रम णावर नुकसान झाले आहे. अशा प्रकारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत विचार केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी सांगितले.

राज्य मंत्रिमंडळाची सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली. त्याच्या सुरवातीला राज्यात झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला गेला. त्यावेळी विविध मंत्र्यांनी कापणी केलेल्या पिकांचे नुकसान झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी वरील प्रमाणे सांगितले. म दत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाव्दारे राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आणि मदतीची सादरीकरणाव्दारे माहिती दिली.त्यांनी सांगितले की, राज्य मंत्रिमंडळाच्या २७ मे रोजी झालेल्या बैठकीत घरांच्या पडझडींच्या दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करीता तातडीने मदतीकरीता निधी द्यावा अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. कोकण विभागास पाच कोटी, पुणे विभागास १२ कोटी, नाशिक विभागास पाच कोटी, छत्रपती संभाजी नगर विभागास १२ कोटी, अमरावती विभागास पाच कोटी आणि नागपूर विभागास दहा कोटी असे एकूण ४९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.



त्याचबरोबर खरीप २०२५ आणि यापुढील कालावधीकरिता केंद्र सरकार अथवा राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांच्या नुकसानीपोटी द्यावयाची भरपाई दर आणि निकष २७ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार देय राहतील. यामुळे एक जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना अधिक्रमित करण्यात आल्या आहेत, असे सोनिया सेठी यांनी सांगितले. यावेळी वन मंत्री गणेश नाईक आणि बंदरे विकास मंत्री निलेश राणे यांनी पावसामुळे सुकी मासळीचे नुकसान झाले आहे. त्यांनी मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली.

यावर मदत पुनर्वसन विभागाने यावर प्रस्ताव सादर करावा अशी सूचना फडणवीस यांनी केली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पावसामुळे रस्ते आणि छोट्या पुलांचे नुकसान झाले आहे. त्यांची दुरुस्ती केली जावी, असे सांगितले.

ग्राम विकास विभागाकडून ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्ती करण्यासाठी सूचना द्याव्यात अशी मागणी उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी केली. यावर गेल्या पंधरा दिवसांत ज्या भागात रेड अलर्ट घोषित केला होता तेथील रस्ते आणि पुल दुरुस्ती बाबत विचार केला जावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी उजनी धरणाच्या जलाशयात १४.५ टीएमसी पाणी साठा आहे. जायकवाडी धरणात २८ टीएमसी तर गोसीखुर्द धरणात ३.७२ टीएमसी पाणीसाठा असल्याचे त्यांनी सांगितले. पाणी टंचाईच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झाली आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत टँकरने पुरवठा करण्याच्या गावांच्या संख्येत दोनशेने तर टँकरच्या संख्येत ३३६ ने घट झाली आहे. छत्रपती संभाजी नगर आणि जालना या दोन जिल्ह्यांमध्ये टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे, असे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांनी सांगितले.

## शिवसेनेचे सर्व मंत्री अजित पवारांवर नाराज

### एकनाथ शिंदेंच्याकडे मांडली गाऱ्हाणी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३ जून-**

महायुती सरकारमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे समजल्या जाणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या सर्व मंत्र्यांनी पुन्हा एकदा दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर नाराजी दर्शविली आहे. सह्याद्री अतिथीगृहावर मंत्रीमंडळाची बैठक झाल्यानंतर शिंदे गटाच्या मंत्र्यांची स्वतंत्रपणे बैठक झाली यावेळी शिंदे प्रत्येकाशी 'वन टू वन' चर्चा करून प्रत्येक खात्याचा आढावा घेतला. यावेळी सर्वच मंत्र्यांनी अजित पवार यांच्याकडून निधी वाटप करण्यात हात अखडता घेत असल्याची नाराजी बोलून दाखवली आहे. शिंदे यांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून त्याबाबतचा प्रश्न सोडवला जाईल, असे त्यांना सांगितले आहे.

लवकरात लवकर कामे पूर्ण करा, फाइल पेंडिंग ठेऊ नका, अशा सूचना त्यांनी मंत्र्यांना केल्या. अनेक मंत्र्यांनी अजित पवार आमच्या विकास कामांवर खोडा घालत असल्याचे सांगत अर्थमंत्री जर आम्हाला पैसे देणार नसतील तर आम्ही काम कसं करणार? अशी चिंता व्यक्त केली आहे. सरकारमध्ये सर्वांना समान अधिकार मिळायला हवेत,अशी त्यांनी यावेळी मागणी केली.

**राज्यमंत्र्यांना हवेत अधिकार**

कॅबिनेट मंत्र्याकडून खात्याचे सर्व काम पाहिले जाते. राज्यमंत्री केवळ नावापुरतेच आहेत, नमस्कार आम्हालाही अधिकार दिले जावेत, अशी मागणी महायुती सरकारमधील राज्यमंत्र्यांनी आज मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

## अभिव्यक्ती स्वातंत्र्य धार्मिक भावना दुखावण्यासाठी नाही

### ● कलकत्ता उच्च न्यायालयाची टिप्पणी

**कोलकाता, ३ जून**

आम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, मात्र याचा अर्थ असा नाही की तुम्ही कोणाच्याही धार्मिक भावना दुखावू शकता, असे कोलकाता न्यायालयाने म्हटले. सोशल मीडिया इन्फ्लुएंझर शर्मिष्ठा पनोली हिच्या जामीन अर्जावर मंगळवारी कलकत्ता उच्च न्यायालयात सुनावणी झाली.

यावेळी न्यायालयाने उपरोक्त मत नोंदविले. एका व्हिडीओप्रकरणी शर्मिष्ठाला अटक करण्यात आली आहे. या व्हिडीओमध्ये तिने काही बॉलिवूड अभिनेत्यांवर ऑपरेशन सिंदूरवर मौन बाळगल्याबद्दल टीका केली होती. तथापि, हा व्हिडीओ नंतर तिने काढून टाकला होता. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ५ जून रोजी होणार आहे, ज्यामध्ये राज्य सरकार प्रतिज्ञापत्र दाखल करेल आणि पोलिस केस डायरी न्यायालया समोर सादर करतील.

**पोलिसांना अटक करण्याचा अधिकार**

जामीन अर्जावरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने शर्मिष्ठाच्या वकिलाला सांगितले की, हा व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आला होता आणि त्यामुळे एका विशिष्ट वर्गाच्या भावना दुखावल्या गेल्याचे ऐकायला मिळाले. यावेळी खंडपीठाने म्हटले की आम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, याचा अर्थ असा नाही की तुम्ही कोणाच्याही धार्मिक भावना दुखावू शकता. न्यायालयाने म्हटले की जरी शिक्षा सात वर्षांपेक्षा कमी असली, तरी पोलिसांना कोणालाही अटक करण्याचा पूर्ण अधिकार आहे. जर कथित गुन्ह्याची शिक्षा ७ वर्षांपेक्षा कमी असेल, तर याचा अर्थ असा नाही की पोलिस तुम्हाला अटक करू शकत नाहीत.

## 'बकर ईद'च्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी योग्य खबरदारी घ्यावी

### ● मुख्यमंत्र्यांचे अधिकाऱ्यांना आदेश; राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३ जून-**

आगामी बकर ईद सणानिमित्त मुंबईबरोबरच राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहाण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, सार्वजनिक शांतता व सामाजिक स्वास्थ बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कडक कारवाई करा, सर्व संबंधित विभागानी समन्वय ठेवून काम करावे, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिल्या.



इस्लाम धर्मात त्यागाचे प्रतीक समजली जाणारी ईद-उल-दुहा (बकर ईद) येत्या शनिवारी दि. ७ जून रोजी साजरी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख राखण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे लोकप्रतिनिधी व अति वरिष्ठ अधिकाऱ्यांची आढावा बैठक झाली. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, आम दार सर्वश्री अस्लम शेख, अबू आझमी, अमीन पटेल, रईस शेख, सना मलिक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इकबालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त देवेन भारती, संबंधित विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी लोकप्रतिनिधींनी काही संघटनांकडून जाणीवपूर्वक सामाजिक तेढ निर्माण करून अल्पसंख्यांक समाजाला घाबरविण्याचे प्रयत्न केले जात आहेत, त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य व शांततेला बाधा येऊ शकते, अशा घटकावर तातडीने कारवाई होण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात सण-उत्सव काळात कायदा सुव्यवस्था नेहमीच उत्तम राखली जाते. त्याचप्रमाणे बकर ईदसाठी देखील शासनाने योग्य नियोजन केले असून या काळात कायदा व सुव्यवस्था योग्य राखत सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, निर्माण करणे व कायदा मोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या घटकांवर कडक कारवाई करावी, असे आदेश दिले. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई पोलिसांनी ईदनिमित्त केलेल्या उपाययोजनांबाबत यावेळी माहिती देण्यात आली.

## धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी कुर्ला येथील मदर डेअरीची जमीन हस्तांतरण

### ▸▸ मंत्रिमंडळाची मंजुरी



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३ जून-**

बहूचर्चित धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तीमध्ये सुधारणांना मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या कुर्ला येथील मातृदुग्धशाळेची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी १४ जून २०२४ च्या शासन ज्ञापनानुसार प्रदान करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे नियोजन प्राधिकरण म्हणून ही जमीन काही अटी व शर्तींवर धारावी पुनर्विकास प्रकल्प- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आली आहे. हा प्रकल्प राबविणे अधिक सुलभ व्हावे यासाठी या ज्ञापनातील आणि जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या मसुदा करारनाम्यातील अटी व शर्ती गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाच्या धोरणाशी सुसंगत करण्यास मान्यता देण्यात आली. जेणेकरून धारावीतील रहिवाश्यांच्या पुनर्वसनासाठी जास्तीत जास्त घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत. धारावी पुनर्विकासात साडे आठ लाख कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे.

यापैकी पाच लाख पात्र कुटुंबाचे पुनवर्सन धारावी परिसरात पुनर्वसन होणार आहे. उर्वरित साडे तीन लाख कुटुंबांचे पुनवर्सन करण्यासाठी अधिकची जमीन गरजेचे आहे. कुर्ला येथील जमीन उपलब्ध झाल्याने आणखी काही कुटुंबांचे पुनर्वसन करणे सुलभ होणार आहे. आजच्या या निर्णयामुळे धारावीतील अपात्र नागरिकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार आहे. सर्वांसाठी घरे या धोरणाचे पालन करताना हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून, केवळ घरेच नाही, तर शाळा, रुग्णालये, शॉपिंग कॉम्प्लेक्स अशा इतरही नागरी सुविधांचे निर्माण सुलभ होणार आहे.

**मुंबईतील प्रवेशासाठी पथकराच्या सवलतीपोटी एमआयडीसीला भरपाई**

मुंबई शहरात प्रवेश करण्याच्या पाच पथकर नाक्यांवर हलकी वाहने, शालेय बसेस व राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस यांना पथकरातून सवलत दिल्याबद्दल राज्य रस्ते विकास महामंडळास भरपाई देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री फडणवीस होते. तसेच पथकर सवलतीचा कालावधी १७ सप्टेंबर २०२९ पर्यंत वाढविण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मुंबई प्रवेशद्वाराच्या सायन - पनवेल मार्गावर वाशी येथे, लाल बहादूर शास्त्री रस्त्यावर मुलुंड येथे, पूर्व द्रुतगती मार्गावर मुलुंड येथे, ऐरोली पुलाजवळ, पश्चिम द्रुतगती मार्गावर दहीसर येथील नाक्यांवर १४ ऑक्टोबर पासून पथकरातून सवलत देण्यात आली आहे. ही सवलत दिल्यामुळे एम.ई.पी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना या प्रकल्पासाठी करारनाम्यानुसार नुकसान भरपाई देण्याकरिता मुख्य सचिव यांच्या समितीने शिफारस केली आहे. तसेच पथकर वसुलीचा मुळ कालावधी १९ ऑक्टोबर, २०१० ते १८ नोव्हेंबर २०२६ होता.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# दहशतवादी 'घरां'ना हादरे...

सोमवार, २ जून २०२५ च्या पहाटे ४ वाजता महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (अ‍ॅण्टी टेररिझम स्क्वाड म्हणजेच 'एटीएस') २५० पेक्षा अधिक पोलिसांसमवेत भिवंडी, पडघा, बोरिवली परिसरात एकाचवेळी २२ घरांवर छापेमारी केली आणि १२ जणांना ताब्यात घेतले. स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) या भारत सरकारकडून बंदी घालण्यात आलेल्या संघटनेशी संबंधित साकिब नाचन व इतर संशयितांच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. साकिब नाचन हा पूर्वीपासूनस सिमीचा सदस्य होता. २००२ आणि २००३ मधील मुंबई रेल्वे साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात शिक्षा भोगलेला दहशतवादी आहे. तसेच २०१७ मध्ये आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना 'आयएसआयएस'शी संबंध असल्याच्या आरोपावरून संदर्भात अटक झालेला साकिब हा आयएसआयएसच्या महाराष्ट्र नेटवर्कचा 'अमीर-ए-हिंद' असण्याचा संशय आहे. त्याच्यासोबतच अकिब साकिब नाचन, अब्दुल लतिफ कासकर, कैफ नाचन आणि शाजिल नाचन यांच्यासह सिमीच्या माजी पदाधिकारी आणि सदस्यांची घरे या छापेमारीचे लक्ष्य होते. भारतातून पळून गेलेला उच्चविद्याविभूषित दहशतवादी डॉ. झाकिर नाईक याची ही पिलावळ असण्याची दाट शक्यता आहे. या कारवाईत झडती घेतल्या गेलेल्या २२ पैकी बहुतेक घरांमध्ये शस्त्रे, संशयास्पद डिजिटल साहित्य, दस्तावेज आणि दहशतवाद व कट्टरतावादाला उत्तेजन देणारी आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली आहेत. अतिशय धक्कादायक म्हणजे सध्या इस्रायलविरुद्ध जिहाद पुकारलेल्या 'हमास' या जगभरातील कुख्यात दहशतवादी संघटनेचे झेंडे या घरांमध्ये सापडले आहेत. ही कारवाई फक्त गुन्हेगारी विरोधातच नव्हे, तर संभाव्य भविष्यकालीन संकटांविरुद्ध प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून करण्यात आली आहे. पहलगामचा दहशतवादी हल्ला, अशा दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या काही स्थानिक देशविघातक शक्तींवर वेळीच प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आली आहे. देशाविरुद्ध संभाव्य कटकारस्थान तसेच देशाच्या एकता, अखंडता आणि सुरक्षेस संभाव्य धोक्यापासून तत्काळ दूर करणे हे कायदा आणि सुव्यवस्था अखंडित राखण्याकरिता अत्यावश्यक होते. साकिब नाचन हा २००२ व २००३ मधील मुंबईत झालेल्या आणि १२ जणांचा बळी घेणाऱ्या तीन बॉम्बस्फोटांसाठी जबाबदार होता. लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेच्या सहकाऱ्याने हे स्फोट घडवून आणल्याप्रकरणी तो दोषी आढळला होता. त्यात त्याला १० वर्षांची शिक्षा झाली आहे. त्यापूर्वी गुजरातमध्ये १९९१ च्या दहशतवादी हल्ल्यात साकिबला पहिल्यांदा अटक करण्यात आली होती. त्यात सुरुवातीला त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. ती नंतर सर्वोच्च न्यायालयाने १० वर्षे कमी केली. (हे असे कसे आणि का होत असावे?) सध्या साकिब हा केंद्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) ताब्यात आहे.

हा साकिब गेल्या अनेक वर्षांपासून पडघा या गावाला 'इस्लामिक राज्य' म्हणून घोषित करण्याच्या प्रयत्नात आहे. २०२३ मध्ये त्याला केंद्रीय तपास यंत्रणेने याच कारणावरून अटकही केली होती. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानने भारतात आपले 'स्लीपर सेल' सक्रिय केले आहेत. त्याच्याशी साकिब नाचनसह पडघा या गावातील इतरांचेही धागेदोरे जुळत आहेत. ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यापासून पडघा गावावर बारीक नजर ठेवण्यात आली आहे. तेथे आपल्या गुप्तचरांचे नेटवर्क सक्रिय करण्यात आले आहे. दुसरे म्हणजे, ठाणे जिल्हा मुख्यालयापासून ३५ किमी असलेल्या भिवंडी तालुक्यातील बोरिवली आणि पडघा ही गावे मुस्लिमांचेच प्राबल्य असलेली आहेत. सिमी संघटनेचे अनेक दहशतवादी या गावांना भेट देत असत. २००२-२००३ मध्ये मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन, विलेपार्ले आणि मुलुंड येथे झालेल्या बॉम्बस्फोटात सामील असलेला साकिब नाचन हा याच गावचा रहिवासी आहे. सुमारे ७००० लोकसंख्या असलेल्या पडघा या गावात ९० टक्के मुस्लिम आहेत. या कारवाईत छापे मारण्यात आलेल्यांमध्ये मालमत्ता दलाल आणि सिमीचा सदस्य ६० वर्षीय फराक झुबैर मुल्ला याचेही घर होते. त्याचा मोठा भाऊ हसीब हा मुंबई रेल्वे बॉम्बस्फोटातील आरोपी होता. तो १० वर्षांची शिक्षा भोगून सध्या दिल्लीत साकिबसोबत तुरुंगात आहे. मुंबई भारताचे आर्थिक हृदयस्थान असून, अनेक स्वप्नांचे माहेरघर आहे. या शहरावर वेळोवेळी दहशतीचे ढग जमा झाले. भारतातील सर्वांत मोठा दहशतवादी हल्ला याच शहराने झेलला. २६ विदेशी, पन्नासेक मुसलमान आणि शंभरेक हिंदू अशा पावणेदोनशे निष्पाप आणि निरपराध माणसांचा बळी घेणारी '२६/११' या नावाने ओळखली जाणारी घटना याच मुंबईने भोगली आहे. या मुंबईवरील हल्ल्यानंतर दहशतवादविरोधी कार्यक्षम यंत्रणा आवश्यक वाटू लागली आणि २०१० मध्ये महाराष्ट्र एटीएसचे पुनर्गठन करण्यात आले. आज, ही संस्था एक केंद्रीकृत व प्रादेशिक मिश्र मॉडेलमध्ये कार्य करते. याचे मुख्यालय मुंबई असून छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, ठाणे या ठिकाणी कार्यालये आहेत. दहशतवादाविरुद्धच्या संघर्षातील दृढ वज्रकवच आणि अंधाराशी झुंजणारे प्रहरी अशी ख्याती मिळवलेल्या महाराष्ट्र एटीएसने अनेक महत्त्वाच्या कारवाया वेळीच करून अनेक अप्रिय घटना टाळण्यात यश मिळविले आहे. त्यात २००६ च्या औरंगाबाद बॉम्बस्फोटांच्या वेळी महाराष्ट्र एटीएसने वेळीच कारवाई करत ४० किलो आरडीएक्स आणि शस्त्रास्त्रे जप्त केली आणि एक मोठा हल्ला टाळला. २०१२ मध्ये इंडियन मुजाहिद्दीनच्या पुणे नेटवर्कला मिळणारा पैसा आणि लॉजिस्टिक नेटवर्कचा पर्दाफाश करत अनेक अतिरेक्यांना अटक केली. २०१७-१८ मध्ये इसिस ऑनलाईन भरती प्रकरणात समाज माध्यमांद्वारे भरतीला रोखून २५ हून अधिक तरुणांना मुख्य प्रवाहात परत आणले. २०१९ च्या मुंबई मॉल बॉम्ब अफवांना जलद तपासाद्वारे थांबवून ती अफवा असल्याचे पटवून देत सामान्य जनतेचा विश्वास टिकवला.

ठाणे येथील परवाची कारवाई एटीएस ही महाराष्ट्राच्या सुरक्षेसाठी एक निष्ठावान, आधुनिक आणि समर्पित यंत्रणा आहे, हे सिद्ध करणारी आहे. अशा संस्थांचे बळकटीकरण आणि विश्वासार्हता केवळ राज्यासाठीच नव्हे तर संपूर्ण देशाच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचा टप्पा आहे. सतर्कतेची ही मशाल अखंड तेवत ठेवण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राची साथ गरजेची आहे, असे एटीएसच्या एका महत्त्वाच्या अधिकाऱ्याने बोलूनही दाखविले आहे. एक प्रबुद्ध, सहिष्णू आणि जबाबदार समाज हा एटीएससाठी सर्वोत्तम भागीदार ठरू शकतो, असेही ते म्हणतात. समाजाने महाराष्ट्र एटीएसच्या पाठीशी उभे राहण्याची आजच्या परिस्थितीत गरज आहे. दहशतवादाविरुद्धचा लढा फक्त सुरक्षा यंत्रणांचा आहे असे मानून चालणार नाही. सामान्य नागरिक, शैक्षणिक संस्था, माध्यमे आणि धार्मिक नेते अशा प्रत्येकाचा त्यात सहभाग आवश्यक आहे. संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना देणे, तरुणांना अतिरेकी विचारसरणीपासून दूर ठेवणे, धार्मिक सहिष्णुतेचा प्रचार करणे ही महाराष्ट्र एटीएसची येथील जनतेकडून अपेक्षा असून, ती वेळोवेळी वेगवेगळ्या प्रसंगांतून उजागरही झाली आहे. २००८ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर २०१० मध्ये पुनर्गठन करण्यात आलेल्या दहशतवाद विरोधी पथकाची (एटीएस) निर्मिती महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारीतच करण्यात आली आहे. या एटीएसला केंद्र सरकारचे पूर्ण पाठबळ असले तरी ते सक्रिय करणे, सक्रिय ठेवणे, वेळप्रसंगी त्यांना धडाकेबाज कारवाई करण्यासाठी मोकळीक देणे हे महाराष्ट्र सरकारच्या इच्छाशक्तीवरच अवलंबून असते. ही इच्छाशक्ती दाखवणारे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री त्यासाठी महाराष्ट्रात असावे लागतात. त्या 'दबंग आणि धडाडीच्या' मानसिकतेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर आहेतच, पण महाराष्ट्रातील जनतेच्या सुदैवाने ते स्वतःच गृहमंत्री पण आहेत. ठाणे जिल्ह्यातील 'अशा' दहशतवादी 'अस्तनीतील सापां'ना बिळातून कसे बाहेर काढायचे हे ते उत्तम रीतीने जाणतात. हे सुदैवच म्हणावे लागेल महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचे..!

## विशेष

# प्रतिमा सक्षम, सुदृढ भारताची

प्रा. सुखदेव बखळे

भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे केलेल्या कामगिरीची देशातच नव्हे तर जागतिक पातळीवरही मोठी चर्चा झडली. 'ऑपरेशन सिंदूर' थांबले नसून यापुढेही सुरू राहील, असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले. हे ऑपरेशन बंद करत आहोत, असे पंतप्रधानांनी म्हटलेले नाही. उलटपक्षी, आता हा भारताच्या रणनीतीचा एक भाग असल्याचे स्पष्ट करत त्यांनी पाकिस्तानला योग्य तो संदेश दिला आहे. ही मोहीम बंद करण्याचे सूचित केले असते, तर पाकिस्तानशी भारताचे संबंध सुधारत असल्याचे निदर्शक मानले गेले असते. म्हणूनच ही कारवाई वा धोरण सुरू ठेवत भारताने दहशतवादाविरुद्ध आपली खंबीर भूमिका जगापुढे मांडली आहे. त्याचे परिणाम येत्या काळातही बघायला मिळतील. भारताच्या या नीतीमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल वा काही गोष्टींची, धोरणांची भर येत्या काळात बघायला मिळू शकते. जसे की, दहशतवाद्यांना चोख उत्तर देण्यासाठी लढाऊ विमाने आणि क्षेपणास्त्रे डागून आपण त्यांचे तळ उद्ध्वस्त केले. नंतर भारताच्या प्रतिनिधी मंडळाने जगभरातील देशांना भेट देत आपली या ऑपरेशनसंदर्भातील भूमिका स्पष्ट केली. या प्रतिनिधी मंडळात देशातील सर्व राजकीय पक्षांतील प्रतिनिधींचा समावेश बघायला मिळाला. पाकिस्तानने भारताविरुद्ध काय केले आणि भारत काय करत आहे, हे त्यांनी सप्रमाण सांगितले. या सगळ्यातून पाकिस्तानमध्ये आश्रय घेणाऱ्या दहशतवाद्यांविरुद्ध जगभरात एक मोहीम सुरू करत असल्याची भारताची भूमिका स्पष्ट झाली आहे. जगाच्या पटलावर अशा ठोस आणि पारदर्शी भूमिकेचा चांगला प्रभाव बघायला मिळत असून अनेक देश भारताला समर्थन देताना दिसत आहेत.

ताज्या कारवाईमध्ये भारतात तयार झालेले ड्रोन्स आणि अन्य साधनांनी पाकिस्तानमध्ये लपलेल्या दहशतवाद्यांचे अड्डे, वसतिस्थाने भुईसपाट करण्याची जबाबदारी चोख बजावली. या हल्ल्यामध्ये त्यांचे मोठे नुकसान झाले. हे सर्व बघितल्यानंतर आता भारतात तयार होणाऱ्या शस्त्र आणि क्षेपणास्त्रांची मागणी जगभरात वाढू लागली आहे. आपली विमाने आणि क्षेपणास्त्रांनी अचूक नेम साधत लक्ष्यापर्यंत पोहोचण्यात मिळविलेले यश पाहून जगातील अनेक देश आता भारताचे याबाबतचे तंत्रज्ञान विकत घेऊ पाहात आहेत. हा महत्त्वाचा भागही लक्षात घ्यायला हवा. पाकिस्तानचा कांगावा, त्याचा खोटारडेपणा वारंवार समोर आला आहे. आपण भारताची विमाने पाडल्याचा त्यांचा दावा जगाने ऐकला. मात्र भारताच्या सेनाध्यक्षांनी, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफने तसेच खुद्द पंतप्रधानांनीही हे अमान्य केले आहे. विमानांचे काही प्रमाणात नुकसान झाले असले, तरी लगेचच त्यातील त्रुटी दूर करून आपण हल्ले केल्याचे अलिकडचे त्यांचे प्रतिपादन जगासमोर आहे. या सगळ्या स्पष्टतेमुळे अमेरिकेतील सर्व पक्षांचे प्रमुख भारताला पाठिंब्याचे निवेदन देत आहेत. पाकिस्तानच्या भूमिकेबद्दल त्यांच्या मनात शंका आहे. ते ती बोलूनही दाखवत आहेत. त्यातच जगभर आपली भूमिका स्पष्ट करणाऱ्या प्रतिनिधी मंडळालादेखील चांगला प्रतिसाद मिळतो आहे. काही देशांनी तर पाकिस्तानने आपल्याला चुकीची माहिती पुरवली असून आता सत्य समोर आल्याचे निवेदन दिले आहे.

एव्हाना या हल्ल्यामध्ये नुकसान झाल्याबद्दल पाकिस्तानप्रती संवेदना व्यक्त करणारे निवेदनही काही देशांनी मागे घेतले आहे. पाकिस्तानची कृती चुकीची असल्याचे आम्ही घोषित करतो, असे म्हणत त्यांनी भारताला पाठिंबा दिला आहे. स्वाभाविकच भारताचे अन्य देशांशी असणारे संबंध दृढ होण्याच्या दृष्टीनेही या सगळ्याची मदत होईल. भारत हा दहशतवाद्यांविरुद्ध वेगवान कारवाई करणारा पहिला देश ठरला आहे. अगदी अलिकडचा काळ लक्षात घेतला तरी रशिया आणि युक्रेनमधील तणाव तीन वर्षांनंतरही संपुष्टात आलेला नाही. इस्रायल आणि हमासमधील संघर्षही धुमसत आहे. आपण मात्र केवळ सहा दिवसांमध्ये हा संघर्ष संपवून टाकला. यावेळीही आपण दहशतवाद्यांना थारा देणाऱ्या देशातील लष्करी आस्थापनांना नव्हे, तर दहशतवादी केंद्रांना लक्ष्य केले. तेथील नागरिकांना कोणताही धक्का न पोहोचवता आपण हे ऑपरेशन यशस्वी करून दाखवले. पाकिस्तानने आपण हे युद्ध हरल्याची अधिकृत घोषणा केली नसली, तरी मानसिकदृष्ट्या हा देश हरल्याचे स्पष्ट दिसत आहे. तेथील राजकारणी, पंतप्रधान, सेनाध्यक्ष, फिल्ड मार्शल, सैन्य या सगळ्यांनाच आपण जिंकलो नसून हरल्याची भावना सतावत आहे. तसे पाहिले तर कोणताच देश आपण युद्ध हरलो, असे कबूल करत नाही. परंतु, पाकिस्तानातील सध्याचे वातावरण आणि तेथील लोकांची वक्तव्ये पराभव मान्य केल्याचे सूचित करणारी आहेत.

आणखी एक दखलपात्र बाब म्हणजे मागील काही दिवसांमध्ये बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानविरोधी मोहीम तीव्र झाली आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) ने घोषणा करत सुराब या शहरावर पूर्ण नियंत्रण मिळविल्याचे स्पष्ट केले आहे. आता हे शहर आपल्या ताब्यात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ही बाबदेखील नोंद घेण्याजोगी ठरेल. म्हणजेच एकीकडे पाकिस्तानच्या अडचणी वाढणे तर दुसरीकडे भारताप्रतीचा विश्वास बलाढ्य होऊन आपल्या रॉकेट प्रणाली वा संरक्षक शस्त्रांना जगभरातून मागणी वाढणे हे भारताची ताकद वाढत असल्याचे द्योतक म्हणावे लागेल. हे वास्तव भारताची जबाबदार भूमिका स्पष्ट करण्यास पुरेसे म्हणावे लागेल. 'ऑपरेशन सिंदूर' सुरूच राहण्याचा परिणाम येत्या काळातही नक्कीच बघायला मिळेल. भारताच्या या कठोर पावलामुळे दहशतवादी कारवाया कमी होण्यास मदत होणार आहे. या जोरदार तडाख्यामुळे दहशतवादी गट मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या हरले आहेत. त्यांची ताकद कमी झाली आहे. म्हणूनच भारताविरुद्ध कोणतीही दहशतवादी कारवाई करण्यापूर्वी त्यांना आता दहा वेळा विचार करावा लागेल. खेरीज काश्मीरमध्ये पर्यटकांनी येण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री आवाहन करताना दिसत आहेत. पर्यटकांनी आनंदाने यावे, काश्मीर त्यांचे रक्षण करण्यास समर्थ असल्याचे त्यांचे प्रतिपादन पर्यटकांमध्ये विश्वास निर्माण करत असून त्याला चांगला प्रतिसाद मिळताना दिसतो आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील राजकारण्यांची ताजी भूमिकाही चर्चेचा विषय ठरत आहे. पहलगाममध्ये हल्ला झालेल्या ठिकाणी मृत पर्यटकांचे स्मारक उभारण्याचे जाहीर करून श्रद्धांजली वाहण्याचा निर्णयही महत्त्वपूर्ण म्हणावा लागेल. यातून सरकार जागरूक आणि संवेदनशील असल्याचा संदेश समाजापर्यंत जाईल. स्वाभाविकच याची दखल घेतली जाईल. आता सरकारबरोबरच नागरिकांचीही जबाबदारी वाढली आहे. कोणीही खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये; केवळ भारताच्या भूमिकेवर विश्वास ठेवायला हवा. या सगळ्यामध्ये पाकिस्तानला मदत करणाऱ्या, त्यांच्या कृतीचे समर्थन करणाऱ्या तुर्की वा अजरबैजान या देशांविरुद्ध भारताने ठाम भूमिका घेतली आहे. आपण त्यांच्यावर विश्वास ठेवणार नसल्याचे स्पष्ट करत त्यांच्या भूमिकेचा जाहीर निषेधही भारताने नोंदवला आहे. तुर्कीने पाकिस्तानला मदत केल्याचे परिणाम लवकरच भोगावे लागणार असून व्यापार, व्यवसाय, नागरिकांचे येणे-जाणे या सगळ्यांवरील निर्बंधाच्या रूपाने ते पाहायला मिळतील. तुर्कीमधील काही कंपन्या भारतात काम करतात. आता भारत त्या बंद करत असल्यामुळे त्यांना मोठे नुकसान सोसावे लागणार आहे. खेरीज रशिया आणि पाकिस्तानमध्ये तंत्रज्ञान देण्याविषयक करार झाला असला, तरी हा देश त्यांना शस्त्र विकणार नाही. रशियाला पाकिस्तानपेक्षा भारताची जास्त गरज आहे. हे सगळे लक्षात घेता भारताची दहशतवादाविरुद्धची लढाई योग्य दिशेने सुरू असून त्याला जगाचा पाठिंबा असल्याचे लक्षात घ्यायला हवे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

संजय रामगिरवार

# रस्ते, 'फूटपाथ'चे अतिक्रमण घातकच!

चंद्रपुरातील तुकूम भागात हायवा ट्रकने सानिका कुमरे या २२ वर्षीय तरुणीला जागीच चिरडले. लक्कडकोटच्या एका शेतकऱ्याची ही पोर पोलिस अधिकारी व्हायचे स्वप्न उराशी बाळगून चंद्रपुरात आली होती. सोमवारी सायंकाळी अभ्यासिकेतून परत आपल्या निवासस्थानी जाताना हा अपघात घडला. खरे तर, याला अपघात म्हणूच नये. कारण अपघात आकस्मिक, अनपेक्षित असतो. जेथे अर्धाअधिक रस्ताच दुकानांच्या आणि वाहनांच्या अतिक्रमणामुळे रोखून धरला असेल आणि अगदी सहजपणे अपघात घडावा अशीच स्थिती जाणूनबुजून तयार केली गेली असेल, तर त्याला अपघात तरी कसा म्हणायचा? या घटनेतही असेच झाले. ट्रकचालकाचे नियंत्रण सुटले आणि समोर अतिक्रमणामुळे केवळ काही फुटाच्या रस्त्यावर चालणाऱ्या पादचारी व दुचाकीस्वारांना चिरडण्यापलीकडे आणखी दुसरे काही घडणार होते? अन्य एक मुलगी व महिलाही जखमी झाली. समोरच्या आणखी काही लोकांचे सुदैव की, या तिघांना धडक दिल्यानंतर तो ट्रक रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडाला धडकून बंद पडला. अन्यथा त्या साऱ्यांचे मरण होतेच. ही घटना व्यापकदृष्टीने एक शहरातील लहानशी वाटत असली तरी समस्या म्हणून ती सार्वत्रिक आहे. चंद्रपूर असो, की मग विदर्भातील अकोला, यवतमाळ, वर्धा, अमरावती किंवा अन्य लहान शहरे असोत, सगळीकडे रस्ते व 'फूटपाथ'वरचे अतिक्रमण थोड्याफार फरकाने सारखेच आहे. अनेक शहरांत पदपथ



नावालाच आहे. कारण त्यावर समोरच्या दुकांनाचे साहित्य ठेवले असते. इतके की तेथून चालणे शक्य होत नाही. दुकानदारांच्या दादागिरीमुळे नाईलाजाने पायी चालणाऱ्यांना त्यांचा हक्काचा मार्ग सोडून मुख्य मार्गावर चालावे लागते. तेथेही दुचाकी व चारचाकी ठेवल्या असतात आणि त्यामुळे अर्धाअधिक रस्ता नसतोच, उर्वरित काही फुटाच्या रस्त्यावरून, मोठ्या वर्दळीतून जीव मुठीत घेऊन लोकांना जावे लागते. मागून येणारे वाहन कधी धडक देईल याचा काहीच नेम नसतो. याही घटनेत असेच झाले, जे अतिशय लज्जास्पद आणि कानात मुंग्यांचे वारूळ निर्माण करणारे आहे. अतिक्रणधारकांची मुजोरी, ती काढण्याची जबाबदारी असलेल्या मनपा अधिकाऱ्यांची नालायकी आणि दुचाकी चालकांकडून चालान कापण्याचीच आपली जबादारी आहे किंवा त्यालाही बगल देत वरचे चार दोन पैसे खिशात कोंबणे एवढेच आपले कर्तव्य आहे, अर्धा रस्ता घेरून उभे असलेले ऑटो, चारचाक्या घटवणे हे काही आपले काम नाही म्हणून काखा वर करणाऱ्या वाहतूक पोलिसांच्या अकार्यक्षमतेचा हा परिपाक आहे. आपल्या व परिवाराच्या चांगल्या आयुष्याचे स्वप्न रंगवणाऱ्या आणि त्यासाठी गाव सोडून शहरात अभ्यास करणाऱ्या या तरुणीचा कसलाही दोष नसताना बळी गेला. त्या कुटुंबाचा गहिवर, त्यांचे डोंगराएवढे दुःख हे सारे सरकारी अधिकारी समजू शकणार आहेत का? एवढी असंवेदनशील व ढिम्म झालेली ही व्यवस्था मोठी घातक आहे, बघा.

नागपूरचा थोडाफार अपवाद वगळता अख्ख्या विदर्भाच्या साऱ्याच शहरांमध्ये वाहनतळ नावालाही नाही. वाहनतळ उपलब्ध नाही म्हणून चारचाकी आणि दुचाकीवाले भर रस्त्यांवर त्यांच्या गाड्या उभ्या करून निघून जातात. रस्ते तुंबतात, भांडणं होतात आणि रस्त्याच्या कडेला चहा पीत वाहतूक पोलिस खिदळत असतात, हे चित्र कुण्या एका शहराचे नाही, तर सर्वव्यापी आहे. ऑटोवाल्यांची तर कमाल आहे. भरधाव वेगाने रस्त्यावर जात असलेला ऑटो अचानकपणे ग्राहक गावला म्हणून करकच्चपणे अचानक थांबतो. धडक न देण्याची कसरत मागच्या वाहनधारकाने त्याची त्याने करावी, असा काहीसा या ऑटोचालकाचा अविर्भाव असतो. कुणी जरा त्याला काही बोलले तर तो शिवीगाळ करायला, प्रसंगी थोबाडीतही मारायला मागेपुढे पाहात नाही. कारण त्याचे सहकारी ऑटोचालक त्याचाच पक्ष घेणार हे त्याला माहीत असते. अशी संघटित गुन्हेगारी आपणच काय, वाहतूक पोलिसही उघड्या डोळ्यांनी बघत असतात. ऑटोचालकांवर कारवाई का करीत नाही असे विचारले तर, जाऊ द्या न बिचारे गरीब आहेत, अशी अजब दिलदारी हे वाहतूक पोलिस दाखवतात. जणू गरीब असणे हा वाहतुकीचे नियम मोडण्याचा परवाना आहे..! येथे विशेष उल्लेखनीय असे, रात्री दहा वाजेपर्यंत चंद्रपूरच्या तुकूम परिसरातील या रस्त्यावर मोठी वाहने जाऊ नये असा नियम केला असताना, हा ट्रक सायंकाळी ५ वाजता तेथे काय करीत होता? या प्रश्नाचे उत्तर आता कोण देणार आहे..!

९८८१७१७८३२

## धर्म-संस्कृती

# 'शमी शमयते पापम्...!'

प्रा. दिलीप जोशी

हिंदू संस्कृती अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालणारी असून, प्रत्येक गोष्ट आपल्या ऋषिमुनींनी संशोधन करून तिची उपयुक्तता सिद्ध केलेली आहे. चराचर सृष्टीबाबत तर भारतीय तत्त्वचिंतनाला जगात तोड नाही. व्यष्टी ते परमेष्ठी प्रवासात सृष्टीला महत्त्वाचे स्थान आहे. सृष्टीतील सर्वच वनस्पतींना आयुर्वेदात स्थान आहे. 'आयुर्वेद' हा वेदाचा उपवेद आहे. त्यामुळे बहुतेक वनस्पती अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड आहेत. जसे तुळशीपत्र आणि भगवान विष्णू, बिल्वपत्र आणि भगवान शिव, दूर्वा आणि भगवान गणेश अशा वनस्पती त्या त्या देवतांना प्रिय आहेत. यातील प्रत्येकाला औषधी आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. याच वनस्पतीमध्ये अत्यंत गुणकारी आणि आध्यात्मिक वनस्पती म्हणजे 'शमीदलपत्र' होय. वेद, उपनिषद, रामायण, महाभारत, महाकवी कालिदास वाङ्मय अशा सर्वच प्रमुख ग्रंथांमध्ये शमीचा उल्लेख आहे. शमी वनस्पतीच्या उत्पत्तीची पौराणिक कथा देवर्षी नारदांनी देवेंद्राला सांगितली आहे.

औरव नावाच्या ऋषींना शमिका नावाची मुलगी होती. तिचा विवाह धौम्यऋषींचा पुत्र मंदार याच्याशी झाला. मंदार हा ऋषी शौनक यांचा शिष्य होता. लग्नानंतर मंदार आणि शमी आपले गुरू ऋषी शौनकाच्या दर्शनासाठी निघाले असताना वाटेत त्यांना ऋषी भृशुंडी यांचा आश्रम दिसला. त्यांचे दर्शन घेण्यासाठी हे नवविवाहित शमी-मंदार भृशुंडी ऋषींच्या आश्रमात गेले. ऋषी भृशुंडी हे पराकोटीचे गणेशभक्त होते. त्यामुळे त्यांचे स्वरूप 'प्रतिगणेशरूप' म्हणजे त्यांना गजमुख होते. त्यांचे ते सोंड असलेले स्वरूप पाहून शमी आणि मंदार यांना हसू आले. हे पाहून ऋषी भृशुंडी संतप्त होऊन त्यांनी त्यांना अस्पर्शी वनस्पती होण्याचा शाप दिला. त्या प्रभावाने शमी ही काटेरी वनस्पती बनली आणि मंदार म्हणजे रुईचे झाड बनले. आपल्या मुलीची आणि जावयाची ही अवस्था पाहून ऋषी औरव यांनी भगवान गणपतीची साधना केली. भगवान गणेश प्रसन्न झाले, पण आपल्या शिष्याने दिलेला शाप मला मागे घेता येणार नाही, पण शमी आणि मंदार हे चिरकाल स्मरणात राहावेत म्हणून मी त्यांना वरदान देतो की, या दोन्ही वनस्पती मला प्रिय असतील. तेव्हापासून या दोन्ही वनस्पतींना दैवीक स्थान आहे. त्यातही शमीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**'शमी शमयते पापम्, शमी लोहित कंटका।**
**धारिण्यर्जुन बाणानाम्, रामस्य प्रिय वादिनी॥'**

शमी पापाचे शमन करतो. शमीच्या फांदीवर असणारे रक्तकंटक म्हणजे तांबुस काटे सतत सजग ठेवतात. ज्या शमीने अर्जुनाचे गांडीव धारण केले तोच शमी वृक्ष रामाची स्तुती करतो आणि राम त्याची पूजा करतात. रक्षंतिस्म परस्परम् असे ते आहेत. शमीचे हिंदू संस्कृतीत आध्यात्मिक, पौराणिक, आयुर्वेदीय, यज्ञिय, वास्तुशास्त्रीय आणि कृषिशास्त्रीय उपयोग आहेत. आपल्या संस्कृतीत 'सीमान्ते शमिपूजन' आहे. युद्धावर जाताना आणि येताना सीमेवर शमिपूजन होत असे. भगवान रामचंद्रांनी रावणवधापूर्वी शमिपूजन केल्याचे पुराणात वर्णन आहे. पांडवांच्या अज्ञातवासात त्यांनी आपली सर्व शस्त्रे शमी वृक्षाच्या ढोलीत ठेवली होती. अज्ञातवास संपल्यावर त्यांनी यथासांग शमिपूजन केले होते. दसऱ्याच्या दिवशी म्हणूनच सीमोल्लंघन करताना सीमेवर शमिपूजन केले जाते.

भृगू ऋषी क्रोधित झाले तेव्हा जातवेद नावाचे अग्निदेव शमिवृक्षात लपून बसले. तेव्हापासून शमिवृक्षात अग्नी निवास आहे. त्यामुळेच यज्ञादी कर्म करताना अरणी मंथनातून अग्नी उत्पन्न करतात. त्यासाठी असणारी अरणी शमीच्या खोडापासून बनलेली असते. अरणी मंथन होते आणि त्यातून उत्पन्न होणारा अग्नी म्हणजे जातवेद अग्नी; त्यालाच यज्ञाग्नी म्हणतात. त्या अरणी मंथनातून निर्माण यज्ञाग्नीने यज्ञकुंड प्रज्वलित करतात. महाकवी कालिदासांनी याच वृक्षाखाली यमद्वितीयेला तप:साधना केल्यामुळे त्यांची पंडाबुद्धी जागृत झाली होती. म्हणजे अर्जुनाचे क्षात्रतेज आणि महाकवी कालिदासांना प्राज्ञतेज अर्थात शस्त्र आणि शास्त्रावर प्रभाव असणारी ही वनस्पती आहे.

शमिपर्ण हे दलपत्र आहे. म्हणजे पानावर अनेक पर्णिका असतात. पर्णिकाच्या अग्रस्थानी लोकपालादी संरक्षक देवता असतात. मध्यभागी अपराजिता त्रिगुणात्मिका जगदंबा तर मुळाशी भगवान महादेव तथा शनिसह नवग्रह निवासी असतात. शमीमुळे जमिनीतील नत्र वाढून उपजाऊ क्षमता वाढते. ज्याला प्राचीन कृषिशास्त्रात मरुस्थळीकरण म्हणतात; म्हणजे शेती अनुत्पादक होण्याची क्रिया रोखली जाते. शमीचा उल्लेख ऋग्वेदातही आहे.

**'विष्ट्वी शमी तरणीत्वेन वाघतो॥'**

ऋग्वेदानुसार शमी अतिशीघ्रतेने अमृत तत्त्वाला म्हणजे मोक्षाचा मार्ग प्रशस्त करतो. आयुर्वेदानेही शमीची औषधी उपयुक्तता सांगितली आहे. कफनाशक, कुष्ठरोधक, खाजेवर, अस्थमा, दातरोग, रक्तशर्करा, प्रसववेदनानाशक आणि विंचू चावला तर त्यावर उपयोगी वनस्पती म्हणून उल्लेख आहे. शमी कठोर जलतत्त्व, वायुतत्त्व आणि भूतत्त्व असलेल्या ठिकाणी उगवते म्हणजे वाळवंटी प्रदेशातही शमी बहरते. वराहमिहिर यांनी, जेव्हा शमी बहरते त्यावर्षी पाऊस कमी पडत असल्याचे म्हटले. यज्ञात ज्या विविध समिधा वापरतात त्यात शमीचाही समावेश आहे. शमी सकारात्मक स्पंदने प्रवाहित करतो. शमी वायू शुद्धीकरण म्हणजे प्रदूषण टाळण्यास मदत करते. काटेरी असल्यामुळे गैरसमजापोटी काही जण शमीला घराजवळ लावण्यास निषिद्ध मानतात, पण शमी घराजवळ असल्यास सकारात्मकता, लक्ष्मीवर्धन आणि विवेकवृत्ती जागरण होते.

**'त्वत्प्रियाणि सुपुष्पाणि कोमलानि शुभानि वै।**
**शमी दलानि हेरम्ब गृहाण गणनायक॥'**

या मंत्राने सामान्यजनांनी शमिदलपत्र आर्तभावाने जसे हातात येईल तसे गणपतीच्या मस्तकावर वाहावे. साधकांनी हे शमीचे पान सरळ वाहावे तर तंत्रसाधकांनी श्रीगणेशाच्या मस्तकावर उपडे वाहावे. शमिवृक्ष आयर्वेदीय असल्यामुळे आरोग्यवर्धक आहे. नायट्रोजन निर्मितीमुळे जमिनीची उपजाऊ क्षमता असणारा शेतकऱ्यांचा मित्र, आध्यात्मिक साधकांना सकारात्मक ऊर्जा देतो म्हणून तो पूजनीय, घराच्या अवतीभोवती असल्यास ज्ञान आणि लक्ष्मीला पूरक म्हणून वास्तूला पूरक, जातवेद अग्नीमुळे शस्त्र आणि शास्त्रपूरक आहे. त्यामुळेच तो पापनाशक आहे. खरं सांगू ! कोणताच माणूस आणि कोणतीच वनस्पती बिनाकामाची नसते. फक्त त्याचे योग्य उपयोजन माहीत हवे. शमी वृक्ष तर आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक आहे. म्हणूनच त्याचे महत्त्व शमिसूक्तात आहे.

**'शमी शमयते रोगान्, शमी शमयते रिपून्।**
**शमी शमयते पापम्, शमी सर्वार्थसाधिनी॥'**

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### ईपीएस-९५ संबंधी दिशाभूल करणाऱ्या पोस्ट

ईपीएस- ९५ योजनेअंतर्गत मिळणाऱ्या १००० रुपये पेन्शनमध्ये वाढ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. आता त्या योजनेअंतर्गत ज्यांना १००० रुपये आणि त्यापेक्षा कमी दरमहा पेन्शन मिळत आहे त्यांना मार्च २०२५ पासून दरमहा ७५०० आणि त्यावर आधारित महागाई भत्ता मिळेल अशा आशयाची पोस्ट समाज माध्यमावर सतत येत आहे. ही माहिती दिशाभूल करणारी, भ्रमित करणारी आहे. असा निर्णय केंद्र सरकारने अद्याप घेतलेला नाही.

हरयाणा सरकारने त्यांच्या निवृत्तिवेतनधारकांसाठी निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत ईपीएस-९५ अंतर्गत ज्यांना १००० रुपये पेन्शन मिळत आहे त्यांना राज्य सरकार २००० रुपये आपल्या निधीतून देणार असल्याची माहिती आहे. अशाप्रकारे त्या राज्यातील निवृत्तिधारकांना दरमहा किमान पेन्शन ३००० रुपये मिळेल. हा निर्णय निश्चितच अभिनंदनीय आहे तसेच अनुकरणीय देखील आहे. अन्य राज्य सरकारांनी असाच या योजनेला हातभार लावला तर काही प्रमाणात का होईना संबंधित निवृत्तिधारकांना दिलासा मिळेल. त्यांचे उर्वरित आयुष्य सुखमय, आनंदमय होऊ शकेल. महाराष्ट्र एक विकसित राज्य आहे. केंद्र सरकारच्या योजनेला हातभार लावण्याचे काम राज्य सरकार करीत असते. त्याच दृष्टिकोनातून या योजनेकडे बघितले तर शोषित, पीडित निवृत्तिवेतनधारक राज्य सरकारला आशीर्वाद दिल्याशिवाय राहणार नाहीत.

**वसंत पिंपळापुरे**/९४२२८०७०१३

••••

### वृक्षलागवड त्रासदायक ठरू नये

पावसाळा सुरू होताच अनेक संघटना, संस्था आणि शासनाद्वारे मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली जाते. शहरात व ग्रामीण भागात तर ठिकठिकाणी वृक्षलागवड करण्यात येते. परंतु अनेक वृक्ष विद्युत तारांखाली



लावले जातात. यामुळे जीवितहानी व अनेकदा विजेच्या संकटाचा त्रास सहन करावा लागतो. मोठे वृक्ष, वड, पिंपळ, कडुलिंब व इतरही झाडे घरासमोर किंवा लहान प्लॉट, फ्लॅटमध्ये लावले जातात. त्यामुळे स्वत:सोबतच दुसऱ्याच्या घराचे आपण नुकसान करीत असतो. तेव्हा वृक्षलागवड करताना भविष्यात आपल्याला व इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या.

**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

••••

### जलसाठ्यातील जलपातळी रोखण्याचे आव्हान

राज्यातील भूगर्भातील जलपातळी सतत घटत आहे, तर दुसरीकडे पावसाचे पाणी साठवून जे जलसाठे तयार होतात ते याच वाढत्या तापमानामुळे अत्यंत वेगाने घटतात. म्हणजे अगदी डिसेंबरमध्ये अनेक धरणांची पातळी ही अध्यपिक्षाही खाली गेलेली असते आणि मे महिन्यामध्ये तर अनेक धरणे ही कोरडी झालेली पाहायला मिळतात. केवळ बाष्पीभवनातून पाण्याचा साठा वेगाने घटत असतो. ज्यातून दोन्ही पद्धतीने पाणी शोषले जाते किंवा जमिनीखालची पातळी अधिकाधिक काळ अशी टिकून राहील याबद्दलच्या नवनवीन उपाययोजना राबवल्या गेल्या पाहिजे. तरच पाणीटंचाईचा काही प्रमाणात मात करता येणे शक्य होऊ शकेल. पण दुर्दैवाने सरकारकडून तसे प्रयत्न होताना दिसत नाही.

जलसाठ्यातील जलपातळी रोखण्यासंदर्भातल्या काही उपाययोजनांमध्ये काही बाबींचा अंतर्भाव करता येऊ शकतो. जसे वाढत्या तापमानाचे एकाअर्थी तोटेच आहेत. कारण त्यातून केवळ पाणी नाहीसे होण्याचा प्रकार घडतो. अशावेळी अगदी उन्हाळ्यामध्ये हे जलसाठे आच्छादित कसे करता येतील आणि उष्णतेमुळे त्यांचे बाष्पीभवन कसे रोखता येईल याचे प्रयोग करता येऊ शकतात. तर जलयुक्तशिवाराबरोबर अधिकाधिक छोटे छोटे जलसाठे टिकवण्यासाठी पावसाळ्यात जलपुनर्भरण योजना राबवता येऊ शकतात. आज स्वच्छतेसाठी ग्रामपंचायतींना पाच लाख रुपये तर महानगरपालिकांना दोन ते तीन कोटींची बक्षिसे दिली जातात. शहरे आणि गावांची स्वच्छता सर्वेक्षण होतात. त्याच पद्धतीने जलस्तर रोखण्याचे सर्वेक्षण आणि स्पर्धा घेण्याची आवश्यकता आहे. जे गाव किंवा महानगर पाणी साठवण्याबाबत लोकसहभागातून किंवा आपल्या कौशल्याने जर काही योजना राबवत असेल आणि त्या परिसरातील एकूणच भूगर्भातील जलपातळी कायम ठेवण्यात यशस्वी होत असेल तर अशा गावांना किंवा महानगरांना बक्षिसे दिली गेली पाहिजेत.

यासाठी पावसाळ्यातले पाणी टिकवणे ते पाणी इकडे तिकडे वाहून न जाता त्याचे त्या त्या गावाच्या किंवा महानगराच्या पंचक्रोशीत पुनर्भरण करणे किंवा उन्हाळ्यामध्ये आपापल्या गावातील, महानगरातील जलसाठ्याचे बाष्पीभवनातून होणारे नुकसान न होऊ देणे हे उपाय करता येऊ शकतात.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.




## आंतरमंडलीय नाट्य स्पर्धेसाठी सोलापूर महावितरणचा संघ रवाना

**सोलापूर, दि. ३ जून-**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित आंतर परिमंडलीय नाट्य स्पर्धा पुणे येथे होत असून या स्पर्धेसाठी महावितरण बाराम ती परीमंडलांतर्गत सोलापूरचा नाट्यसंघ आज रवाना झाला. या संघाचे राहिले दूर घर माझे हे नाटक पुणे येथे उद्या सादर होणार आहे. दि. ३ ते ४ जून दरम्यान लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह, पुणे येथे संपन्न होणाऱ्या या स्पर्धेत एकूण तीन नाटके प्रथामिक फेरीत सादर होणार आहेत. महावितरण पुणे परिमंडळ कडून डॉक्टर तुम्हीसुद्धा, महावितरण कोल्हापूर परिमंडळ कडून सामसूम तर महावितरण बारामती परिमंडळ कडून शफाहत खान लिखित राहिले दुर घर माझे हे नाटक आज बुधवार दिनांक ४ जून रोजी सादर होणार आहे. नाटकाचे दिग्दर्शन महावितरण सोलापूर मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता सुनिल माने यांनी केले आहे. नाटकात अंजली गुडुर, विजया कोळी, विजयकुमार राकले, शिवप्रसाद चिक्का, गंगाक्का गुडुर, नजीरोद्दीन मुजावर, संजय तिरेकर,नितीन बोंडगे, पी.एल.जाधव, सुनिल माने, अविनाश चव्हाण या कर्मचाऱ्यांनी भूमिका साकारल्या आहेत.

# ‘ई-ऑफीस’ प्रणालीमुळे नागरिकांची कामे गतीने

### तहसीलदार पाटील यांची माहिती ; दररोज ७०० ते ८०० टपालांची आवक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय कामकाज दिवसेंदिवस पेपरलेस होत असून, ‘ई ऑफिस’ प्रणाली कार्यान्वित झाली आहे. सोलापुरात गतवर्षी पेपरलेस प्रणाली सुरू झाली असून, टप्प्याटप्प्याने उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार कार्यालयांतदेखील या प्रणालीची अंमलबजावणी झाल्याने फायलींच्या प्रवासातील अडथळे आता दूर झाले आहेत. दरम्यान, रोज सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात ७०० ते ८०० पर्यंत टपालांसह निवेदने येत असून, ‘ई-ऑफीस’ प्रणालीमुळे जनतेच्या प्रश्न गतीने सोडविले जात असल्याची माहिती तहसीलदार श्रीकांत पाटील यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालय हे जिल्हा प्रशासनाचे मुख्यालय असते. त्यामुळे विविध सरकारी




यंत्रणांचा येथे राबता असतो. या कार्यालयात नागरिकांची सातत्याने वर्दळ असते. अधिकाऱ्यांच्या टेबलवर फायलींचे गठ्ठे असतात. त्यामुळे या फायलींचा निपटारा केला जातो की नाही, याबाबतच्या शंकाही उपस्थित होत राहतात. जिल्हाधिकारी कार्यालयातील कामकाज पेपरलेस व्हावे याकरिता दोन वर्षांपूर्वी ‘ई ऑफिस’ प्रणालीचा स्वीकार करण्याचा निर्णय घेण्यात आला. अधिकारी, कर्मचाऱ्यांना ‘ई ऑफिस’ची सेवा देण्यासाठी ‘आयटी’च्या पायाभूत सुविधा स्वीकारण्यात आल्या आहेत. या प्रणालीमुळे इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या आधारे अधिकारी, कर्मचारी संगणकावरच फायलींशी संबंधित कामे करताना दिसून येतात. या ‘ई ऑफिस’ प्रणालीनुसार कामकाज करण्यास सुरुवात झाली आहे. आता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य इमारतीत पूर्णतः ‘ई ऑफिस’ प्रणालीचाच वापर होत आहे. त्यामुळे कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता येवून नागरिकांची कामे ही झपाट्याने होत आहेत. इतकेच नव्हेतर नागरिकांना आता वारंवार हेलपाटे मारण्याचीही गरज नाही. तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकारी अशा चार टप्प्यांत फायलींचा प्रवास होत असतो. हा प्रवास आता ‘ई ऑफिस’ प्रणालीतून सुकर आणि गतिशीलपणे होत आहे. स्कॅन होऊन आलेल्या फायलींवर आधार बेस ‘ओटीपी’च्या माध्यमातून संबंधित अधिकारी डिजिटल स्वाक्षरी करणार आहेत. अधिकाऱ्यांना मोबाईलवरदेखील कामकाजाच्या फायली, कागदपत्रे पाहता येत आहेत. यामुळे सामान्य नागरिकांतूनही समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वरिष्ठ निवड श्रेणीचे डायटकडून प्रशिक्षण सुरू

### १२ जूनपर्यंत चालणार प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील जे शिक्षक वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी पात्र आहेत, त्यांचे प्रशिक्षण सोमवार २ जूनपासुन सुरू झाली आहे. २ ते १२ जूनपर्यंत हे प्रशिक्षण सुरू राहणार आहे. त्यासाठी तालुकास्तरीय प्रशिक्षणात भोजन, अल्पोहार व चहाची सोय नसल्याने, प्रशिक्षणार्थींनी स्वतःचे जेवण स्वतःच घेऊन यावे, अशा सूचना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने दिले आहेत.


सोलापूर जिल्ह्यातील एक हजार ९०६ शिक्षक वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. त्यात प्राथमिकचे ४२१ शिक्षक वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी तर ६९० शिक्षकांची निवडश्रेणीसाठी नोंदणी झाली आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील ५५३ शिक्षक वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी तर २४२ शिक्षक निवडश्रेणीसाठी प्रशिक्षण घेत आहेत. सर्वांची सकाळी साडेनऊ वाजता उपस्थिती आवश्यक असून सकाळी १० वाजता त्यांची हजेरी घेतली जाणार आहे. प्रत्येक तासाला हजेरी घेऊन ती ऑनलाइन एससीईआरटीला अपलोड केली जाणार आहे. १० दिवसांच्या प्रशिक्षणात एक वेळेची स्वाक्षरी हजेरी पटावर नसेल तर त्या प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यांना पुढच्या वर्षीच पुन्हा नव्याने नोंदणी करून प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल, असे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था डायटचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे यांनी स्पष्ट केले आहे.

# स.हि.ने. प्रशालेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

श्री सरस्वती मंदिर संस्था सोलापूर संचलित स. हि.ने. प्रशालेत शनिवार ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशतब्दी जयंती मान्यवरांच्या उपस्थितीत अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून साजरी करण्यात आली.

अहिल्यादेवी या एक कुशल प्रशासक, योद्धा, न्यायप्रिय शासनकर्त्या आणि आदर्श स्त्री होत्या म्हणूनच आज आपण त्यांचा जयंती साजरी करत असल्याचे शिक्षिका गौरी मठपती यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितले. विविध कालखंडात परिसथितीनुरूप स्त्रीची भूमिका



बदलत गेली.आजही बदलत्या काळानुसार स्त्रियांनी आपापल्या परीने समाजासाठी काय करता येयील यावर विचार मंथन करून ते विचार अंमलांत आणावेत अशी भावना कार्यक्रमाचे अध्यक्ष पांडुरंग देशमुख यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास ज्येष्ठ विधीज्ञ रघुनाथ दामले, राहुल औरंगाबादकर, प्रशांत बडवे, सामाजिक कार्यकर्ते संतोष गायकवाड, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, जयश्री राठोड, सोनाली सोनाळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी मठपती यांनी केले. संगीता रेळेकर यांनी आभार मानले.

# बाळेनजीक जलवाहिनीला गळती; पाणीपुरवठा विस्कळीत

### एका रोटेशनसाठी एक दिवस शहराला उशिरा पाणीपुरवठा होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या पाकणी ते सोलापूर दरम्यानच्या पाईपलाईनला मंगळवारी बाळे पुलाखाली व सहारा सिटी जंगलीहॉटेल समोर गळती लागली. त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले. परिणामी शहराचा पाणीपुरवठा एक दिवस लांबणीवर गेला आहे.

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्यावतीने मंगळवारी सायंकाळी बाळेजवळील आदिला नदीमध्ये पिलर टाकत असताना धक्का लागल्यामुळे उजनी-सोलापूर जलवाहिनीला मोठी गळती लागली. मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याने दुरुस्तीचे काम अत्यंत तातडीने घेणे जरुरीचे होते. त्यामुळे संध्याकाळीच दुरुस्तीचे काम काम हाती घेण्यात आले. दुरुस्तीचे काम करण्यास बराच कालावधी लागणार असल्याने सोलापूर शहराचा उजनी पाईपलाईन वरून भवानी पेठवरून व हायलेवल वरून होणारा अवलंबून असलेला परिसराचा पाणीपुरवठा एक रोटेशनकरीता एक दिवसाने पुढे जाणार आहे.

त्यानुसार बुधवार दि. ४ जून तेलगी पाच्छा पेठ, रविवार पेठ, अर्कल हॉस्पिटल परिसर, जमखंडी पूल, बुधवार बाजार, भद्रावती पेठ, गिरी झोपडपट्टी, संयुक्त झोपडपट्टी, गांधीनगनगर, मुल्ला बाबा टेकडी, नवी पेठ, रामलाल चौक, एन जी मिल चाळ, पाटील चाळ, दत्त चौक, पनौवेस तालिम, मसरे गल्ली, पंजाब तालिम, काळीमशीद परिसर,टिळक चौक, वसंत कॅप परिसर बापूजी नगर, हॉलीबॉल ग्राऊंड, शास्त्रीनगर, जवाहर





नगर, बुधले गल्ली, मंगळवार पेठ पोलिस चौकी परिसर, होटगी रोड, साखर कारखाना परिसर, महात्मा फुले नगर, महालक्ष्मी नगर, मजरेवाडी गावठाण, हत्तुरे वस्ती, सहारा नगर भाग-३. लोकमान्य नगर, काजल नगर, टिकेकर वाडी, राघवेंद्र नगर, किसान संकुल, मानिधारी सोसायटी, राजीव नगर भाग. भाग २, किसान नगर भाग. भाग २, कोटा नगर,द्वारका नगर १ व २ नंदी नगर, पापा राम नगर, जयकुमार नगर अर्जुन टॉवर, आत्तार नगर, यामिनी नगर, वीर शैवनगर, कोटणीसनगर, भारतीय विद्यापीठ, विजापुर रोड, बावीस सोसायटी, चैतन्य नगर, सैनिक नगर, संत नगर, रेवनसिद्धेश्वर नगर या भागांना पाणीपुरवठा होणार आहे.

गुरुवार दि. ५ जून रोजी बेडर पूल परिसर, सफाई कामगार वस्ती, मरीआई चौक, दामाणी नगर, थोबडे इस्ती, गोबडे मळा, साठेपाटील बस्ती, सेटलमेंट, घोंगडे बस्ती, धोत्रे वस्ती, भवानी पेठ, मदडी वस्ती, सातपुते बस्ती, कुर्बान हुसेन नगर भारत नगर पंचशील नगर तक्षशीलनगर सिरतनगर, राहुल सोसायटी, सम्राट अशोक सोसायटी, लक्ष्मी विष्णु सोसायटी, लोप्रोसी कॉलनी, मदर इंडिया झोपडपट्टी संजय नगर,साईबाबा चौक गीता नगर कुचन नगर हनुमान खड्डा, उत्तर दाजी पेठ

सरगम हॉटेल परिसर एकता नगर कणिक नगर बज्रेश्वर नगर, कित्तूर चन्नम्मा नगर, सवेरा नगर, संत तुकाराम नगर साफल्यानगर,नरेंद्र नगर, सिद्धविनायकनगर, साई बंगलो, टिळक नगर, नागनाथनगर, किनारा सिटी भाग अंत्रोळीकर नगर भाग एक, समाधान नगर, जवाहर नगर, जय जलाराम नगर, हरिकृष्ण अपार्टमेंट तुलसी विहार मंत्री चंडक पार्क, मुक्ती नगर,कोळी समाज सोसायटी, नाथ होम,बिलाल नगर, कांचनगंगा सोसायटी, स्वामी विवेकानंद नगर एक ते तीन, सवेरा नगर, वैष्णवी नगर एक व दोन,अण्णा कॉलनी राम नारायण चंडकनगर, अमृत नगर, शांतीनगर, अशोक नगर, निरपम समाज, महालक्ष्मी नगर या विविध भागांना पाणीपुरवठा होईल.

दुरुस्ती कामामुळे पाणीपुरवठा एक दिवस विलंबाने होणार असल्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.


# छत्रपती शिवाजी महाराज प्रेरणास्थळ भेट मोहीम सुरू

### यात्रेत सहभागी होण्यासाठी उत्तर तहसील कार्यालयात संपर्क साधावा

**आरडीसी गणेश निऱ्हाळी यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जून-**

महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने भारत गौरव यात्रा दुरिस्ट ट्रेन या म ाध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज प्रेरणास्थळ भेट मोहीम सुरू करण्यात येत असून हा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली वारसाला मानवंदना देणार असून, नागरिकांना त्यांच्या जीवनाशी संबंधित प्रमुख किल्ल्यांप्रमाणेच त्या भोवतीच्या धार्मिक स्थळांचा अविस्मरणीय प्रवास घडवून आणण्यासाठी संधी देतो.



या योजनेंतर्गत पहिली ट्रेन ९ जून २०२५ रोजी (तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिनी) मुंबई सीएसटी या स्थानकावरून सुटणार असून, या उपक्रमात सक्रिय सहभाग घेणेबाबत सुचित केले आहे. त्या अनुषंगाने ज्या युवक, विद्यार्थी, विद्यार्थी शिवप्रेमी, इतिहास प्रेमी यांना या प्रेरणादायी यात्रेत सहभागी व्हावयाचे आहे. त्यांनी तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर येथे संपर्क साधावा.

याबाबत भारतीय रेल्वेचे प्रतिव्यक्ती टूर किंमत पुढीलप्रमाणे स्लीपर इकोनॉमी- १३ हजार १५५ रुपये, ३ एसी कम्फर्ट- १९ हजार ८४० रुपये, २ एसी सुपीरियद- २७ हजार ३६५ रुपये तरी कृपया अधिकतम माहितीसाठी तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले आहे.

## आसरा ते आत्तार नगर रस्त्यावर खड्डे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

जुळे सोलापुरातील आसरा पूल ते आत्तारनगर या मुख्य रस्त्यावर जीवघेणे खड्डे पडले असून महापालिका प्रशासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. आसरा पूल ते आत्तारनगर हा रस्ता मोठ्या वर्दळीचा आहे. या रस्त्यावर काही ठिकाणी इतके मोठे खड्डे पडले आहेत की, वाहन चालवताना याठिकाणी अनेकजण पडलेले आहेत. पाऊस पडल्यानंतर या खड्यांमध्ये पाणी साचल्यानंतर वाहनचालकांना खड्डयांचा अंदाज येत नसल्याने वारंवार अपघात होवून वाहनचालक जखमी होत आहेत. महापालिका झोन ५ च्या अधिकाऱ्यांनी हे खड्डे तातडीने बुजवावेत, अशी मागणी होत आहे. माती न टाकता प्रिमिक्स वापरून या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची गरज आहे. अन्यना नागरिक आंदोलनाच्या तयारीत आहेत.

## शेतातातून दोन लाख रुपयांच्या डाळिंबाची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ३ जून-**

वडील आजारी असल्याने औषध आणण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याच्या २ लाख रुपये डाळिंब शेतातून चोरून नेल्याची घटना मोहोळ शहरातील पंढरपूर रोडवरील काकडे वस्ती मध्ये घडली.

मोहोळ पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार,यातील फिर्यादी शेतकरी महादेव नेताजी काकडे (वय ३३, रा.काकडे वस्ती पंढरपूर रोड मोहोळ) यांचे वडील लकवा झाल्यामुळे आजारी आहेत.त्यांच्यावर उपचारासाठी दवाखान्यात फिर्यादी काकडे नागनमुळीइथे गेले होते.याचे संधी साधून अज्ञात चोरट्याने दि.२९ मे ते ३ जून च्या दरम्यान २ लाखांची डाळिंब चोरुन नेली .त्यांना आल्यानंतर कळल्यानंतर ताबडतोब त्यांनी याबाबतची फिर्याद मोहोळ पोलिसांना दिली. पुढील तपास मोहोळ पोलीस करत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः सांगोला शहर व सांगोला तालुक्यातील व परिसरातील लोकाना श्री एन.पी. कुलकर्णी पॅनल ॲडव्होकेट एच.डी.एफ.सी. बँक शाखा सांगोला यांचे मार्फत या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री महादेव कृष्णा बाड रा. राजुरी ता.सांगोला जि. सोलापूर मो. ९९२१३३६६८८ हे सुमारे दोन महिन्यापूर्वी म्हणजे दि. १५/२/२०२५ कोल्हापूर ते सांगोला असा प्रवास करत होते सदर प्रवास करतेवेळे त्यांच्याकडील असणाऱ्या हॅन्ड बॅगेमध्ये खालील नमूद केलेली कागदपत्रे गहाळ झालेली आहेत.

१) मूळ खरेदी दस्त सर्वे न. ५९६/१ शॉपन. १८ तळ मजला पराग कमर्शिअल कॉम्प्लेक्स शाहूपुरी इवार्ड पंच बंगलो व्हिजीटेबल मार्केट कोल्हापूर खरेदी दस्त न.अ.व.न.२०४१/१९८८ अपार्टमेंट डीड/खरेदीखत

२) इंडेक्स न.२ आणि नोंदणी पावती

३) मूळ खरेदी दस्त सर्वे न.५९६/१ मधील शॉप न. जी २२ तळ मजला पराग कमर्शिअल कॉम्प्लेक्स शाहूपुरी इवार्ड पंच बंगलो व्हिजीटेबल मार्केट कोल्हापूर खरेदी दस्त न.अ.व.न.१८७७/१९९५

४) इंडेक्स न.२ आणि नोंदणी पावती

त्याबाबतची माहिती व तक्रार श्री महादेव कृष्ण बाड यांनी दि.१५/५/२०२५ रोजी सांगोला पोलीस स्टेशनला दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरची तक्रार सांगोला पोलीस स्टेशनला गहाळ रजिस्टर न. ३६०/२०२५ अन्वये नोंदली गेली आहे व तसा दाखला सांगोला पोलीस स्टेशन यांनी दि. १९/५/२०२५ रोजी दिलेला आहे.

सदरच्या मिळकती बाबत कर्ज प्रकरणी श्री महादेव कृष्ण बाड यांनी एच.डी.एफ.सी बँक लि. शाखा सांगोला त्यांचे नावे सदर मिळकतीचे रजिस्टर गहाणखत दि. २५/३/२०२५ रोजी लिहून नोंदवून दिलेले आहे. सदरच्या कर्ज रकमेचा बोजा रु.२५०१००००/- वरील मिळकतीवर फेरफार न.५४८० अन्वये चढविलेला आहे.

सदरची हरवलेली बॅग व त्यामध्ये असलेली वर नमूद केलेली कागदपत्रे कोणास सापडल्यास त्यांनी नजीकच्या पोलीस स्टेशनशी अथवा खालील दिलेल्या पत्त्यावर त्वरित संपर्क साधावा. ज्या कोणासहि सदरची हरवलेली बॅग व वरील कागदपत्रे सापडलेली असतील व त्यांनी त्याचा दुरुपयोग केला असेल तर त्यास एच.डी.एफ.सी. बँक शाखा सांगोला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही याची गंभीरपणे नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली. दि. ०२/०६/२०२५

**सही/-**
**श्री नागेश पांडुरंग कुलकर्णी पॅनल ॲडव्होकेट**
**एच.डी.एफ.सी.लि. शाखा सांगोला**
**पत्ताः कमलकुंज वासूद रोड, न्यू इंग्लिश स्कूल जवळ, सांगोला, जि.सोलापूर-४१३३०७**
**मो.न.९८८१३६०५९१**



## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को ऑप. असोसिएशन लि., सोलापूर, ११३ (अ), सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर.

अहिल्यादेवी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, सोलापूर. **--अर्जदार**
५६७, दक्षिण कसबा, समर्थ रामदास संकुल,
पहिला मजला, दत्त चौक, सोलापूर ४१३ ००७.

**विरुद्ध**

(खालील तपशिलात नमूद केलेले थकबाकीदार सभासद)

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १२५५/२०२४-२५ | १,१६,०३९,०० | १ | **श्री. चिराग निनाद शहा** ४/२. विद्यानगर, उत्तर सदर बझार, सोलापूर |
| | | | २ | **विनय नंदकुमार शिवशरण** महालक्ष्मी नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| | | | ३ | **श्री. प्रमोद श्याम कांबळे** ४१/११६, न्यू बुधवार पेठ, राहुल चौक, सोलापूरः |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी ज्ञापले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार दि. २०/६/२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर रहावे,**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते कि वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रदद समजण्यात येईल.

आज दि. ३/६/२५ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्देसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर,**



**भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर**
**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

**WALK-IN-INTERVIEW**

A Walk in interview will be held on **23/06/2025 11:00** AM at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sr. no | Name of the Project | Name of Post | Number of Post |
|---|---|---|---|
| 1. | Horticulture Crop Pest Surveillance and Advisory Project (HORTSAP), Govt. of Maharashtra | Young Professional - I | 02 |
| 2. | Establishment of DUS Centre, at ICAR-NRCP, Solapur | Senior Research Fellow | 01 |
| 3. | Evaluation of Betacyfluthrin 90 G/L + Imidacloprid 210 G/L OD (Solomon) for bio-efficacy against thrips and aphids in pomegranate sopnsored by Bayer India Pvt. Ltd. | Young Professional - I | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website : nrcpomegranate.icar.gov.in.

Sd/-
**DIRECTOR**



करमाळा नगरपरिषद
जा.क्र.मिळकत/साशा/६४४/२०२५
दि ३/६/२०२५.

**करमाळा नगरपरिषद, करमाळा**
**जाहिर लिलाव प्रसिध्दीकरण**

याव्दारे सर्व नागरिकांना कळविणेत येते की, करमाळा नगरपरिषद मालकीचे दुकान गाळ्यांचा जाहिर लिलाव वार-बुधवार, दि.११/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. नगरपरिषदेच मिळकत विभागात आयोजित करणेत आला आहे. तरी इच्छुकांनी खाली दर्शविल्याप्रमाणे बोली बयाणा रककम भरुन लिलावात भाग घ्यावा, बोली रक्कमे शिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. बोली बयाणा रक्कम भरणेची मुदत दि. १०/०६/२०२५ रोजी दुपारी ५.०० वा. पर्यंत राहील लिलावाच्या शर्ती व अटी मिळकत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. लिलाव मंजूर व अथवा ना मंजूर करणेचा अधिकार कोणतेही कारण न देता न.प.ने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | शॉपींग सेंटरचे नाव | गाळा नं. | अनामत रक्कम | लिलाव बोलीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कै. देशभक्त ना. म. जगताप शॉ. कॉम्पलेक्स बी २ बी | ४४<br>६८ | २,००,०००/-<br>१,००,०००/- | ५०००/-<br>५०००/- |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपींग सेंटर | ५०,५१,५२,५८ | ३५,०००/- | ५०००/- |
| ३ | न.प. दवाखाना शॉर्पोग सेंटर | ३,४,१३,१४,१५,१६,१७ | १०,०००/- | २०००/- |

शिक्का

**सही/-**
**(सचिन तपसे)**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटच्या समावेशाचे श्रेय भारताला

**अहमदाबाद :** ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक यांनी शतकानंतर ऑलिम्पिकमध्ये क्रिकेट परतणे हे भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचे प्रतीक असल्याचे म्हटले आहे. त्यांनी आयपीएल आणि बीसीसीआयच्या परिवर्तनाच्या क्षमतेचे कौतुक केले. १९०० नंतर पहिल्यांदाच लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ च्या कार्यक्रमांच्या यादीत क्रिकेटचा समावेश करण्यात आला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि पंजाब किंग्ज यांच्यातील आयपीएलचा अंतिम सामना पाहण्यासाठी अहमदाबादमध्ये आलेले ऋषी सुनक म्हणाले की, २१ व्या शतकात भारताच्या प्रभावाचे हे लक्षण आहे. १०० वर्षांत पहिल्यांदाच ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे आगमन भारतामुळे झाले आहे. क्रिकेट चाहते सुनक गेल्या काही वर्षांत आयपीएलने आणलेल्या बदलांबद्दल बोलले. ते म्हणाले की आयपीएलने क्रिकेट बदलले आहे. मला वाटतं कोणताही क्रिकेटपटू, तो कुठूनही असो, त्याच्या कारकीर्दीच्या कोणत्याही टप्प्यावर आयपीएलमध्ये खेळू इच्छितो. महिला क्रिकेटसाठीही हे खूप चांगले ठरले आहे कारण महिला प्रीमियर लीगमध्ये अनेक मुली खेळत आहेत. इंग्लंडच्या क्रिकेटवर आयपीएलच्या परिणामाबद्दल बोलताना त्यांनी जेकब बेथेलसारख्या खेळाडूंच्या अलिकडच्या कामगिरीचे उदाहरण दिले. त्यात खेळणाऱ्या इंग्लंडच्या खेळाडूंकडे पाहा आणि त्या सुधारत आहेत. मी गेल्या आठवड्यात एजबॅस्टन येथे इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडीज एकदिवसीय सामना पाहत होतो. जेकब बेथेलने एक शानदार खेळी केली, हे सुनक यांनी आवर्जून सांगितले.

### नरेंद्र मोदी स्टेडियम रंगले देशभक्तीच्या रंगात



**अहमदाबाद :** रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यातील आयपीएलच्या अंतिम सामन्यापूर्वी समारोप समारंभात 'सबसे आगे होंगे हिंदुस्तानी' आणि 'दुश्मन के छक्के छुडा दे, हम इंडियावाले'सारख्या गीतांची धूम होती. या गीतांमुळे नरेंद्र मोदी स्टेडियम देशभक्तीच्या रंगात रंगले. जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट स्टेडियममध्ये सामन्याची माहिती देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या डिजिटल बोर्डवर भारतीय सशस्त्र दलांचा सन्मान, सॅल्यूट टू आर्म्ड फोर्सेस आणि भारतीय सैन्याचे आभार असे संदेश झळकत होते. बॉलिवूड गायक शंकर महादेवन यांनी त्यांचे पुत्र सिद्धार्थ आणि शिवम यांच्यासह प्रेक्षकांचे मनोरंजन केले. या तिघांनी लक्ष्य, कंधे से मिलते हैं कंधे या युद्धावर आधारित चित्रपटाचे शीर्षक गीत आणि ए वतन मेरे आबाद रहे तू आणि वंदे मातरम सारखी गाणी गायली.

### जिल्हा स्क्वॉश निवड चाचणी स्पर्धा उद्या श्रीराम स्कूलमध्ये

**सोलापूर, दि. ३ जून-**


सोलापूर जिल्हा स्क्वॉश संघटनेच्या वतीने विविध वयोगटांच्या ११, १३, १५, १७ व १९ वर्षे मुले व मुली तसेच पुरुष व महिला यांची जिल्हा निवड चाचणी स्पर्धा गुरुवार ५ जून दुपारी ४ वाजता पदमशाली शिक्षण संस्था संचालित डी. आर. श्रीराम इंग्लिश मेडीयम स्कूल कन्ना चौक येथे होईल. या स्पर्धेसाठी ११ वर्षे वयोगटासाठी १ जानेवारी २०१५नंतर, १३ वर्षासाठी १ जानेवारी २०१३नंतर, १५ वर्षासाठी १ जानेवारी २०११नंतर, १७ वर्षासाठी १ जानेवारी २००९नंतर तर १९ वर्षांसाठी १ जानेवारी २००७ नंतर जन्मलेले खेळाडू पात्र आहेत. खेळाडूंनी आवश्यक कागदपत्रे व साहित्यासह स्पर्धेस उपस्थित रहावे. इच्छुक खेळाडूंनी मैदानावर गंगाराम घोडके (मो. ९४२३७१७२७७), अथवा संतोष पाटील (९१५६२३०००९ यांच्याशी संपर्क साधावा. यात खेळाडूंनी सहभागी होण्याचे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष केतन शहा, उपाध्यक्ष प्रा. संतोष गवळी यांनी केले आहे.

### ऑस्ट्रेलिया पाकिस्तानचा दौरा करण्याची शक्यता

**कराची :** पुढील वर्षाच्या सुरुवातीला पांढऱ्या चेंडूच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलिया संघ पाकिस्तानला पाठवण्यास सहमती दर्शविली आहे, असे क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले. ग्रीनबर्ग म्हणाले की क्रिकेट ऑस्ट्रेलिया अधिक दौऱ्यांसाठी पाकिस्तानला जाण्यास उत्सुक आहे आणि दोन्ही देशांच्या मंडळांमध्ये चर्चासुरू आहे.

# सिंधू, सात्त्विक-चिराग जोडी दुसऱ्या फेरीत

## सेन आणि प्रणॉय इंडोनेशिया ओपनमधून बाहेर



◆ **जकार्ता, ३ जून**

दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू आणि सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या पुरुष दुहेरी जोडीने मंगळवारी येथे इंडोनेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेच्या उप उपांत्यपूर्वमध्ये प्रवेश केला. परंतु लक्ष्य सेन आणि एचएस प्रणॉय पहिल्या फेरीत पराभूत झाल्याने बाहेर पडले.

सिंधूने महिला एकेरीत एक तास १९ मिनिटे चाललेल्या रोमांचक सामन्यात तिची प्रतिस्पर्धी जपानची नोझोमी ओकुहाराचा २२-२०, २१-२३, २१-१५ असा पराभव केला. आता १६ व्या फेरीत तिचा सामना थायलंडच्या सहाव्या मानांकित पोर्नपावी चोचुवोंगशी होईल.

सामन्यानंतर सिंधू म्हणाली, पहिल्या फेरीत जिंकणे महत्त्वाचे आहे कारण त्यामुळे माझे मनोबल निश्चितच उंचावेल. मी पहिल्या फेरीत पराभूत होत आहे, त्यामुळे असे सामने जिंकणे माझ्यासाठी खूप उपयुक्त आणि महत्त्वाचे आहे.

एक तास पाच मिनिटे चाललेल्या पुरुष एकेरीच्या सामन्यात जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या शी यू क्यू विरुद्ध लक्ष्य सेनने कडवी झुंज दिली. पाठीच्या दुखापतीतून सावरल्यानंतर २३ वर्षीय सेनने पुनरागमन केले. गेल्या आठवड्यात मलेशिया ओपनमध्ये दुखापतीमुळे त्याला सामन्यातून माघार घ्यावी लागली होती परंतु येथे त्याने चांगली कामगिरी केली.

पहिला गेम सहज गमावल्यानंतर आणि दुसऱ्या गेममध्ये ११-१७ ने पिछाडीवर राहिल्यानंतर, सेनने जोरदार पुनरागमन केले. त्याने एक मॅच पॉईंट वाचवला आणि गेम २२-२० ने जिंकून सामना निर्णायक गेममध्ये नेला. परंतु त्यानंतर तो त्याची लय राखू शकला नाही.

पुरुष एकेरीत, एचएस प्रणॉय देखील या मधून बाहेर पडला. १,४५०,००० बक्षीस रकमेच्या स्पर्धेत त्याला इंडोनेशियाच्या अल्वी फरहानविरुद्ध १७-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला.

त्यानंतर सात्त्विक आणि चिराग या पुरुष दुहेरी जोडीने ६७ मिनिटे चाललेल्या पहिल्या फेरीच्या सामन्यात इंडोनेशियाच्या लिओ रॉली कार्नांडो आणि बागास मौलाना यांना १८-२१, २१-१८, २१-१४ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

सिंधू आणि ओकुहारा यांच्यातील चुकांनी भरलेला सामना रोमांचक होता.□त्यामध्ये अनेक गेम पॉईंट्स आणि मॅच पॉईंट्स देण्यात आले. सिंधूने पहिला गेम २२-२० असा जिंकला. या दरम्यान सिंधूने एक गेम पॉईंट वाचवला आणि महत्त्वाच्या क्षणी आक्रमक फटके मारले.

निर्णायक गेमच्या ब्रेकपर्यंत सिंधू ११-९ अशी आघाडीवर होती आणि त्यानंतर तिने सलग विजेते ठरत आठ मॅच पॉईंट मिळवले आणि पाचव्या मॅच पॉईंटचा फायदा घेत पुढच्या फेरीत प्रवेश केला.

महिला एकेरीच्या सामन्याच्या मध्यभागी मालविका बनसोडने इंडोनेशियाच्या पुत्री कुसुमा वर्दानीविरुद्ध निवृत्ती घेतली. अनुपमा उपाध्याय कोरियाच्या किम गा युनकडून १५-२१, ९-२१ असा सरळ गेममध्ये पराभूत झाली तर रक्षिता रामराज थायलंडच्या सुपानिदाकडून २१-१४, १५-२१, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला. ◂(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेचा थरार आजपासून पुण्यात रंगणार

## अभिनेत्री चित्रांगदा सिंग उद्घाटन समारंभाचे प्रमुख आकर्षण

### उद्घाटन समारंभात नेत्रदीपक ड्रोन शो प्रेक्षकांचे लक्ष्य वेधणार

### प्रेक्षकांना मोठ्या प्रमाणात उपस्थित राहण्याचे रोहित पवार यांचे आवाहन

**पुणे, दि. ३ जून-**

क्रिकेट श्यानिकांमध्ये प्रचंड उत्सुकता असलेल्या अदानी महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२५ स्पर्धेचा थरार आज (४ जून २०२५) पासून महाराष्ट्र क्रिकेट संघटना, गहुंजे येथील मैदानावर रंगणार आहे. अदानी समूहाचे मुख्य प्रायोजकत्व लाभलेल्या आणि महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने आयोजित केलेल्या या स्पर्धेत क्रिकेट शौकिकाना टी २० क्रिकेटचा आनंद घेता येणार आहे. महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग(डब्लूएमपीएल) स्पर्धेला ५ जून पासून प्रारंभ होणार असून एमपीएल आणि डब्लूएमपीएल या दोन्ही स्पर्धांचा शानदार उद्घाटन समारंभ आज ४ जून रोजी सायंकाळी प्रेक्षकांची मने जिंकणार आहेत. लोकप्रिय अभिनेत्री चित्रांगदा सिंग हिची उपस्थिती आणि नेत्रदीपक ड्रोन शो ही उद्घाटन समारंभाची खास आकर्षणे ठरणार आहेत. समाजातील विविध क्षेत्रांमधील नामवंत व्यक्ती यावेळी उपस्थित राहणार आहेत.




महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहित पवार म्हणाले की, सर्व सामान्य क्रिकेट प्रेमींनाही या उच्च दर्जाच्या भरपूर आनंद घेता यावा याकरिता सर्व प्रेक्षकांना सर्व सामन्यांसाठी विनामूल्य प्रवेश देणार आहे. तसेच, प्रेक्षकांसाठी पार्किंग व्यवस्था आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे.

ते पुढे म्हणाले की,महाराष्ट्रातील गुणवान व उदयोन्मुख क्रिकेट पटूना पाठिंबा व प्रोत्साहन देण्यासाठी प्रेक्षकांनी प्रचंड संख्येने स्टेडियम मध्ये उपस्थित रहावे असे आवाहन आम्ही करीत आहोत. या सर्व सामन्यांचे स्टार स्पोर्टस २ या वाहिनावरून तसेच जियो सिनेमा वरून थेट प्रक्षेपण करण्यात येणार असल्याने पुण्याबाहेरील प्रेक्षकांना ही या सामन्यांचा आनंद घेता येणार आहे. आज, बुधवार, ४जून रोजी सलामीच्या लढतीत रत्नागिरी जेट्स विरुद्ध इगल नाशिक टायटन्स यांच्यात लढत रंगाने असून त्यामुळे या स्पर्धेचा रंगतदार प्रारंभ होईल अशी अपेक्षा आहे.

# नियमित सायकल चालवल्याने शारीरिक अन् मानसिक आरोग्य सुधारते



### सहायक प्रसिद्धी अधिकारी यादव

### सायकल दिनानिमित्त सायकल रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि. ३ जून-**

नियमित सायकल चालवल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारते. सायकल चालवल्याने वजन कमी होते, हृदय निरोगी राहते, स्नायू मजबूत होतात आणि मेंदूची कार्यक्षमता वाढते. आरोग्या सोबतच सायकलिंगने जीवाश्म इंधनाचा वापर कमी होतो, ज्यामुळे हवा आणि ध्वनी प्रदूषण कमी होते आणि पर्यावरण सरंक्षण होते म्हणून प्रत्येकाने सायकलिंगला दैनंदिन दिनचर्येचा भाग बनवावे, असे आवाहन सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव यांनी केले.

भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरो, रॉयल रायडर्स सायकलिंग असोसिएशन आणि सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्या वतीने जागतिक पर्यावरण आणि सायकल दिनानिमित्त सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीच्या उद्घाटनप्रसंगी यादव बोलत होते. यावेळी निवृत्त अधिकारी सतीश घोडके, रॉयल रायडर्स सायकलींग असोसिएशनचे अध्यक्ष अभिनय भावठाणकर, निवृत्त जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजकुमार कांबळे, पर्यावरण विभागाचे व्यवस्थापक स्वप्नील सोलनकर आणि कार्यालय सहायक जे एम हन्नुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

शाश्वत भविष्यासाठी सायकलिंग ही यावर्षीची जागतिक सायकल दिनाची संकल्पना आहे. सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव आणि पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे यांचे हस्ते सकाळी ६.३० वाजता महापालिकेच्या आवारातून हिरवी झेंडी दाखवून सायकल रॅली सुरु करण्यात आली. सोलापूर महापालिका, पार्क चौक, सरस्वती चौक, शिवाजी महाराज चौक, एकेरी वळण, नवी पेठेत प्रवेश, लकी चौक, हुतात्मा बागीचा रस्ता, पार्क चौक, डफरीन चौक वळण परत सोलापूर महापालिका आवर येथे समारोप करण्यात आला. रॅलीच्या मार्गात सायकल प्रेमींनी भारत माता की जय, वंदे मातरम, प्लास्टिक हटवा, कापडी पिशवी वापरा, प्रदूषण टाळा पर्यावरण वाचवा, झाडे लावा, झाडे जगवा आदी घोषणा दिल्या. यावेळी उपस्थित सायकल प्रेमीना पर्यावरण पूरक कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात आले.

> **पर्यावरण संवर्धन करावे**
>
> सायकलिंगच्या फायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी २०१८ पासून दरवर्षी ३ जून रोजी जागतिक सायकल दिन साजरा केला जातो. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर महानगरपालिकाकडून पर्यावरणाच्या संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात कामे होत आहेत. यामध्ये सोलापूरकरांनी सहकार्य करावे.
>
> **- अक्षय मोरे, पर्यावरण अधिकारी**



# मॉडेल अकादमी, साळुंखे अकादमीची घोडदौड

### बंदपट्टे करंडक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा



**सोलापूर, दि. ३ जून-**

बंदपट्टे करंडक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकादमी व नागेश साळुंखे क्रिकेट अकादमीने विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

मास्टर्स अकादमीने आयोजित केलेली ही स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू आहे. मंगळवारी झालेल्या सामन्यात मॉडेल अकादमीने युनायटेड क्रिकेट क्लबचा ९ धावांनी पराभव केला. वेदांत शिंदे सामन्याचा मानकरी ठरला. त्यास अक्षय हावळे व राजवर्धन जिल्ला यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. दुसऱ्या सामन्यात नागेश साळुंखे क्रिकेट अकॅडमीने विहान क्रिकेट अकादमीवर १२४ धावांनी विजय मिळविला. १९ धावांत ६ बळी टिपणारी सौम्यश्री भांरगगुळे सामन्याची मानकरी ठरली. तिला अरिहंत स्कूलचे संचालक अजय पोन्नम यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी राजेश येमुल, दत्ता बडगू, शिवराज झुंजे व नागेश साळुंखे आदी उपस्थित होते.

> **संक्षिप्त धावफलक :**
>
> **मॉडेल क्रिकेट ॲकॅडमी :** ३० षटकांत सर्व बाद १७१(आध्या पाटील ३३, वेदांत शिंदे २६, चिरंजीव शेटे ४-४१, विवेक चव्हाण २-२६) वि. वि. **युनायटेड क्रिकेट क्लब :** ३० षटकात ४ बाद १६२( वरद चिपडे ५४, चिरंजीव शेटे ३२).
>
> **नागेश साळुंखे क्रिकेट अकॅडमी :** ३० षटकात ४ बाद २०७ (रुद्र चौगुलेने नाबाद ९७, श्रेयस पात्रे नाबाद ४७) वि. वि. **विहान क्रिकेट ॲकॅडमी :** २२.१ षटकात सर्व बाद ८४ (यशराज झुंजे १४, सौम्यश्री भांगरगुळे ६-१९ )

# आदर्श स्कूलमध्ये फुटबॉलच्या मैदानाचे उद्‌घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ३ जून-**

येथील आदर्श पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मधील बास्केटबॉल व फूटबॉल मैदानाचे उद्घाटन करमाळा तालुक्याचे माजी आमदार संजयमामा शिंदे व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे सहाय्यक आयुक्त मारुती फडके,

मिनालताई साठे, अजित पवार, उतरेश्वर जानराव, संतोष सुर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यायाप्रसंगी संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, सचिव दयानंद सुरवसे, जेष्ठ संचालिका आशाताई सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, संस्थेचे इतर पदाधिकारी तसेच सीबीएसई विभागाचे विभागप्रमुख अन्वर मुलाणी, सैनिकी स्कूलचे प्राचार्य राऊत, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शकीलाबी सय्यद, प्राथमिक विभाग प्रमुख आयेशा मुलाणी आदी उपस्थित होते.

# मानस गायकवाड व सिद्धी देशमुख विजेते

### १५ वर्षांखालील जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धा

### विविध वयोगटात श्रेयस, उत्कर्षा, नियान, तन्वी अव्वल



**सोलापूर, दि. ३ जून-**

जिल्हास्तरीय १५ वर्षांखालील निवड बुद्धिबळ स्पर्धेत अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय खेळाडू मानस गायकवाड याने सात पैकी सात गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. मुलींच्या गटात करमाळाच्या बिगरमानांकित सिद्धी देशमुख हिने उत्कृष्ट खेळ करत पाच पैकी साडेचार गुणांसह विजेतेपद व आकर्षक चषक पटकाविला.

सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने व सोलापुर चेस अकॅडमीच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धेत श्रेयस कुदळे, वेद आगरकर, हर्ष हलमल्ली यांचे प्रत्येकी साडेपाच गुण झाल्यामुळे टायब्रेक मध्ये बोकोल्स गुणपद्धतीवर अनुक्रमे दुसरा, तिसरा, चौथा क्रमांक प्राप्त केला. मुलींच्या गटात बर्शीची सान्वी गोरे, सृष्टी मुसळे यांनी चार गुणांसह दुसरा व तिसरा क्रमांक व श्रेया संदुपटला हेने ३.५ गुणांसह चौथा क्रमांक पटकावित सोलापुर जिल्हा संघातील स्थान निश्चित केले. चोघांचीही निवड संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झालेली आहे.

सात रस्ता येथील इरण्णा उपलप मंगल कार्यालय येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण बँक ऑफ महाराष्ट्राचे शाखा प्रमुख निरंजन झिरपे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे सचिव सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, राष्ट्रीय पंच संतोष पाटील, वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे, यश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. आपल्या अध्यक्षीय मनोगतात झिरपे यांनी बुद्धिबळाचे महत्व खेळाडू व पालकांना विषद करत खेळाडूंनी राज्य व राष्टीय पातळीवर उज्वल यश प्राप्त करून सोलापूरचा नोवलौकिक वाढवावा असे सांगितले. विजेत्या खेळाडूंना आकर्षक, मेडल्स मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. दहा वर्षाखालील मुलांच्या गटात श्रेयस इंगळे याने, मुलींच्या गटात उत्कर्षा लोखंडे हिने चांगली कामगीरी करत अव्वल स्थान मिळविले. तसेच ७ वर्षाखालील गटाचे जेतेपद नियान कंदीकटला व तन्वी बागेवाडी हिने पटकाविले. वेदिका स्वामी, हर्षदा तमदंडी, रियांश चाकोते, भुनेश्वर जाधव, सुयश चव्हाण यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

विजेत्या खेळाडूंचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी अभिनंदन केले.

> **अंतिम निकाल (अनुक्रमे गुण व बोकोल्स गुणांसह)**
>
> **१५ वर्षे मुले:** मानस गायकवाड- ७, श्रेयस कुदळे - ५.५(३१), वेद आगरकर - ५.५(२८), हर्ष हलमल्ली - ५.५(२६), आरुष कंदले - ५(३३.५), स्वानंद तपकीरे - ५(२९.५), वेदांत मुसळे - ५(२७.५), अरित्र दास - ५(२६), श्लेष उदगीरी - ५(२३.५), आयुष जानगवळी - ५(२३) **मुली:** सिद्धी देशमुख - ४.५, सान्वी गोरे - ४(१५), सृष्टी मुसळे - ४(१२), श्रेया संदुपटला - ३.५, श्रावणी देवनपल्ली - ३(१२.५), फराह शेख - ३(१२), मानवी चौगुले - २.५, अनन्या उलभगत - २(१४.५), आरोही दलाल - २(१२.५), गोवर्धनी मिठ्ठा - २(१०.५).
>
> **१० वर्षे मुले:** श्रेयश इंगळे - ५.५, सिद्धांत कोठारी- ५(३०), शशांक जमादार - ५(२७), प्रथम मुदगी- ४.५(२७.५), श्लोक चौधरी - ४.५(२६.५). **मुली:** उत्कर्षा लोखंडे - ३.५, संस्कृती जाधव - ३(१५), पृथा ठोंबरे - ३(१२), दूर्वा नवले - २.
>
> **७ वर्षे मुले:** नियान कंदीकटला - ३, ओजस पवार - २(२२), अद्विक ठोंबरे - १(१७)विराज शेंडगे - १(१६).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



## 'स्वराज्य'च्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी अक्कलकोटचे चंद्रकांत वेदपाठक

**अक्कलकोट, दि. ३ जून-**
स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्ष पदी अक्कलकोटचे सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत रामचंद्र वेदपाठक यांची निवड करण्यात आली त्याच बरोबर सोलापूर जिल्हा प्रभारी म्हणून इफ्तेकार कामतीकर तसेच सोलापूर शहराध्यक्षपदी विनोद भोसले यांची निवड करण्यात आली संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिपक कांबळे व संस्थापक महासचिव कमलेश शेवाळे यांनी स्वराज्य चौथ्या वर्धापन दिवशी ठाणे येथील कार्यक्रम ात केली आहे. स्वराज्यचे चतुर्थ वर्धापन दिन ठाणे रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेल्या रेल्वे सभागृहात पार पडला. यावेळी अक्कलकोट तालुक्यात स्वराज्य माध्यमातून सामाजिक क्षेत्रात सर्वोत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल चंद्रकांत वेदपाठक यांच्या सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आला, स्वराज्य च्या जिल्हाध्यक्ष पदी निवडीचे पत्र देऊन बढती देण्यात आल्याने सर्वत्र वेदपाठक यांचे अभिनंदन होत आहे. याप्रसंगी संघटनेच्या प्रदेशाध्यक्षा धनश्री उत्पात, विश्वस्त संगीता बोराडे, सविता तावरे उमेश काशीकर, प्रशांतजी निकम संचालक सुरेखा कोकरे, रविंद्रजी करंगुटकर, विशाल बोराडे, संदिप जाधव वैशालीताई कांबळे स्वराज्यचे सोलापूर शहर अध्यक्ष विनोद भोसले, जिल्हा प्रभारी इफ्तेकार कामतीकर, माजी समन्वयक सुनील पंडित, इम्तियाज बागवान, सुनील बेंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या निवडीचे गुरुनाथ पोतदार, दिपक पोतदार, श्रीमती मीराबाई बुद्रुक, पंकज कोरेकर, काशिनाथ पोतदार सौ. वर्षाताई चव्हाण, गौरीशंकर चनशेट्टी, दयानंद बिडवे, बलभीम पवार, शिवलिंगप्पा संगापुरे, अप्पासाहेब धुमाळ आदींनी त्यांचे अभिनंदन केले.



## शिक्षक विजय माने यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**टेंभुर्णी, दि. ३ जून-**
बबनराव शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक या पदावर कार्यरत असलेले कन्हेरगांव तालुका माढा येथील सुपुत्र विजय बब्रुवान माने व त्यांच्या पत्नी अनिता माने यांचा कन्हेरगांव ग्रामस्थांच्या वतीने सपत्नीक नागरी सत्कार करण्यात आला. कन्हेरगांव (ता. माढा) येथे ३ जून रोजी विजय बब्रुवान माने यांच्या सेवानिवृत्तीबद्दल सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विजय माने यांनी अकोले खुर्द येथील बबनराव शिंदे माध्यमिक विद्यालय २७ वर्ष सेवा केली आहे. ते यापुढेही समाजासाठी काम करत राहतील असा विश्वास प्रा. हनुमंत पाटील यांनी व्यक्त केला. माजी चेअरमन नागेश मोरे व प्रा. हनुमंत पाटील यांच्या हस्ते विजय माने, अनिता माने, प्रसार माने, भारती माने यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, सोसायटीचे माजी चेअरमन नागेश मोरे, प्रा. हनुमंत पाटील, पोपट मोरे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुधीर मोरे, सतीश हांडे, माजी ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ कदम, जालिंदर केदार, राजेंद्र केदार, विकास माने, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संजय डोके पाटील, तानाजी पाटील, अमोल पाटील, महेश माने, सौरव माने, गजानन डोके-पाटील, दत्तात्रय डोके, प्रसार माने उपस्थित होते. आभार विजय माने यांनी मानले.



## जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिरचे दहावी परीक्षेत यश

**कुर्डूवाडी, दि. ३ जून-**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडीने घवघवीत यश मिळवले. यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे - ओम वायचळ ९७.२० टक्के प्रथम, साईराज वायचळ ९२ टक्के द्वितीय, सायली शिंदे ९१.२० टक्के तृतीय, राधिका सुतार ८८.८० टक्के चतुर्थ, यश गाडे ८८.६० टक्के पाचवा क्रमांक. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, सचिव अजित वायचळ, मुख्याध्यापिका सारिका गोटे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, प्रशासन अधिकारी शाहू सतपाल केंद्र समन्वयक लक्ष्मण कारंडे आदींनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक जयंत माळी, विषय शिक्षक मुख्याध्यापिका सारिका गोटे, किशोर मोहोळे, आकाश घोडके, श्रीमती गीतांजली शिंदे, श्रीमती साधना झोळ यांचे मार्गदर्शन लाभले.

## ऐन पावसाळयाच्या तोंडावर भाजीपाल्याचे दर कडाडले

**पिलीव दि ३ जून -**
संपूर्ण महाराष्ट्रात यंदा मे महिन्यातच समाधानकारक पाऊस झाला आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतात असणारा भाजीपाला पावसाच्या पाण्यामुळे खराब झाला. यामुळे बाजारात भाज्यांचे दर कडाडले विशेषतः पालेभाज्यांचे दर अक्षरशः गगनाला भिडले आहेत. यामध्ये कोथींबीर ४० ते ५० रुपये भेळा, मेथीच्या भाजीची पेंडी ३० रुपये, चुका ३०, शेपु ३० तर वांगे १०० रुपये किलो, गवार १२० रुपये किलो, कारले १२ रूपये किलो, हिरवी मिरची ८० रुपये किलो, दोडका ८० ते १०० रुपये किलो, बाजारात सध्या फक्त बटाटा ३० रुपये किलो व कांदा २० रुपये किलो अश्या दोन भाज्या सोडल्या तर सर्वच भाज्यांचे दर गगनाला भिडले आहेत. सध्या पाऊस झाल्यामुळे विहीरींना पाणी भरपूर आहे. पण आता लावलेल्या भाज्या बाजारात विक्रीला येण्यासाठी किमान दोन महिन्याचा तर कालावधी लागु शकतो. तसेच सध्या पावसाळा सुरु आहे. जर अजुन पुन्हा पाऊसच सुरु झाला तर भाजीपाला येणयास पुन्हा उशीर होऊ शकतो.

# गर्भवती महिलेची राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या

- मोहोळ तालुक्यातील चिंचोली काटी येथील घटना
- आत्महत्या नसून खून झाल्याचा नातेवाईकांचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ३ जून-**
सासरच्या छळाला कंटाळून एका गर्भवती विवाहित महिलेने राहत्या घराच्या चौकटीला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना चिंचोली काटी येथे ३ जून रोजी साडे अकराच्या दरम्यान घडली. परंतु हा खून असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असून खून की आत्महत्या? असा संभ्रम निर्माण झाला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आशा पवन भोसले ( वय २२ रा.चिंचोली काटी ता. मोहोळ) या गर्भवती असलेल्या विवाहित महिलेने आपल्या राहत्या घराच्या चौकटीला गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत या घटनेची मोहोळ पोलिस ठाण्यात अकस्मात मयत अशी नोंद करण्यात आली आहे. याबाबत बोलताना मुलीचे काका पांडुरंग शिंदे ( रा. कर्देहळी ) म्हणाले की मुलीचे माहेर रायचूर आहे. यापूर्वी म्हणजे आशाचे लग्न झालेपासून सतत वारंवार तिला मारहाण करणे, जाच करण, अशा घटना घडल्या आहेत. यापूर्वी एक वेळा तिने औषध पिवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. महिला तक्रार निवारण केंद्रातही याबाबत तक्रारी केल्या होत्या. तात्पुरता समझोता व्हायचा. परंतु पुढे त्रास चालूच असायचा. मृत आशाला तीन वर्षाची एक मुलगी असून मृत आशा सध्या गर्भवती आहे. अशा परिस्थितीत ही घटना घडली असून याबाबत उशिरापर्यंत मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

याची खबर अंजूबाई पांडुरंग शिंदे (वय ४७, रा. कर्देहळ्ळी ता. अक्कलकोट) यांनी दिली आहे. पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे म्हणाले, अकस्मात मयत अशी नोंद करण्यात आली आहे. मृत विवाहितेचे नातेवाईक म्हणण्यानुसार फिर्याद घेतली जाईल.

## राष्ट्रीय महामार्गावर वाहन चालकांनी लेनचा करावा वापर

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३ जून-**
राष्ट्रीय महामार्गावरुन मोटरसायकल स्वारांनी जाताना डाव्या बाजूच्या छोट्या लेनचा वापर करावा तसेच मोठ्या वाहनांनी छोट्या लेन लगत असलेल्या मोठ्या लेन मधून जावे. हायवे वर उजव्या बाजूला असलेली मोठी लेन वाहनांना ओव्हरटेक करण्यासाठी मोकळी ठेवावी. परिणामी यामुळे अपघात घडणार नसल्याची माहिती मंगळवेढा वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार संभाजी यादव यांनी दिली.

राज्यामध्ये केंद्र सरकारने अनेक ठिकाणी महामार्ग तयार केले आहेत. या महामार्गावर मोठ्या वाहनासाठी दोन लेन व छोट्या मोटर सायकलसाठी एक लेन तयार केलेली असते. मोटर सायकलस्वार हे मोठ्या लेनमधून जात असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असून मोठ्या लेनमध्ये अपघात झाल्यास मोटर सायकल स्वारास विमा मिळू शकत नाही. त्यामुळे मोटर सायकलस्वारांनी आपल्या नियमाचे पालन करावे. राष्ट्रीय म हामार्गलगत असलेल्या गावाजवळ अनेक ठिकाणी उड्डाण पूल असून गावात जाण्यासाठी सर्व्हिस रोड तयार केलेले आहेत. या ठिकाणीही रस्त्याच्या डाव्या बाजूनेच वाहन चालविणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी उलट दिशेनेही वाहने येत असल्यामुळे अनेक ठिकाणी अपघातही घडले आहेत.

## आष्टी येथे ग्रामस्थांतर्फे बँक कर्मचाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३ जून-**
आष्टी (ता. मोहोळ) येथील श्री गोपाळकृष्ण मंदीर बांधकाम समिती व समस्त ग्रामस्थांच्या यांचे वतीने बँक ऑफ इंडिया च्या २ वर्षातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल शाखेतील कर्मचाऱ्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.



आष्टी शाखेतील कर्मचाऱ्यांचा गावातील नागरिकांनी नुकताच भव्य नागरी सत्कार करून गौरव केला. हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून, बँकिंग सेवा आणि समाज यांच्यातील विश्वासाच्या नात्याला उजाळा देणारा स्तुत्य उपक्रम ठरला.गेल्या दोन वर्षांत या शाखेतील कर्मचाऱ्यांनी केवळ कर्ज मंजुरी किंवा व्यवहारापुरती भूमिका बजावली नाही, तर शेतकरी संकट, कोविड काळातील अडचणी, महिला बचत गटांना प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देताना माणुसकीने काम केलं. त्यांच्या सेवाभावाची ही ग्रामस्थांनी दिलेली जाणीवपूर्वक दाद होती. गोपाळकृष्ण मंदीर येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी झोनल मैनेजर चंद्रशेखर मंत्री, कृषी व वित्त विभाग, सोलापूर झोनचे प्रमोद पवार, उपविभागीय कृषी अधिकारी रामचंद्र माळी, तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे उपस्थित होते. आष्टी शाखेतील वरिष्ठ शाखा प्रबंधक राहुल तळेकर, कृषी अधिकारी विष्णुकांत भुसारे, अधिकारी माधवराज करपे, सम ाधान पाखरे, सत्यवान शेळके कॅशिअर, सचिन भांगे लिपिक, नरेंद्र सारबंदे लिपिक, गौरेश डावरे लिपिक, शिपाई माऊली शिंदे, अनिकेत शेळके यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात ग्रामस्थांनी कर्मचाऱ्यांना शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन गौरव केला. यावेळी लोकनेते शुगर्सचे संचालक मदनसिंह पाटील, जिल्हा काँग्रेसचे देवानंद गुंड पाटील, शाखा व्यवस्थापक राहुल तळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम ाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन बाळासाहेब पाटील यांनी केले. तर आभार जे.के. गुंड यांनी म ानले. या सन्मान सोहळ्याला दत्ता पवार, अतुल माळी, राजाभाऊ गुंड पाटील, खासेराव पाटील, मानसिंग पाटील, भगत सर, मेजर व्यवहारे, डॉ. पांडुरंग गुंड, उद्योजक अनिकेत पाटील, श्याम कांबळे, संजय आष्टीकर, वसुदेव गुंड, रामेश्वर व्यवहारे, बाळासाहेब शेवाळे, नंदू गुंड, अमरसिंह पाटील, सनी पाटील उपस्थित होते.



## पर्यावरण रक्षक सायकल वीरांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जून-**
जागतिक सायकल दिन (३ जून) आणि जागतिक पर्यावरण दिन (५ जून) या निमित्ताने पंढरपूर सायकल क्लबच्या सातव्या वर्धापन दिनी दैनंदिन कामात सायकल वापरणाऱ्या पर्यावरण रक्षक सायकल वीरांचा सन्मान करण्यात आला.

युटोपियन साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष उमेश परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्रशांत खलीपे, डॉ. आरिफ बोहरी, युवा नेते प्रणव परिचारक, जहूर खतीब आदी उपस्थित होते. पंढरपूर सायकल क्लबचे उपाध्यक्ष सुरज अष्टेकर यांनी स्वागतपर भाषण केले. कार्यकारी अध्यक्ष अभिजीत कुलकर्णी यांनी क्लबची माहिती सांगितली. रेखाताई चंद्रराव यांनी झाड वाचवण्याची शपथ घेतली. संतोष पाटोळे आणि सुनील शिरसागर यांनी सन्मानित व्यक्तींची माहिती वाचली. प्रकाश शेटे यांनी आभार मांनले. रेखाताई चंद्रराव यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विजयकुमार कापसे, आनंदा माने, भिकाजी जाधव, शंकरराव कदम, श्रीकांत ढाळे, असलम बेदरेकर, वंदना सुरवसे, वंदनाताई बुधनेर यांना गौरवण्यात आले. गणेश अधटराव (२५६ सायकल वाटप) आणि मयूर परिचारक (१३० सायकल वाटप) यांना रोप देऊन सत्कार करण्यात आला.



## सांगोल्यात तालुकास्तरीय कविसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ जून-**
सांगोल्यातील अर्बन बँक सभागृहामध्ये तालुकास्तरीय कविसंमेलन उत्साहात पार पडले. याप्रसंगी ३० कवी कवयित्रींचा सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष रं.ता. चोरमुले, प्रमुख पाहुणे डॉ. अविनाश सांगोलेकर, प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, डॉ. प्रभाकर माळी, डॉ. कृष्णा इंगोले, उन्मेष आटपाडीकर, विकास देशपांडे, प्रा. धनाजी चव्हाण उपस्थित होते.

कवी संमेलनामध्ये डॉ. कृष्णा इंगोले, आनंद लोकरे यांनी कविता सादरीकरण केले. तसेच डॉ. प्रभाकर माळी, प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, डॉ. अविनाश सांगोलेकर, रं.ता.चोरमुले यांनी मार्गदर्शन केले. कवी संमेलनासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद, नगर वाचन मंदिर, लायन्स क्लब, रोटरी क्लब, अर्बन बँक सांगोला पदाधिकारी, सदस्य, सभासद उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. धनाजी चव्हाण यांनी तर सूत्रसंचालन सुनील जवंजाळ यांनी केले. उन्मेष आटपाडीकर यांनी आभार मानले.

### यांचा झाला सन्मान

या कविसंमेलनामध्ये शिवाजी बंडगर, राधिका प्रेमसंस्कार, तानाजी वाघमारे, साबळे गुरुजी, ना.मा.कांबळे, ड.उदय दौंडे, निलिमा कुलकर्णी, पुष्पलता मिसाळ, सुशिला नांगरे-पाटील, योजना मोहिते, मनीषा ठोंबरे, हर्षदा गुळमिरे, सुवर्णा तेली, गौसपाक मुलाणी, गीता गुळमिरे, आश्लेषा मोदी, सुप्रिया कांबळे, जान्हवी सावंत, सीमा गायकवाड, सुरेखा कुलकर्णी, जयश्री पाटील, प्रज्ञा देशपांडे, विद्या शिर्के, बशीर तांबोळी, वंदना पाटणे, श्रद्धा गुळमिरे, श्वेता कारंडे, संगिता केसकर, सुनील जवंजाळ या कवी कवयित्रींचा तसेच संतोष कसगावडे, श्रीकांत बंडगर यांचा सन्मान करण्यात आला.

## शारदादेवी करमाफी अभियान योजना जिल्ह्यात राबवावी : सरपंच मागाडे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ जून-**
सध्या खासगी शाळांचे पेव फुटल्याने पटसंख्येअभावी जि.प. शाळा बंद पडू लागल्या आहेत. गरीब मुलांना शिक्षणाचे धडे देणाऱ्या जि.प.शाळा टिकण्यासाठी शारदादेवी करमाफी अभियान योजना जिल्ह्यात आणि राज्यात राबवावी, अशी मागणी जवळाचे सरपंच सज्जन मागाडे यांनी केली आहे.

जवळा या नगरीत माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वप्रथम जि. प. शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला घरपट्टी माफ करण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे. राज्यात या निर्णयाचे जोरदार स्वागत होत आहे म्हणून हाच निर्णय संपूर्ण राज्यासाठी घेण्यात यावा यासाठी काही निधीची गरज लागली तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी या निधीची तरतूद करून बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या जि.प.शाळांना जीवनदान द्यावे. सध्या सर्वत्र शिक्षणाचे व्यावसायिकरण झाल्याने खासगी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी भरमसाठ फी म ोजावी लागत आहे. ग्रामीण भागातील हातावर पोट असणाऱ्या गोरगरीब जनतेला असे शिक्षण परवडत नसल्याने त्यांना जि.प.शाळा हा एकमेव पर्याय शिल्लक आहे. खासगी शैक्षणिक संस्थांच्या स्पर्धेत जर जि.प.शाळा बंद पडल्या तर गरिबांच्या मुलांना शिक्षणाचे धडे गिरवता येणार नाहीत असे मत श्री.मागाडे यांनी व्यक्त केले.

### मुख्यमंत्री,ग्रामविकास मंत्र्यांची भेट घेणार

विकासाची दूरदृष्टी असणाऱ्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे आणि गेल्या १०० दिवसांत आपल्या कामाचा ठसा उम टवून ग्रामविकास खात्याला वेगळ्या उंचीवर घेऊन जाणारे कर्तबगार ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे या विषयाकडे लक्ष वेधून जि.प.शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला घरपट्टी, पाणीपट्टी आणि सर्व स्थानिक कर माफ करावे, ही मागणी घेऊन दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरपंचाचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेतील.

# शेतकऱ्यांना बियाणे मिळण्यासाठी सारोळ्यातील कुऱ्हाडे पिता-पुत्रांची मेहनत

## कांदा बियाण्यांसह इतर पिकांची रोपे व बियाणांचे आठ वर्षांपासून घेताहेत उत्पादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ३ जून-**
महागाईने उच्चांक गाठला असला तरीही शेतकऱ्याची जिद्द कमी होत नाही. शेतीवर आणि शेतकऱ्यावर असलेल्या प्रेमापोटी सारोळे तालुका बार्शी येथील शेतकरी भारत कुऱ्हाडे व शरद कुऱ्हाडे पिता पुत्र आठ वर्षापासून बियाणांचे उत्पादन घेत आहेत.



सारोळे व बार्शी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांसाठी त्यांचे बियाणे हे अत्यंत दर्जेदार ठरले आहेत. शेती हा बेभरवशाचा व्यवसाय असल्याने शेतकऱ्यांच्या मदतीला कोणी येत नाही. त्यामुळे पिक लागवडीमध्ये शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. ही अडचण जाणून घेऊन त्यांच्यासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करून कुऱ्हाडे पिता पुत्र शेतकऱ्यांसाठी झटत आहेत. बार्शी तालुक्यातील सारोळे येथील प्रगतशील शेतकरी श्री. भारत कुऱ्हाडे हे त्यांच्या शेतातील विविध प्रकल्प व फळबागांसाठी नावाजलेले शेतकरी म्हणून प्रकाश झोतात आले आहेत. अथांग जिद्द व प्रामाणिक कष्ट या बळावर त्यांनी प्रचंड उत्पन्न मि ळवले व शेतकऱ्यांना आदर्श घालून दिला. यावेळी आजूबाजूचे शेतकरी व परिसरातील नागरिकांसाठी शेतकरी बियाणे तयार करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. सुरुवातीला त्यांनी कमी उत्पन्न घेतले.

त्यांनी कांदा बियाणे, पंचगंगा एलोरा पूना, फुरसुंगी, ह्या जातीचे बियाणे उत्पादन घेतले आहे. भारत कुऱ्हाडे यांना त्यांचे पुत्र शरद कुऱ्हाडे यांनी चांगली साथ दिली व वडिलांनी राबवलेल्या हा व्यवसाय वाढीसाठी शरद यांनी भरभराटीने प्रयत्न केले. गेल्या दहा वर्षांपासून कांद्यासह ऊस रोपे व इतर चांगल्या प्रकारची बी बियाणे सेंद्रिय पद्धतीने ते बनवत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रभर सर्वत्र त्यांचे बियाणे वितरित होत आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांनी बियाणे वितरित करण्यास सुरुवात केली आहे. गरजू शेतकऱ्यांनी ९८५०१२३१७१, ९८८१६९०११ ह्यावर क्रमांक वरती संपर्क साधून बियाणे मागवू शकता. त्यांच्या शेतीमध्ये त्यांनी केलेली मशागत व त्यातून आलेले त्यांचे यश पाहता इतर शेतकऱ्यांनाही आदर्श भारत कुऱ्हाडे यांनी घालून दिला आहे. सारोळे व परिसरामध्ये त्यांची मोठी प्रसिद्धी झाली आहे. कुऱ्हाडे पिता-पुत्रांनी केळी, पपई, विविध बागायती पिके यांचे विक्रमी उत्पादन घेतले आहे.

मी गेली अनेक वर्षापासून भारत कुऱ्हाडे यांनी उत्पादित केलेले बियाणे वापरत आहोत. त्यांनी उत्पादित केलेले हे बियाणे अत्यंत दर्जेदार आहेत. आणि अल्पदरात उपलब्ध होतात. सर्व शेतकऱ्यांनी हे बियाणे घ्यावे अशी माजी सर्व शेतकरी बांधवांना विनंती आहे.
**- बाळासाहेब निचळ**

### शेतकऱ्यांना परवडेल अशा दरामध्ये विक्री

शेतकऱ्यासाठी आपण हे उत्पादन घेतो आहोत. मात्र बऱ्याच शेतकऱ्यांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत आहे. अशावेळी आपण इतरांपेक्षा कमी दराने व जसे मिळेल तसे पैसे घेत किंवा उधारीवरही बियाणे दिले आहे. शेतकऱ्यांसाठी शेतकरी मदत करू शकतो ती भावना माझी आहे. चांगल्या पद्धतीची बियाणे गेली अनेक वर्षापासून उत्पादित करत आहोत. जास्त काही कमवायचे नाही मात्र शेतकऱ्यांसाठी काहीतरी करण्याचा हा प्रयत्न यशस्वी होतो याचा आनंद आहे.
**- भारत कुऱ्हाडे,** बियाणे उत्पादक, सारोळे ता. बार्शी

शरद व भारत कुऱ्हाडे ह्या पिता पुत्रांची मेहनत ह्या बियाणा मध्ये आहे. शेतकरी बियाणे यांची उगवण क्षमता चांगली आहे. व चांगल्या प्रकारचे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळू शकते.
**- विजय जाधव-सारोळे**



# लष्करमधील व्यक्तीची छत्रपती संभाजी तलावात आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जून -**

बेपत्ता झाल्याची तक्रार देण्यासाठी गेलेल्या नातेवाईकांना पोलिसांनी संभाजी तलावात एकाची बुडून मृत्यूची वार्ता कळवली, नातेवाईक संभाजी तलावात मंगळवारी सकाळी साडे नऊ च्या सुमारास पाहतो तर सुभाष कावील याचाच बुडून मृत्यू झाल्याचे समोर आले. पाहता क्षणी नातेवाइकांनी हंबरडा फोडला. सुभाष मारूती काविल (वय ४४, रा. १५५१ गुलजार तालीम जवळ, लष्कर, सोलापूर) असे बुडून मयत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ही घटना नैराश्यतून घडली असल्याचे सम ोर आले आहे.

मंगळवारी तलावात मृतदेह तरंगाताना नागरिकांनी पाहण्यासाठी गर्दी केली होती. घटनास्थळी पोलिस दाखल झाले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयत वक्ती मागील तीन वर्षापासून लकव्याच्या आजाराने ग्रस्त होते. दैनंदिन ते सकाळी फिरण्यासाठी जात होते. त्याप्रमाणे सोमवारी घरातील एका नातेवाईकांच्या वर्ष श्राध्दचा कार्यक्रम होता. घरातील सर्वजण त्या कार्यक्रमात व्यस्त होते. सुभाष हे लकव्याच्या आजाराने ग्रस्त होते. औषध गोळ्या घेतल्यानंतर नेहमी प्रमाणे ते सकाळी फिरण्यासाठी निघून गेले. मुलं व बायको कार्यक्रमात व्यस्त होते. दुपारी झाली तरी सुभाष कावील हे घरी आले नाहीत. नातेवाइकांनी सोमवार असल्याने सिद्धेश्वर मंदिर परिसर व रेल्वे स्थानकात शोध घेतला. परंतु तो कोठेही मिळून आला नाही. शेवटी रात्र झाली तरी सुभाष घरी परतले नाहीत. मंगळवारी सकाळी नातेवाईक सदर बझार पोलिसांत मिसिंग केस दाखल करण्यासाठी गेले होते. त्यावेळी पोलिस ठाण्यात संभाजी तलाव परिसरात एकजण तरंगत असल्याची माहिती मिळाली. पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी मिसिंग दाखल करण्यासाठी आलेल्या नातेवाईकांना एकजण कंबर तलावात बुडला आहे,ते कोणी आहे का, पाहून घेण्यास पोलिसांनी सांगितले. नातेवाईक घटनास्थळी गेले तर सुभाष याचा मृतदेह असल्याचे सांगितले नातेवाइकांनी ओळखले. पोलिस हवालदार टी.सी.गायकवाड यांनी मृतदेह पाण्याच्या बाहेर काढून सिव्हिल रुग्णालयात दाखल केला,तो उपचारापूर्वीच मयत झाला होता. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. मयताच्या मागे, पत्नी, दोन मुलं व एक मुलगी असा परिवार आहे.

# महापालिकेच्या झोन कार्यालयात प्रत्येक बुधवारी जनता दरबार

## ● नागरिकांनी आपल्या समस्या मांडाव्यात : आयुक्त डॉ. ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या निर्देशानुसार यापुढे प्रत्येक बुधवारी दुपारी १२ ते २ या वेळेत नियंत्रण अधिकारी यांच्या उपस्थितीत संबंधित विभागीय कार्यालयांमध्ये जनता दरबार आयोजित करण्यात येणार आहे.

सोलापूर महानगपालिकेच्या वतीने सोलापूर शहरातील नागरिकांच्या समस्यांचे तातडीने आणि प्रभावीपणे निराकरण करण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने एक म हत्त्वाचा व अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या दरबारात अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, विभागीय नियंत्रण अधिकाऱ्यांच्या थेट उपस्थितीत नागरिक आपल्या समस्या मांडू शकतील आणि त्यांचे निराकरण करून घेतले जाईल.



| जनता दरबाराचे विभागीय कार्यालय निहाय वेळापत्रक | | |
|---|---|---|
| झोन १ | उपायुक्त तैमूर मुलाणी | महिन्यातील पहिला व तिसरा बुधवार |
| झोन २ | उपायुक्त किरणकुमार मोरे | महिन्यातील पहिला व तिसरा बुधवार |
| झोन ३ | उपायुक्त आशिष लोकरे | महिन्यातील पहिला बुधवार |
| झोन ४ | उपायुक्त आशिष लोकरे | महिन्यातील दुसरा बुधवार |
| झोन ५ | उपायुक्त किरण मोरे | महिन्यातील दुसरा व चौथा बुधवार |
| झोन ६ | उपायुक्त आशिष लोकरे | महिन्यातील तिसरा बुधवार , |
| झोन ७ | अतिरिक्त आयुक्त रवि पवार | महिन्यातील पहिला व तिसरा बुधवार |
| झोन ८ | उपायुक्त तैमूर मुलाणी | महिन्यातील दुसरा व चौथा बुधवार. |

नागरिकांना प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची, शहरातील समस्या मांडण्याची संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यावर जलदगतीने उपाययोजना करणे हा या जनता दरबार चा उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या नव्या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे सोडवता येतील आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख होईल.यामुळे प्रशासन अधिक लोकाभिमुख होऊन नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकेल. नागरिकांनी या जनता दरबारमध्ये आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

# मुस्तीत एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जून -**

सोलापूर - दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती येथील तरुणाने अज्ञात कारणावरून पत्र्याच्या अंगला साडीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना सोमवारी रात्री घडली.

अनिल माणिक पवार (वय ३४ रा. मुस्ती,ता. दक्षिण सोलापूर) असे गळफास घेवून आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. अनिल हा सोमवारी घरी होता. अज्ञात कारणावरून सोमवारी रात्री नऊच्या सुमारास पत्र्याच्या ॲगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला,

हीगोष्टी मध्यरात्री नातेवाईकांच्या दृष्टीस पडली, नातेवाईकांनी बेशुध्द आवस्थेत गळफासावरून खाली उतरवले मंगळवारी पहाटेच्या सुमारास भावजी रवि राठोड यांनी सिव्हिलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास मयत घोषित केले. याची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

### गतीरोधकांवर दुचाकी आदळून एकजण जखमी

दुचाकीवरून जात असताना दुचाकी गतीरोधकांवर आदळली आणि समोर असलेल्या विजेच्या खांबाला जावून धडकली,यामध्ये दुचाकीस्वार जखमी झाला आहे. ही घटना मंगळवारी सकाळी ९ च्या सुमारास पोटफाडी चौक ते अशोक चौक पोलिस चौकीच्या दिशेने जात असताना घडली.

मुश्ताक अब्दुल सत्तार शेख (वय ३० रा. कुर्बान हुसेन नगर) असे जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मुस्ताक हा मंगळवारी ९ च्या सुमारास दुचाकीवरून पोटफाडी चौक ते अशोक चौक पोलिस चौकीच्या दिशेने जात होता. जात असताना मार्कडेय जलतरण तलाव च्या गेटसमोर गतीरोधकवर दुचाकी आदळली व विजेच्या खांबाला जावून धडकली, दुचाकीस्वार खाली पडून त्याच्या कपाळास जखमी झाली, त्यास उपचार करण्यासाठी मदतनीस वसीम शेख यांनी सिव्हिल रुग्णालयात दाखल केले.



# दंडवते महाराज मठात काव्य संमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

अर्लीयन के ए प्रायव्हेट लिमिटेड सोलापूर मराठी प्रतिष्ठानतर्फे आयोजित, सोलापूर, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १ जून रोजी दंडवते महाराज मठात दुसरे काव्य संमेलन पार पडले. अशोक मोहिते यांनी उपस्थितांचे स्वागत केले. छाया उंब्रजकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

ही सगळ्यांच्या लक्षात राहण्यासारखे बाब ठरली. संमेलनाच्या अध्यक्षा वंदना कुलकर्णी यांनी अध्यक्षीय भाषण केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सागर गुडमेवार यांनी यावेळी मार्गदर्शन केले. कविता म्हणजे काय आणि कविता कशी असावी याचं थोडक्यात पण छान असं विश्लेषण रोहिणी पराडकर, कोल्हापूर यांनी केले. जिव्हाळा या सोलापुरातल्या अपंगमती मुलांच्या शाळेचे संस्थापक सचिव अण्णाराव राजमाने यांनी आवर्जून उपस्थिती लावली. पावसाच्या पाऊलखुणा हे रोहिणीताई पराडकर यांनी संपादित केलेल्या पुस्तकाचं प्रकाशन डॉ. सागर गुडमेवार यांच्या हस्ते झाले. कवी संमेलनात जवळपास ४० कवींनी आपली हजेरी लावलेली होती. शुभदा मित्रगोत्री यांनी सूत्रसंचालन तर आभार प्रकाश महामुनी यांनी मानले.

# अकरावी प्रवेश प्रक्रियेस ५ जूनपर्यंत मुदतवाढ देऊनही विद्यार्थ्यांना मनस्ताप

● मंगळवारी दिवसभर ऑनलाईन साइट बंद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे राबवल्या जात असलेल्या इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी गुरूवार ५ जून रोजी दुपारी २ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी मंगळवार ३ जून पर्यंत अर्ज भरण्याची मुदत होती. पण, त्यामध्ये दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे.

मात्र, मंगळवारी दिवसभर ऑनलाईन साइट बंद असल्याने प्रवेशप्रक्रिया बंद होती. विद्यार्थी व पालकांनी प्रवेश अर्जासाठी नेटकॅफे व महाविद्यालयात हेलपाटे मारले. मात्र, संध्याकाळी ७ नंतर प्रवेशप्रक्रिया सुरळीत होणार असल्याचे महाविद्यालयाकडून सांगण्यात आले. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये २६ मे पासून इयत्ता अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. पुणे विभागात १ लाख ८७ हजार ९२५ विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली आहे. तर सोलापूर जिल्ह्यात ४० हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. मुदतवाढ देण्यात आल्याने प्रवेशअर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाले असले तरी मंगळवारचा दिवस वाया गेला आहे. त्यामुळे बुधवार व गुरूवार दोन दिवसात विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. साइट बंद असल्याने महाविद्यालय व नेटकॅफे चालक एकमेकांना विचारणा करीत होते. संध्याकाळी साइट सुरू होणार असल्याचे सांगितल्यानंतर विद्यार्थ्यांना रात्री अर्ज भरावे लागणार आहे. सोमवार २ जूनपर्यंत सोलापूर जिल्ह्यातून ४० हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केला आहे. मंगळवारी प्रवेशित विद्यार्थ्यांबद्दल विचारणा केली असता शिक्षण विभागाकडे माहीती नसल्याचे सांगण्यात आले. अनेक महाविद्यालय पटसंख्या टिकविण्यासाठी महाविद्यालयाकडून अर्ज भरण्यात येत आहे. इन हाऊस कोटा मधील पसंती क्रम आवश्यकतेनुसार बदल करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांना पालक, विद्यार्थी यांना पुरेसा वेळ मिळावा, यासाठी नोंदणीस मुदतवाढ देण्यात आल्याचे सागण्यात येत आहे.

### मंगळवारी एकही अर्ज भरता आला नाही

मंगळवारी सकाळपासून अकरावी प्रवेश अर्ज भरण्यासाठी साइट ओपन केल्यावर प्रक्रिया बंद असल्याचे सांगण्यात येत होते. वारंवार प्रयत्न केल्यानंतर एकही अर्ज भरता आले नाही. त्यामुळे विद्यार्थी व पालकांना चकरा मारावे लागले. मंगळवारी संध्याकाळनंतर साइट सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले.

**- संगप्पा बगले, नेटकॅफे चालक मंद्रुप**



# प्रा. मधुकर पवार यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे प्रभारी प्राचार्य मधुकर पवार हे आपल्या ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा मराठा समाज सेवा मंडळच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे व उच्च शिक्षण विभाग सोलापूर शिक्षण सहसंचालक डॉ उमेश काकडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी म हानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, डॉ प्राचार्य शिवाजीराव देशमुख,भारतीय राष्ट्रीय राज्य मार्ग प्रकल्प संचालक संजय कदम, मुख्याध्यापक महामंडळाचे राज्याचे अध्यक्ष तानाजी माने, आदींची प्रमुख उपस्थिती होती.


प्राचार्य डॉ. पवार यांच्या पत्नी संजीवनी पवार, तसेच राज्य महामार्ग प्राधिकीकरणाचे संजय कदम, प्राचार्य डॉ अरुण मित्रगोत्री, सुरेश जगदाळे डॉ. निकिता पवार, दत्ता भोसले आदींनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास विनायकराव पाटील, ज्ञानेश्वर सपाटे,महादेव गवळी, अशोक चव्हाण, शिवदास चटके, रेखा सपाटे,सुनिता साळुंखे,मंजुश्री पाटील, उषा गोखळे,महानंदा सोलापुरे, मोहम्मद शेख, यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन सारिका महाम ुनी यांनी केले. प्रा.महेश माने यांनी आभार मानले.

# शिवराज्याभिषेकाची ६ जून हीच तारीख जाहीर करावी: संभाजी ब्रिगेड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०४ जून-**

शासनाने तिथीनुसार शिवराज्याभिषेक साजरा करण्याबाबतचे परिपत्रक रद्द करून सहा जून रोजीच शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात यावा; असे नव्याने परिपत्रक काढावे तसेच सहा जून हा शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्यात यावा, या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत संभाजी ब्रिगेडच्या वतीने पाठविण्यात आले.



शासनाने एक समिती नेमून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती १९ फेब्रुवारी ही तारीख जाहीर केली होती; त्याच धर्तीवर इतिहास अभ्यासकांची समिती स्थापन करून ६ जून हाच दिवस राज्याभिषेक दिवस म्हणून जाहीर करावा. तरी लोक भावनेचा विचार करून शासनाने त्वरित हा शासन आदेश रद्द करून नव्याने ६ जून रोजीच राज्याभिषेक साजरा करण्याचे परिपत्रक काढावे व अजूनही काही शासकीय निम शासकीय अभियांत्रिकी म हाविद्यालय शाळा महाविद्यालयम ध्ये हा दिवस साजरा केला जात नाही. त्यातून शासनाच्या निर्णयाचा अवमान करणाऱ्या संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी त्यांची मागणी आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनलताई दास, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, कार्याध्यक्ष दिलीप निंबाळकर, जिल्हा संघटक लखन पारसे, सचिव महिला जयश्री जाधव, जिल्हा सचिव सिद्धाराम सावळे, शहर सचिव सतीश वावरे, अरविंद शेळके, विशाल शहापुरे, शेखर कंटेकर, राज स्वामी, रमेश भंडारे आदी उपस्थित होते.



# गोवंशीय प्राण्यांची अवैधपणे कत्तल करू नका

## ▸▸ शांतता समिती बैठकीत पोलिस आयुक्तांचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जून -**

बकरी ईद मध्ये कोणत्याही प्रकारे गोवंशीय प्राण्यांची अवैधपणे वाहतूक करू नका तसेच अवैधपणे कत्तल करू नका असा स्पष्ट इशारा पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिला.

मंगळवारी सायंकाळी पोलिस आयुक्तालयामध्ये पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली बकरी ईद उत्सवचे अनुषंगाने सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधिकारी, शांतता समिती सदस्य, सोलापूर महानगर पालिकेकडील अधिकारी, शहर काझी, मुस्लीम धर्मगुरु, शहरातील प्रमुख मस्जिदचे विश्वस्थ, शहारातील प्रमुख ईदगाह मैदान यांचे विश्वस्थ यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये पोलिस आयुक्त बोलत होते. या बैठकीची प्रस्तावना उपायुक्त श्रीमती डॉ. दिपाली काळे यांनी करुन बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला.

बकरी ईद पार्श्वभुमीवर गोवंशीय प्राण्यांची अवैधपणे वाहतूक निदर्शनास आल्यास स्थानिक पोलीसांशी किंवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, कोणतीही खाजगी व्यक्ती अथवा कोणत्याही संघटनांचे कार्यकर्ते यांनी गोवंशीय जनावरांची वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यास स्वतः अवैधपणे वाहने अडवू नका, कुर्बानी नंतर सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर किंवा उघडयावर कोणतीही घाण, रक्त किंवा मांस पडणार नाही याची दक्षता घ्यावी. स्वच्छतेचे पालन करुन रोगराई, दुर्गंधी पसरणार नाही याची दक्षता घ्यावी. नागरीकांनी कोणत्याही स्थितीत चुकीच्या अफवांवर विश्वास न ठेवता सामंजस्याने वागावे. सोशल मिडीयाव्दारे कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, व्हिडीओ फॉरवर्ड न करता ते डिलीट करुन जातीय सलोखा अबाधित राखावा. एखादी अप्रिय अथवा चुकीची घटना आजूबाजूला घडत असल्यास स्थानिक पोलीस ठाणे किंवा नियंत्रण कक्ष येथे त्वरीत माहिती द्यावी. कोणत्याही धार्मिक स्थळी आक्षेपार्ह भाष्य/वक्तव्य केले जाणार नाही याची खबरदारी घ्यावी. बकरी ईदच्या अनुषंगाने नमाजाचेवेळी प्रत्येक ईदगाह येथे आवश्यकतेनुसार जबाबदार स्वयंसेवक नेमावेत. उपरोक्त सुचनांचे पालन करुन कायदा व सुव्यवस्था राखणेकामी सर्वांनी सहकार्य करावे अशा सूचना पोलिसांच्यावतीने देण्यात आल्या. या बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्या/सुचना मांडल्या. त्यानंतर सदर सुचनेचे संबंधित महानगर पालिका अधिकारी यांनी सदर कामाची रुपरेषा बघुन समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले.

# ‘एनटीपीसी’कडून प्राणीसंग्रहालयासाठी ३ कोटींचा निधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएअआर) अंतर्गत एनटीपीसी यांनी महापालिकेच्या अखत्यारितील महात्मा गांधी प्राणीसंग्रहालयासाठी २.७९ कोटींचा निधी धनादेशाद्वारे सुपुर्द केला.

हा निधी काळवीट अधिवास व निवासस्थान, बिबट्या क्राल परिसर, सिंह क्राल परिसर, तसेच मोरांचे अधिवास व निवासस्थान उभारणीसाठी वापरण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे प्राणीसंग्रहालयाची सुविधा आणि अभ्यागतांचा अनुभव दोन्ही अधिक समृद्ध होतील.

यावेळी एनटीपीसीचे कार्यकारी संचालक बी.जे.सी. शास्त्री, एच आर विभागप्रमुख मनोरंजन सारंगी, पर्यावरण विभागप्रमुख रफीक उल इस्लाम, डीजीएम (एचएसआर) कविता गोयल, अमित सिंग, अर्चन पाठक, गुरुदत्त शर्मा आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर महापालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, उपायुक्त किरणकुमार मोरे, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, उप अभियंता किशोर सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते. पशुवैद्यकीय व प्राणीसंग्रहालय विभाग अधिकारी डॉ. सतीश चौगुले यांनी प्रस्ताविक केले. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या नेतृत्वाखाली हा महत्त्वाकांक्षी सीएसआर उपक्रम प्रत्यक्षात आला असल्याबद्दल आभार मानले. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी कार्यकारी संचालक शास्त्री यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर बी.जे.सी. शास्त्री यांनी आपल्या प्रमुख भाषणात एनटीपीसी सोलापूरकडून सोलापूर शहराच्या पर्यावरणीय आणि नागरी विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. महात्मा गांधी प्राणीसंग्रहालय हे शैक्षणिक आणि पर्यटन दृष्टीने एक समृद्ध ठिकाण बनू शकते, असेही त्यांनी नमूद केले. एचआर विभागप्रमुख मनोरंजन सारंगी व पर्यावरण विभागप्रमुख रफीक उल इस्लाम यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करताना एनटीपीसीच्या दीर्घकालीन, शाश्वत विकास आणि समाजाभिमुख सीएसआर दृष्टिकोनावर प्रकाश टाकला. आंब्याच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# चिप्पा मार्केटऐवजी ७० फूट रोडवर भाजी विक्री केल्यास गुन्हा दाखल करणार

## महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचा इशारा

**सोलापूर, दि. ३ जून-**

भाजी विक्रेत्यांनी सत्तर फूट रोडवर न बसता चिप्पा मंडई येथे भाजी विक्री करावी. ७० फूट रोडवर भाजी विक्री करताना आढळल्यास त्यांची भाजी जप्त करून कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.डॉ. ओम्बासे यांनी २८ मे २०२५ रोजीच्या ७० फुट रोड, भाजी मार्केट येथे भेटी दिल्यानंतर भाजी विक्रेते रोडवर विक्री करत असलेले निदर्शनास आले होते. महानगरपालिकेची न्यु पाच्छा पेठ येथे चिप्पा मार्केट सर्व सोयीनीयुक्त असताना रिकाम्या स्थितीत आहे.

यापुढे भाजी विक्रेत्यांनी रोडवर अथवा रोडच्या कडेला थांबून भाजी विक्री न करता चिप्पा मार्केट इमारती मध्येच भाजी विक्री करावी. तसेच नागरिकांनी रस्त्यावर विक्री करणाऱ्यांकडून भाजी खरेदी न करता चिप्पा मार्केट या ठिकाणी बसलेल्या विक्रेत्याकडूनच भाजी खरेदी करावी.

येथील परिसरातील राहणारे नागरिकांचे व वारंवार होणारी वाहतुकीची कोंडी याबाबत वाहतूक शाखेच्या तक्रारी व परिसरात अस्वच्छता होत आहे. यापुढे भाजी विक्रेते रस्त्यावर भाजी विक्री करताना आढळल्यास त्यांच्या जवळील विक्रीस आणलेला भाजीपाला जप्त करुन विक्रेत्यांवर गुन्हा दाखल करण्यात येईल, असे इशारा आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी दिला आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### २० लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ३ जून-**

कर्ज फेडण्यासाठी माहेरून २० लाख रुपये आण म्हणून पत्नीचा छळ करून तिला हाकलून देणाऱ्या पतीविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुजा प्रविण निकम (वय २७, रा. मंगळवार पेठ, तुळजापूर, जि. धाराशिव) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती प्रविण प्रभाकर निकम (वय ३०, रा. शिलालिंग नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मे २०२४ ते ३० मे २०२५ या कालावधीत पुजा या पती प्रविण निकम याच्यासोबत सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती प्रविण याने पुजा यांना शिवीगाळ, दमदाटी, मारहाण करून तुझ्या आई वडीलांकडून जास्त हुंडा दिला नाही, तुझ्या आई वडीलांनी माझे कर्ज फेडण्यासाठी माहेरहून २० लाख रुपये घेऊन आली तर तुला नांदवितो नाही तर तुला नांदविणार नाही असे बोलून घरातून हाकलून दिले. त्यानंतर पुजा या तिची मावशी संगीता नरवडे यांच्या घरी गेली. तेंव्हापासून पुजा या माहेरी राहण्यास असून त्यांचा पती प्रविण याने वेळोवेळी मानसिक त्रास देऊन पैशाची मागणी करीत छळ केला. म्हणून एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार नवले तपास करीत आहेत.

### बनावट नोटरी करून घर हडप करणाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३ जून-**

शहरातील कुमठा नाका येथील आदर्श नगरातील घर बनावट नोटरी करून हडप करणाऱ्यांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत बाबू अण्णप्पा कलादगी (वय ६५, रा. जानकी नगर मारूती मंदीर शेजारी, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सुभावती मनोहरसिंग रजपूत, नितीन रजपूत, प्रकाश रजपूत यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सन २०१९ मध्ये बाबू कलादगी यांच्या मालकीचे आदर्श नगर येथील घर नं. ३/ए/४/२४ याची सुभावती रजपूत, नितीन रजपूत, प्रकाश रजपूत यांनी बनावट नोटरी करून कलादगी यांचे घर हडप केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बनकर पुढील तपास करीत आहेत.

### गुडलक ट्रेडर्सचे दुकान फोडून दीड लाखांची रोकड लंपास

**सोलापूर, दि. ३ जून-**

शहरातील सिध्देश्वर पेठेतील गुडलक ट्रेडर्स नावाचे दुकान फोडून दीड लाख रुपयांची रोकड चोरट्याने चोरून नेली. याबाबत शकिल गुलाम रसुल शेख (वय ५६, रा. उत्तर सदर बझार, जवाहर नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शकील शेख यांचे सिध्देश्वर पेठेत गुडलक ट्रेडर्स नावाचे पेपर स्क्रॅपचे दुकान आहे. १ जून रोजी शेख हे रात्री दुकान बंद करून गेल्यानंतर रात्रीच्या वेळी चोरट्याने शेख यांच्या दुकानाचा पत्रा उचकटून दुकानात प्रवेश करून दुकानातील १ लाख ५० हजार रुपयांची रोकडे चोरून नेली. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बाजार समितीमध्ये जनावरांचा बाजार ८ जूनपर्यंत बंद

## गोवंश हत्याबंदी कायद्याअंतर्गत बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर (दि.३) जून ते (दि.८) जून या आठवडयाच्या कालवधीत सोलापूर जिल्हयातील विविध गावामध्ये जनावरांचा बाजार भरणार नाही, याची दक्षता घ्यावी. जेणेकरून गोवंशाची कत्तल होवून वरील अधिनियमाचे उल्लंघन होणार नाही. याची दक्षता घ्यावी असे पत्र महाराष्ट्र गोसेवा आयोग अध्यक्ष यांच्या वतीने दिले होते.







दरम्यान, त्या पत्राची दखल घेतल्यानंतर सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती प्रशासनाच्या वतीने श्री सिध्देश्वर बाजार पेठेतील जनावारांच्या खरेदी विक्रीचा व्यवहार करणाऱ्या सर्व व्यापारी, दलाल व शेतकऱ्यांना सूचित करताना सांगितले, सोलापूर कृषि उत्पन बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात जनावरांचा बाजार भरणार नाही. अशा आशयाचे सर्व फलक बाजार समितीच्या आवारात आणि मुख्य प्रवेशद्वारावर लावण्यात आले आहेत.

महाराष्ट्र गोसेवा आयोग अध्यक्ष यांच्या पत्रान्वये महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम पासुन राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आला आहे. सदर सुधारित अधिनियमाप्रमाणे गोवंशाची कत्तल करण्यास मनाई आहे. तसेच अधिनियमातील कलम ५ (अ) अन्वये गोवंशाची कत्तल, कत्तलीसाठी वाहतूक, कत्तलीसाठी निर्यात, कत्तलीसाठी खरेदी विक्री, कत्तलीकरीता विल्हेवाट, गोवंशाचे मास ताब्यात ठेवण्यास व राज्याबाहेर कत्तल केलेल्या गोवंशाचे मांस ताब्यात ठेवण्यास सक्त मनाई आहे. या नव्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सदरचा निर्णय घेण्यात आला आहे.

# राज्याभिषेक सोहळ्यासाठी स्केटिंगद्वारे रायगडला शिवज्योत घेऊन जाणार

## रायगड प्रतिष्ठानचा उपक्रम; शुक्रवारी तुळजापूर येथून होणार मार्गस्थ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

निराळे वस्ती येथील रायगड प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळ्यासाठी किल्ले रायगड येथे स्केटिंगद्वारे तुळजापूर ते रायगड शिवज्योत घेऊन जाणार असल्याची माहिती हभप सुधाकर महाराज इंगळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



रायगड प्रतिष्ठानच्या वतीने शिवाजी भोसले यांनी १९ वर्षापूर्वी तुळजापूर ते रायगड शिवज्योत घेऊन जाण्याचा संकल्प केला होता. ती परंपरा आजही सुरू आहे. यावर्षी शुक्रवार दि. ६ जून २०२५ रोजी स्केटिंगने तुळजापूर येथून निघणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ज्ञानेश्वर सपाटे यांच्या हस्ते या शिवज्योतीचे पूजन करण्यात येणार आहे. हभप बळीराम जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी दिंडीच्या माध्यमातून निराळे वस्ती येथे येणार आहेत. त्यानंतर मोहोळ मार्गे पंढरपूर येथे मुक्काम होईल. शनिवार दि. ७ जून २०२५ रोजी शिरवळ येथे दुसरा मुक्काम होणार आहे. रविवार दि. ८ जून रोजी ही ज्योत शिरवळ येथून निघून पाचाड या ठिकाणी पोहोचणार आहे. त्यानंतर किल्ले रायगड येथे ३५२ व्या राज्याभिषेक सोहळ्यासाठी उपस्थित राहणार आहे. दरम्यान, दुपारी ४ वाजता हभप सुधाकर महाराज इंगळे यांचे राजसदरेवर हरिकीर्तन होणार आहे. त्यासाठी संत ज्ञानेश्वर महाराज वादन शिक्षण संस्था, हभप ज्योतीराम चांगभले यांचे विद्यार्थी आणि ७५ तरुण वारकरी उपस्थित राहणार आहेत. संत सावता महाराज वादन प्रशिक्षण संस्था हभप बळीराम जांभळे यांच्या माध्यम ातून महिला भाविकांच्या उपस्थितीत हरिपाठ केला जाणार आहे. या पत्रकार परिषदेस ज्ञानेश्वर सपाटे, बळीराम जांभळे, विठ्ठल मोलाने, विकास जाधव, सुरेश अवताडे, बालाजी गाढवे, हरीश पाटील उपस्थित होते.

# सोलापूर रेल्वे स्टेशनचे नामकरण श्री सिद्धरामेश्वर रेल्वे स्टेशन करा

## विजयकुमार हत्तुरे यांची रेल्वे राज्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून**

जागतिक लिंगायत महासभा, महाराष्ट्र वतीने सोलापूर रेल्वे स्टेशन विभागातील विविध प्रश्न व नवीन रेल्वे सेवाबाबत रेल्वे राज्यमंत्री व्ही. सोमण्णा यांना प्रदेश कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांनी सोलापूर दौऱ्यावर आले असता मागणीचे निवेदन दिले.




सोलापूर रेल्वे स्टेशन याचे श्री सिद्धरामेश्वर रेल्वे स्टेशन असे नामकरण करावे, सोलापूर ते दिल्ली प्रवासी करिता नवीन बसव सुपर फास्ट एक्सप्रेस गाडी सुरु करावे, नियोजित टिकेकरवाडी टर्मिनल ला मंजुरी द्यावे, सोलापूर ते बेंगलोर नवीन वंदे भारत एक्सप्रेस चालू करावे. प्रामुख्याने मागण्याचे निवेदन देण्यात आले आहेत. यामुळे आर्थिक विकास व पर्यटनाला चालना मिळेल.या नवीन रेल्वे मुळे येथील नागरिकांना खूप फायदा होईल आणि दळणवळण वाढणार असल्याचे यामध्ये नमूद करण्यात आले आहे. याप्रसंगी कर्नाटक राज्याचे ज्येष्ठ नेते शंकर गौडा पाटील हुबळी, कलबुर्गीचे आमदार बसवराज मत्तीमोड, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन सिद्धाराम चाकोते जागतिक लिंगायत महासभेचे जिल्हाध्यक्ष शिवानंद गोगांव,नाना गौडा बिरादार, प्रा. रवी बेल्ली, बसवराज बैचाबल, सिद्धाराम कटारे, उमेश कल्याणी, नामदेव फुलारी, रुद्रप्पा कांबळे,अमोल म्हमाणे आदी उपस्थितीत होते.

# गुंठेवारी धारकांना स्वतःचे हक्काचे घर मिळणार

## ९ जूनला बाळे येथे पुढील शिबिर

## गुंठेवारी नियमित मोजणी नोंदणी शिबिराप्रसंगी आ.विजयकुमार देशमुख यांचे प्रतिपादन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जून-**

वित्तीय संस्थेकडून व बँकेकडून गृह कर्ज सहज उपलब्ध होऊन त्यांना आपल्या शहरातच घराची स्वप्नपूर्ती करता येणार आहे. याबद्दल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांचे मोठे सहकार्य मिळाले. गेल्या तीस वर्षांपासून शहरातील गुंठेवारी प्लॉट धारकांना भेडसावणारा प्रश्न सुटून आता गुंठेवारी नियमित झाल्याने गुंठेवारी धारकांना स्वतःचे हक्काच्या घर बांधकामांसाठी बांधकाम परवाना मिळणार असल्याचे प्रतिपादन आमदार विजयकुमार देशमुख यांनी केले.

शहरातील हद्दवाढ भागातील शेळगी परिसरातील नागरिकांसाठी आमदार देशमुख यांनी आयोजित केलेल्या गुंठेवारी नियमित मोजणी नोंदणी शिबिराप्रसंगी ते बोलत होते. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते शेळगी येथील मातोश्री मंगल कार्यालयात शिबिराचे उद्घाटन झाले. १९९२ साली शहराची हद्दवाढ झाल्यानंतर एकूण १३ गावे सोलापूर शहरात समाविष्ट झाली. त्यावेळी कच्च्या आराखड्यावर गुंठेवारी खरेदी - विक्री झाली होती. शासन नियम प्रमाणे गुंठेवारी जागेची खरेदी विक्री आणि बांधकामासाठी बांधकाम परवाना मिळत नसल्याने हजारो नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. याबाबत आमदार विजयकुमार देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा करून शासनाकडून गुंठेवारी नियमित करण्याबाबत आदेश पारित करून घेतले होते. शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घेतल्यामुळे हजारो नागरिकांना गुंठेवारी नियमित करता येणार आहे. या शासन निर्णयाचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार विजयकुमार देशमुख संपर्क कार्यालयातर्फे शेळगीमध्ये हे शिबिर झाले.

यावेळी माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख, भूमापन सोलापूर अधीक्षक घोडके, मोजणी अधीक्षक धनंजय सावंत, मनीष बिष्णूरकर, मनपा बांधकाम विभागाचे प्रभारी नीलकंठ मठपती, आनंद जोशी, तलाठी अभिषेक काळे, बसवराज इटकळे, ज्ञानेश्वर कारभारी, विरेश उंबरजे, माजी सभागृह नेते शिवानंद पाटील, श्रीनिवास करली, माजी नगरसेवक चंद्रकांत रमणशेट्टी, अविनाश पाटील, प्रा. नारायण बनसोडे, माजी नगरसेविका वंदना गायकवाड, शालन शिंदे, ज्योती बमगोंडे, राजेश उबाळे, श्रीनिवास पुरुड, वैभव बरबडे, झाकीर सगरी, अमोल बिराजदार, दत्तात्रय बडगु, धोंडाप्पा वग्गे आदींसह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

### हजारो नागरिकांचा हा प्रश्न सुटला

गुंठेवारीच्या प्रश्नामुळे गेल्या अनेक वर्षांपासून जागा खरेदी विक्री आणि बांधकाम परवानासाठी आम्हाला त्रास होत होता. हजारो नागरिकांचा हा प्रश्न आमदार विजय देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे सुटल्यामुळे त्यांचे आभार.

**- श्रीशैल सोनके**
नागरिक, शेळगी

### नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

आमदार विजयकुमार देशमुख संपर्क कार्यालयाच्यावतीने पुढील गुंठेवारी नियमित मोजणी नोंदणी शिबिर ९ जून रोजी बाळे येथे होणार आहे. शहरातील सर्वच हद्दवाढ भागात गुंठेवारी नियमित मोजणी नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा

**- डॉ. किरण विजय देशमुख,**
माजी नगरसेवक

# काहो, आम्हाला अशी सापत्न वागणूक?

- भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचा शासनाला सवाल
- २० दिवसांपासून आंदोलन; एकही मंत्री दाद देईना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

गेल्या २० दिवसांपासून आम्ही लेखनीबंद आंदोलन करतोय... शासनाकडून आजतागायत कसलीही दखल नाही...इतर खात्याच्या कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले तरी चटकन वरिष्ठ अधिकारी, संबंधित खात्याचे मंत्री धावून जातात आणि लगेच तोडगाही काढतात... मात्र आमच्या विभागाकडे विभागीय स्तरावरील एकही अधिकारी आले नाहीत ना संबंधित खात्याचे मंत्री....शासन अशी काहो, आम्हाला सापत्न वागणूक देते? असा सवाल भूमी अभिलेख खात्यातील कर्मचाऱ्यांनी आज (दि.३) दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना अगदी तळतळून केला.

यावेळी उपोषणकर्त्या कर्मचाऱ्यांनी आपल्या भावना बिनधास्तपणे मांडल्या. आमचे काम टेक्निकल असूनही आम्हाला क्लार्क पदावरील पगार मिळतो. गेल्या अनेक वर्षांपासून फिल्डवर काम करताना आमच्या कर्मचाऱ्यांना टीए, डीए मिळत नाही. पदर मोड करून शेतकऱ्यांच्या बांधावर जावून मोजणी करावी लागते, काही वेळा स्वत:च्या पैशाने नकाशे व इतर कागदपत्रांची झेरॉक्सही काढावी लागते. इतकं सार करूनही आम्हाला इतर खात्याच्या कर्मचाऱ्यांपेक्षा पगार कमी का मिळतो? वेतन तफावत मांडताना हे कर्मचारी म्हणाले की, सर्व्हे क्षक/ भूमापक (भूमी अभिलेख विभाग) खात्याच्या कर्मचाऱ्यांना दरमहा मिळणाऱ्या वेतनामध्येही कमालीची तफावत आहे. आमच्या विभागाने २०१४ मध्येही कामबंद आंदोलन तब्बल २५ दिवस केले. यावेळी तोंडी आणि लेखी आश्वासने मिळूनही आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत. हार्ड वर्क असतानाही शासन का दखल घेत नाही. शेत, जागाच नाहीतर म हामार्गाच्याही मोजण्या आम्ही इम ाने-इतबारे केल्या होत्या. चेन्नई-सुरत हा मार्ग तर अत्यंत फास्ट मोजणी करून दिल्याने तत्कालिन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांचा शासनाकडून सत्कारही केला होता. इतके प्रामाणिक काम करूनही आमच्या खात्यावरच का अन्याय होतो? असा सवालही यावेळी कर्मचारी संघटना अध्यक्ष पवार यांनी उपस्थित केला.



**वेतन तफावत**

| पद/विभाग | ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे | | |
|---|---|---|---|
| सर्व्हेक्षक/भूमापक भूमी अभिलेख विभाग | एस-६ | १९०० | १९९००-६३२०० |
| सर्व्हेक्षक/भूमापक वन विभाग | एस-८ | २४०० | २५५००-८११०० |
| सर्व्हेक्षक/भूमापक पनवेल महानगरपालिका | एस-८ | २४०० | २५५००-८११०० |
| सर्व्हेक्षक/भूमापक पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | एस-८ | २४०० | २५५००-८११०० |
| सर्व्हेक्षक/भूमापक जलसंपदा विभाग | एस-८ | २४०० | २५५००-८११०० |
| सर्व्हेक्षक/भूमापक महसूल विभाग | एस-८ | २४०० | २५५००-८११०० |
| छाननी सर्व्हेक्षक महसूल विभाग | एस-८ | २४०० | २५५००-८११०० |
| सर्व्हेक्षक/भूमापक सार्वजनिक बांधकाम विभाग | एस-८ | २४०० | २५५००-८११०० |

### महसूलमंत्र्यानी तोडगा काढायला हवा होता!

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे गुरूवारी सोलापूर दौऱ्यावर आले असता, त्यांनी महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. याचवेळी भूमी अभिलेख संघटना पदाधिकाऱ्यांनी महसूलमंत्री बावनकुळे यांची वेळ घेवून संपाबाबत संवाद साधला. यावेळी महसूलमंत्र्यांनी भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सुरू केलेले काम बंद आंदोलन बेकायदेशीर असल्याचे सांगत ताशेरे ओढले. इतकेच नाहीतर भूमिअभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनी तात्काळ कर्तव्यावर रुजू व्हावे. मगच मी तुमच्यासमवेत बैठक घेणार असल्याचे सांगितले. यामुळे या कर्मचाऱ्यांतून नाराजीचा सूर आहे. खरं तर महसूलमंत्र्यांनी यावेळी काहीतरी तोडगा काढायला हवा होता; अशाही भावना काही कर्मचाऱ्यांनी मांडल्या.

# धाकट्या राजवाड्यातील हाणामारीप्रकरणी २० जणांवर परस्परविरोधी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जून -**

कोंतम चौकातील धाकट्या राजवाड्यातील बुध्द विहारजवळ झालेल्या दोन गटातील हाणामारी प्रकरणी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात दोन्ही गटातील २० जणांविरुध्द परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



याबाबत मनोज राम गायकवाड (वय ४५, रा. धाकटा राजवाडा, कुंभार वेस विठ्ठल मंदीरासमोर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महेश उर्फ बापू राजू कांबळे, विजय कामेश वाघमारे, अजय कामेश वाघमारे, सोहन सिध्दू कांबळे, सिध्दार्थ सुभाष कांबळे, राम उर्फ शशिकांत तळभंडारे, सुजल सिध्दू कांबळे व इतर इसम (सर्व रा. धाकटा राजवाडा, कोंतम चौक, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर सुजल सिध्दू कांबळे (वय २०) याच्या फिर्यादीवरुन सुरज राम गायकवाड, आनंद राम गायकवाड, रितेश मनोज गायकवाड, पियुष मनोज गायकवाड, यश ऋषि गायकवाड, योगेश चंद्रकांत कोळेकर, करण दिपक गायकवाड, मनोज राम गायकवाड यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२ जून रोजी सकाळी दहाच्या सुमारास धाकटा राजवाडा येथे मनोज गायकवाड हे घरी असताना त्यांच्या गल्लीत राहणाऱ्या महेश कांबळेयाने मनोज यास रस्त्यावर बोलावून घेऊन काल मिटलेल्या प्रकरणाध्ये तु ५० हजार रुपये कोणाला दिले असे विचारून अश्लिल शिवीगाळ करून मनोज यांची गच्ची धरून स्टिलच्या पाईपने पायावर जबर मारहाण केली. यावेळी भांडण सोडविण्यासाठी आलेल्या म नोज यांची मुलगी, मुलगा व भाऊ यांना गायकवाड व त्याच्या साथीदारांनी मिळून कोयत्याने, लोखंडी रॉड, स्टिल पाईप, लाकडी बॅट व काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले. तर सुजल कांबळे याच्या फिर्यादीनुसार २ जून रोजी सकाळी दहाच्या सुमारास कोंतम चौकातील विठ्ठल मंदीरासमोर रस्त्यावर कांबळे याचे काका महेश कांबळे हे मनोज गायकवाड यास यश व रितेश हे दोघांकडून काढण्यात येणारी मुलीची छेडछाडीची तक्रार आम्ही पैसे घेऊन मिटविली असे लोकांना खोटं सांगत फिरत आहेत असे गायकवाड यांना विचारीत असताना अचानक गायकवाड यांनी सुजलचा भाऊ सोहम यास कोयता, लोखंडी रॉड, लाकडी बांबू, लाकडी बॅट, फायबर बॅटने जबर मारहाण करून जखमी केले. तसेच इतर आरोपींनी सुजलचा भाऊ अजय, सोहम, किशोर, सक्षम, विलास, महेश व आई वैशाली यांना हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी जमा झालेले लोक भांडण सोडविण्यासाठी येत असताना गायकवाड व इतरांनी आमच्या मध्ये जर कोणी आला तर त्याला जिवंत सोडणार नाही, त्याचे कोयत्याने तुकडे करुन टाकीन अशी धमकी देऊन दहशत निर्माण केली. या दोन्ही गटांतील लोकांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही गुन्ह्यांचा तपास सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३६

**तैसें हृदयींचे नि ज्ञानें । जिये देहीं उमटती चिन्हें ।**
**तियें सांगों आतां अवधानें श्र चांगें आइक ।।**

क्षेत्राबद्दल अर्थात देहाबद्दल सविस्तर सांगून झाल्यानंतर या देहादी क्षेत्राच्या बंधनातून मुक्त करण्याविषयी उदार असलेल्या ज्ञानावर भगवंत बोलत आहेत. हे ज्ञान मिळविणारे विरक्त लोक संपत्ती वैभवाची भीड धरीत नाहीत, किंवा रिध्दी सिध्दीच्या मोहातही पडत नाहीत. या ज्ञान प्राप्तीसाठी भक्त रात्र-दिन सदगुरुंची सेवा करतात. या ज्ञान प्राप्तीमुळे माणसाचा मोह नष्ट होतो आणि जीवाशिवाची एकवाक्यता होते. इंद्रियाची दारे बंद करुन बहिर्मुखवृत्तीचे पाय मोडण्याचे काम अर्थात मनाचे दारिद्रय घालविण्याचे काम हे ज्ञान करते. खरे म्हणजे आर्थिक दारिद्रय घालविण्याचे काम सोपे असते पण मनाचे दारिद्र्य घालविणे अवघड असते. सद्गुरुंची कृपा होऊन ज्ञान प्राप्ती झाली तर मनाचे दारिद्र्य घालवणे अवघड नाही. ज्ञानामुळे माणसाचा मस्तवालपणा जातो. मस्तवालपणा म्हणजे मी पणा गेल्यामुळे हा आपला हा परका अशी भाषा शिल्लक राहत नाही. ज्ञानाच्या सहाय्याने विटाळलेले मन शुध्द करता येऊ शकते. वृक्षाच्या मुळांच्या व्दारा जमीनीत पाणी असल्याचे झाडाच्या बाहेरीत विस्तारावरुन लक्षात येते. अंकुराची टवटवी जमिनीचा मऊपणा सांगते. विविध प्रकारचा सदाचार कुळवान माणसाचा मोठेपणा सांगतो. प्राणप्रिय पाहूणा घरी आल्यावर त्याच्या आदरसत्काराच्या हालचालीवरुन घरातील लोकांचे प्रेम दिसून येते. केळीत उत्पन्न झालेला कापूर सुवासामुळे कळतो किंवा काचेच्या आत ठेवलेल्या किंवा त्याच्या बाहेर पडणाऱ्या प्रकाशावरुन दिसून येते, त्याच प्रमाणे अंत:करणात झालेल्या ज्ञानाने देहावर जी लक्षणे उमटतात त्यावरुन ज्ञानी व्यक्ती ओळखला जातो. ती लक्षणे आपण सविस्तर सांगणार असल्याचे सांगतांना भगवंत म्हणतात,



**तैसें हृदयींचेनि ज्ञानें श्र जिये देहीं उमटती चिन्हें ।**
**तिये सांगों आतां अवधानें । चांगें आइक ।।**

सुवासावरुन कापूर, प्रकाशावरुन दिवा ओळखला जातो, त्याप्रमाणे आपण आपल्या सद्वर्तनावरुन ओळखलो गेलो पाहीजे, आपण आपल्या रंगरुपावरुन ओळखले जाण्यापेक्षा वर्तनावरुन ओळखले जाणे जास्त आवश्यक असते. आपण बहूतांश लोकात हेच पाहतो की, त्यांचा भर जास्तीत जास्त बाहय दिखाव्यावर, वर्तनावर असतो. अनेकांचे अंतर्गत वर्तनाकडे अजिबात लक्ष नसते. आपल्या बाबतीत असे घडणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. बाहय सौदर्यापेक्षा अंतर्गत सौंदर्य अत्यंत महत्वाचे व टिकावू असते, हे विसरता कामा नये. याचा विसर म्हणजेच खऱ्या अर्थाने मानवी जीवनाचा विसर होय. आपले सद्वर्तन हीच आपली खरी ओळख, असे समजून जो वागतो, तो सर्वांना प्रिय असतो व त्याला सर्व प्रिय असतात. ज्ञानी व्यक्तींची लक्षणे आपण प्रथम समजून घेणे आवश्यक आहे. मनाची एकाग्रता असेल तर लक्षणे समजून घेणे अवघड जाणार नाही. मनावर नियंत्रण असेल तर ही लक्षणे आपल्यात निर्माण करणे सहज शक्य होईल. यासाठी माऊलींनी सांगीतलेली ही लक्षणे आपण प्रथम समजून घ्यायला हवीत, असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ४ जून २०२५ | गुरुदेव रानडे पु.ति. विजापूर |
| विक्रम संवत् २०८१ | महेश नवमी, कुमारी पूजन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. नवमी (२३.५३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उ. फाल्गुनी (२७.३४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वज्र (०८.२७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (१०.११) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : समाजाकडून मान-सन्मान मिळेल, बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ** : कार्य, धंद्यात गती चांगली राहील. विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन** : आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्याद वाढ होण्याची शक्यता. काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**कर्क** : सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही. स्पर्धेत आपली अनुकलता नसणार.

**सिंह** : लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या** : चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या कामावर खुशी राहील.

**तुळ** : शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष द्या. सांभाळून व गोड बोला. मोठी हानी होण्याची शक्यता. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक** : राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु** : उद्योगधंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर** : धनलाभ संभवतो. जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल. उद्योगधंदा चांगला होईल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ** : आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन**: योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता. दुसऱ्यांच्या कामात हस्तक्षे करू नका.

# नोकरी मेळाव्यातून विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा



### पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचे प्रतिपादन

### भारती विद्यापीठ व शिखर पहारीया फाउंडेशन यांचा जॉब फेअर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

रोजगाराची संधी उपलब्ध करणे हे आज काळाची गरज आहे.शिखर पहारीया फाउंडेशन ,भारती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने जॉब फेअर हा चांगला उपक्रम राबविला.जॉब फेअर माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा, असे प्रतिपादन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी केले.

शिखर पहारीया फाउंडेशन आणि भारती विद्यापीठ अंतर्गत अभिजीत कदम इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशल सायन्स, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने व क्यू. जे. पी .आर. ग्रुप यांच्या सहकार्याने भारतीय विद्यापीठ सोलापूर येथे जॉब फेअर चे आयोजन करण्यात आले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या जॉब फेअरचे उद्घाटन सोलापूर पोलीस आयुक्तालयाचे आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कौशल्य विकास विभागाच्या सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार, झवेरी एंटरप्राईजेस संदीप झवेरी, क्यू.जे. पी .आर. ग्रुप तर्फे मारुती गायकवाड व इतर मान्यवरांचे प्रमुख उपस्थिती होती. स्वागतपर भाषणामध्ये संचालक प्रा. डॉ. एस. बी. सावंत यांनी भारतीय विद्यापीठ नेहमीच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. शिखर पहारीया फाउंडेशनचे समन्वयक राज सलगर यांनी शिखर फाउंडेशन तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.प्रमुख पाहुण्यांचा सत्कार इन्स्टिटयूट चे संचालक प्रा. डॉ. एस. बी. सावंत व शिखर पहारीया फाउंडेशनचे समन्वयक तन्वीर शेख यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. साक्षी बरबडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्लेसमेंट समन्वयक डॉ. शबनम माने यांनी करून दिली तर आभार उपप्राचार्य डॉ. पी. पी. कोठारी यांनी मानले.

नोकरी मेळाव्यामध्ये सोलापूर, पुणे, मुंबई, बेंगलोर, गोवा, हैदराबाद अशा विविध ठिकाणाहून ८० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये आय.टी. ऑटोमोबाईल, कन्स्ट्रक्शन, प्रोडक्शन, एज्युकेशन, फायनान्स, हॉस्पिटल, सेल्स व मार्केटिंग या क्षेत्रातील कंपन्यांचा सहभाग होता. ९ हजारांहून अधिक नोकरीच्या संधी होत्या. सोलापूर शहर व परिसरातील पाच हजारहून अधिक उमेदवारांनी या जॉब फेअर मध्ये सहभाग नोंदवला. दहावीपासून पदव्युत्तर पर्यंतच्या सर्व उमेदवारांसाठी हा जॉब हेअर फेअर संपूर्णपणे मोफत आयोजित करण्यात आला होता.



# अनुभवी कर्मचाऱ्यांमुळेच बाजार समिती राज्यात प्रथम : सभापती माने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती स्थपना झाल्यापासून जे कर्मचाऱ्यांनी आपले तन व मनाने एकत्र काम केल्याने आज सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती राज्यत प्रथम क्रमांक आहे. त्यांनी केलेली सेवा ही अतुलनीय आहे.त्यांच्यासाठी काही अडचणी असल्यास बाजार समितीचा सभापती या नात्याने त्याची सर्व प्रकारची अडचण सोडविण्यासाठी मी सदैव कटिबद्ध आहे. यापुढे देखील निवृत्त झालेले कर्मचारी हे माजी नसून आजीचं आहेत.

राज्यात एक नंबर आलेली बाजार समिती आता देशात एक नंबर कसा येईल असा प्रयत्न आपण सर्वजण मिळून करू या, असे सभापती दिलीप माने यांनी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मधील निवृत्त कर्मचाऱ्याच्या सत्कार प्रसंगी व्यक्त केलं आहे.

निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सचिव- दतात्रय सुर्यवंशी,नामदेव शेजाळे,सुरेश हलसगी, इम्तियाज सय्यद, भारत बनसोडे,राजकुमार गायकवाड यांचा सेवा निवृत्ती निमित्ताने सभापती दिलीप माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी संचालक मुश्ताक पटेल, केदार उंबरजे,विश्वनाथ उंबरे, महेश बोराळकर, अतुलसिंह रजपूत,चंद्रशेखर बिराजदार, विनोद पाटील,सिद्धेशवर राजमाने,सचिन ख्याडे, सचिन आवटे, व्यापारी, अडते, दुकानदार, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# गुरु भक्तांच्यावतीने सद्गुरूंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांना शनिरत्न पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल येथील गुरुभक्तांच्या वतीने महाराजांचा सन्मान करण्यात आला. शनिशिंगणापूर येथे देवगडचे महंत भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते व पद्मश्री पोपटराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली विश्वासराव गडाख यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच समितीचे अध्यक्ष भगवानराव बनकर यांच्या व सर्व सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांचा श्री शनेश्वर देवस्थान ट्रस्ट, श्री क्षेत्र शनिशिंगणापूर यांच्या सन्मान करण्यात आला. त्यानिमित्ताने अनिकेत जवंजाळ परिवार, सागर मनोहर, कुरापाटी परिवारांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गुरुनाथ पतंगे, शिवानंद सावळगी, प्रदीप पडगे, राजेश झिंगाडे, अक्षय भडंगे, राम कबाडे, कृष्णा रेळेकर, भास्कर नाना वैजवाडे, लिंगप्पा जवळकोठे, कृष्णा होमकर, नितीन चव्हाण आदी भक्तांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवराज नगरकर यांनी केले

# कुमठे जैन मंदिरात चंद्रप्रभू विधान भक्तीभावात साजरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

सध्या आपला देश राजकीय दृष्ट्या वरचेवर अस्थिर होत चालला आहे. वारंवार होणारे हल्ले, दहशतवाद, हत्या, आत्महत्या आदींमुळे सर्व ठिकाणी अस्थिरता, अशांती, आहे. विश्वशांतीसाठी कुमठ्यातील चंद्रप्रभू जैन मंदिरात मंदिर समिती आणि जैनस्को संयुक्त विद्यमाने चंद्रप्रभू महामंडल विधानात, चाळीस श्रावक-श्राविकांनी भाग घेतला.



सामुदायिक णमोकार महामंत्राने विधानाची सुरुवात झाली. या वेळी व्यासपीठावर कुमठे जैन मंदिराचे अध्यक्ष श्याम पाटील, जैनस्को अध्यक्षा डॉ. सरिता कोठाडिया, मंदिराचे विश्वस्त नितीन कासार, रवींद्र कासार, सदस्य अनिल पाटील, प्रथमेश कासार,जैनस्को सचिव अजित शहा-भूमकर, पं. अक्षय शहा, संघपती- पत्नी नूतन गांधी व निशा गांधी यांची उपस्थिती होती. श्याम पाटील व डॉ. सरिता कोठाडिया यांनी मनोगते व्यक्त केली. या वेळी जैनस्कोच्या नूतन पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, आणि सल्लागार समिती सदस्यांचा परिचय करुन देण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक, सूत्रसंचालन कोषाध्यक्ष अरुण धुमाळ यांनी केले. अध्यक्षा डॉ. सरिता कोठाडिया यांनी आभार मानले

त्यानंतर विधानाचार्य पंकजा पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रप्रभू महामंडळ विधान संपन्न झाले. मंदिर समितीतर्फे महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जैनस्को पदाधिकारी, नेमचंद आग्रे, मंदिर समितीचे-उपाध्यक्ष नितीन कासार-रवींद्र कासार पंडित अक्षय शहा, अनिल पाटील, प्रथमेश कासार, सुलचंद लोखंडे, सचिन कासार, शितल कासार, मनोहर कासार, देवेंद्र कासार, वैभव पाटील, ओम पाटील, विक्रांत पाटील, आनंद पाटील, सचिन पाटील, अजित पाटील, सागर पाटील, युवराज लोखंडे, अमोल पाटील, भाग्येश पाटील, नितीन पाटील किरण पाटील महावीर पानपट, संदीप पानपट, संजय पानपट आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# पर्यावरणपूरक वस्तूंच्या वापरासाठी युवकांनी जनजगृती करावी : डॉ. ओम्बासे

### महापालिका आवारात पर्यावरण सेल्फी फोटो बुथचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

युवकांनी सोशल मिडियाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन आणि पर्यावरणपूरक वस्तूंचा अधिकाधिक वापर करण्याबाबत समाजामध्ये जनजागृती करावी, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.



जागतिक पर्यावरण दिनानिमित भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरो आणि सोलापूर महानगरपालिका यांच्यावतीने महापालिकेच्या आवारात ठेवण्यात आलेल्या सेल्फी विथ पर्यावरण फोटो बुथच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. ओम्बासे बोलत होते. यावेळी उपायुक्त किरणकुमार मोरे, सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव, जनसंपर्क व कामगार अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, केंद्रीय संचार ब्यूरोचे निवृत्त अधिकारी सतीश घोडके, पर्यावरण विभागाचे व्यवस्थापक स्वप्नील सोलनकर,डॉ. सतीश चौगुले, राष्ट्रीय शहरी उपजीविका मिशनचे व्यवस्थापक समीर मुलाणी, उज्वला गणेश आणि कार्यालय सहायक जे. एम. हन्नुरे उपस्थित होते. हा सेल्फी फोटो बुथ ५ जून जागतिक पर्यावरण दिनापर्यंत सोलापूर महापालिका आवारात लोकांसाठी सेल्फी काढण्यासाठी उपलब्ध असणार आहे. युवा वर्गामध्ये पर्यावरण सुरक्षा आणि संवर्धनबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# वृक्षकला कार्यशाळेला वृक्ष कलाप्रेमींचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

जुळे सोलापूर येथे बोन्साय :एक वामन वृक्ष कला या कार्यानुभव कार्यशाळेला येथील दर्दी वृक्ष कला प्रेमींचा उत्तम प्रतिसाद मिळाला. परसबाग सोलापूर आणि बोन्साय क्लब यांनी या कार्यानुभव कार्यशाळेचे आयोजन केले होते.




प्रगतशील व्यावसायिक सिध्देश्वर जोकारे, नाट्य अभिनेते मंदार काळे, बोन्साय वृक्ष कला मार्गदर्शक प्रा. रामलिंग सावळजकर (अकलूज), बोन्साय क्लबचे संस्थापकद्वय नारायण पाटील यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. बोन्साय क्लबची ही चौथी कार्यशाळा आहे. प्रा. रामलिंग सावळजकर यांनी कार्यशाळेच्या तीनही सत्रामध्ये कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थींना बोन्साय बाबतचे परिचयपर व्याख्यान, प्रात्यक्षिक आणि प्रत्यक्ष कार्यानुभवासाठी मार्गदर्शन केले. सहभागी प्रशिक्षणार्थींनी सोबत आणलेल्या बोन्साय योग्य झाडाला कार्यानुभव सत्रात स्वहस्ते पहिल्या टप्प्यातील बोन्साय ट्रिटमेंट देऊन ती झाडे घरी नेली हे या कार्यशाळेचे वैशिष्ट्य होते.

यावेळी प्रा.रामलिंग सावळजकर, क्लबचे संस्थापक नारायण पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. संतोष रेळेकर आणि शिरीष गोळवलकर यांनी यापूर्वीच्या कार्यशाळेतील मार्गदर्शनातून बनवलेली स्वत:ची ११ बोन्साय झाडे कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थींना पाहण्यासाठी उपलब्ध केली होती.सहभागी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधत त्यांनी स्व-कार्यानुभवाच्या टिप्स् दिल्या. अनुश्री गोळवलकर हिने सूत्रसंचालन केले. शुभदा पाटील यांनी आभार मानले. प्रा. सावळजकर यांच्या हस्ते सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे दिली.

# सार्वजनिक बांधकाम विभागातील लाचखोर लिपिकास अटकपूर्व जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिक शंकर काशिनाथ कवठे (वय ४२, रा. जेऊर, ता. अक्कलकोट) याने लाचेची मागणी केल्याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायाधीश आर जे कटारिया यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला.



१६ मे २०२५ रोजी तक्रारदार याने हत्तुर (ता. दक्षिण सोलापूर ) येथे भूमिगत गटार व सिमेंट रस्ते केले होते. त्या कामाच्या एकूण बिला पैकी २ लाख ५० हजार रुपयाचे बिल काढून देण्यासाठी क्लर्क कवठे याने ५ हजार रुपयाच्या लाचेची मागणी केली होती. त्यावरून पोलिसांनी लाच लुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये क्लर्क कवठे यांच्याविरुद्ध २८ मे २०२५ रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्यात अटक होऊ नये म्हणून कवठे याने न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या सुनावणीच्या वेळेस वकिलांनी मांडलेला युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीशांनी ५० हजार रुपयाच्या जात मुचुलक्यावर जामीन मंजूर केला.

यात सरकारतर्फे ॲड. बागल यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. निशांत लोंढे, ॲड. दत्ता गुंड यांनी काम पाहिले.

# सुवर्णधनच्या 'अमृतकुंभ' विशेषांकांचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

प्रो.डॉ. सुवर्णा गुंड-चव्हाण यांनी संपादित केलेल्या, 'अमृतकुंभ' या सुवर्णधनच्या विशेषांकाचे प्रकाशन जालना येथे कुलगुरू व राष्ट्रीय शिक्षण धोरण सुकाणु समिती अध्यक्ष डॉ. मुरलीधर चांदेकर, डॉ. उपेंद्र कुलकर्णी, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष डॉ.प्रदिप खेडकर, सहमंत्री डॉ. दिनेश खेडकर यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र राज्य प्रांतातून विविध विद्यापीठांमध्ये विविध प्राधिकरणावर कार्य करणारे बहुसंख्य प्रज्ञावंत मंडळी यावेळी उपस्थित होते.



नवीन शैक्षणिक धोरणाचा मुलाधार म्हणजे भारतीय संस्कृती व संत साहित्य आहे हे साधारतेने डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने व्यक्त केले. यासाठी अशा मुलगामी संशोधनाची आज विद्यार्थी व समाजासाठी फार गरज आहे. संत हे मूल्यात्मक जीवनाचा, शिक्षणाचा मुलाधार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा विकास साधला जातो त्यांना नैतिकतेचं, राष्ट्रीयतेचं, मानवतेचं अधिष्ठान द्यायला मदत होते. यांच हेतूने संतांच्या व भारतीय संस्कृतीतील अलक्षित घटना, स्थळ व संतांचे संशोधन केल्याने ते अलौकिक कार्य लोकांच्या समोर सुवर्णधनच्या ,'अमृतकुंभ' मधून येते आहे. असेही नमूद केले.

डॉ. दिनेश खेडकर यांनी 'अमृतकुंभ' मधील अलक्षित संतांचा व सुवर्णधनच्या विशेषांकाचे स्वागत केले व थोडक्यात सार सांगितले. याप्रसंगी संपादिका प्रो. डॉ.सुवर्णा गुंड-चव्हाण यांनी सातत्याने पुर्ण भारतभरातून हे कार्य कठीण परिस्थितीतसुद्धा आठ-नऊ वर्षे झाले कसे चालू ठेवले आहे ते व्यक्त केले.या कार्याची पोचपावती म्हणून स्वदेशी भारत राज्यस्तरीय पुरस्कार, कोमप.गोवा विशेष सन्मानित, मुंबई वृत्तपत्र लेखक संघाचा आवाजकार मधुकर पाटकरांच्या नावे उत्कृष्ट विशेषांक असे सुवर्णधनला पहिल्या अंकापासूनच बहुमानाचे अनेक पुरस्कार मिळाल्याबद्दल सांगितले. तसेच आयोजक असं.भा. रा.शै.म.चे महाराष्ट्र प्रदेश सहमंत्री डॉ .दिलीप अर्जूने यांनी प्रकाशनाचे आयोजन केले. याप्रसंगी एनमुक्ताचे कुलकर्णी, प्राचार्य संवर्गातील विविध विद्यापीठातील विविध प्राधिकरणावरील कार्यरत असलेले बहुसंख्य सन्माननीय प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई, डॉ. चंदू पाखरे, डॉ. गजानन मुंडे, प्राचार्य डॉ. शशिकांत तांबे, डॉ. दिपक ननवरे, महाराष्ट्र प्रांताच्या व विविध विद्यापीठांमधील महिला आघाडी प्रमुखा उपस्थित होत्या. यामध्ये डॉ. मिनल ठाकरे, डॉ. दळवी, डॉ. पौर्णिमा दिवसे उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जिल्हा

## महत्वाचे...



## माढ्यात विनायक पाटील यांना आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान

कुर्डूवाडी, दि. ३ जून-

केळी महासंघ महाराष्ट्र राज्याचे वार्षिक अधिवेशन माढा येथे नुकतेच पार पडले यामध्ये शेती विषयक सकारात्मक बातम्या नेहमी दिल्यामुळे आदर्श कृषिरत्न पत्रकार पुरस्कार कुर्डूवाडी येथील पत्रकार विनायक पाटील यांना खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते नुकताच देण्यात आला. महाराष्ट्र राज्य केळी महासंघ हे महाराष्ट्रातील केळी उत्पादकांच्या उत्पादन तसेच विक्री पर्यंत त्यांना मदत करते . केळी उत्पादका समोरील प्रश्न नवीन संशोधन नवीन खते याविषयी या वार्षिक अधिवेशनात चर्चा होत असते. यावेळी केळी पिका विषयी विविध तज्ञांचे मार्गदर्शन पार पडले. यावेळी रितेश टिटवाल, राजेंद्र हागे यांच्यासह अनेक केळी उत्पादकांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थितांचे स्वागत केळी उत्पादक महासंघाचे अध्यक्ष किरण चव्हाण यांनी केले कार्यक्रमासाठी दादासाहेब साठे अमर पाटील दिनेश जगदाळे सागर शर्मा उमेश पाटील ऊस उत्पादक संघाचे सचिन कोरडे किशोर चौधरी अतुल माने पाटील केळी उत्पादक संघाचे सचिन कोरडे किशोर चौधरी पुरुषोत्तम सरजे महाधन कंपनीचे योगेश म्हसे अपेडाचे विजय बामणे उपस्थित होते.



## गोमातेसाठी अमित क्षीरसागर यांचे कार्य कौतुकास्पद : बिराजदार

सोलापूर, दि. ३ जून-

हत्तूर येथील पशुधनविकास अधिकारी अमित क्षीरसागर यांनी सेवा कालावधीत गोमातेच्या संरक्षणासाठी कौतुकास्पद कार्य आहे. त्यांच्या सेवा कालावधीत परीसरात देशी गोमातांच्या संख्येत वाढ झाली. त्यामुळे इतर पशुधनविकास अधिकारी यांनी त्यांचे आदर्श घेण्याचे आवाहन वडकबाळ येथील श्री कट्टेवादेवी गोशाळेच्या अध्यक्षा उमादेवी बिराजदार यांनी केले. हत्तूर येथील हत्तूर येथील पशुधनविकास अधिकारी अमित क्षीरसागर यांची बदली झाल्यानंतर आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी पशुवैध्यकीय अधिकारी रणजित जाधवर, रूद्रप्पा बिराजदार, चैताली क्षीरसागर , डॉ. प्रकाश ढगे, डॉ. रमेश तडवळकर, डॉ.आनंद रूपनर उपस्थित होते.



## शेलगाव (वा) येथे लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची पुण्यतिथी साजरी

करमाळा दि. ३ जून-

शेलगाव (वा) ता.करमाळा येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रतिमापूजन हरिदास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर पोटे यांनी भूषवले. यावेळी शेलगावचे माजी सरपंच शहाजी बापू पाटील, युवा नेते अनिल केकान, माजी ग्रामपंचायत सदस्य सुधीर साळुंखे, ज्येष्ठ नागरिक भारत शिंदे, शेलगावचे पोलीस पाटील, नवनाथ केकान, भाजपचे नागनाथ केकान व दत्ता पोटे, नागनाथ पोटे, मयूर खाडे, अक्षय केकान, प्रगतशील बागायतदार विठ्ठल केकान, वैभव केकान, देविदास पोटे. देवा पोटे. अमित केकान. सूर्यकांत खाडे. पप्पूदादा उघडे. संजय केकान सर. बाळासाहेब पाटील. बाळू जायभाय. राहुल ठोकळे. संतोष केकान, महेश पोटे, शैलेश केकान, भैय्यासाहेब सानप, संकेत केकान, प्रसाद जायभाय, डॉ. वैभव पाटील, शेखर पोटे उपस्थित होते. यावेळी भाजपा जिल्हा सचिव शासन नियुक्त सदस्य पिक विमा तक्रार निवारण समिती लक्ष्मण केकान यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक अजित केकान यांनी केले तर आभार भैय्यासाहेब सानप यांनी मानले.



## मार्डी ग्रामपंचायतकडून निवृत्ती हजारे, धनंजय नारायणकर कुटुंबियांस मदत

सोलापूर, दि. ३ जून-

मार्डी (ता. उत्तर सोलापूर) येथे अतिवृष्टीमुळे गावातील निवृत्ती हजारे यांच्या घराची भिंत कोसळून घराचे मोठे नुकसान झाले तसेच भिंत कोसळ्यामुळे पती पत्नी तसेच घरातील इतर व्यक्ती जखमी झाल्यामुळे प्राथमिक उपचार करून घेण्यात आला. त्यामुळे संसार उघड्यावर आला त्याचप्रमाणे गावातीलच धनंजय नारायणकर यांच्याही घराची भिंत पडल्यामुळे मोठी हानी झाली याची माहिती ग्रामपंचायतीस मिळताच सरपंच, ग्रामसेवक व सदस्य यांनी भेट देऊन पाहणी केली व सदर पाहणी केलेल्या कुटुंबावर नैसर्गिक आपत्तीमुळे अचानक ओढवलेले संकट व झालेला आर्थिक नुकसान हे न भरून निघणारे आहे. त्यांच्या परिस्थितीचा विचार करून त्यांच्या घरी जाऊन तात्काळ ग्रामपंचायतकडून आर्थिक मदत म्हणून यावेळी निवृत्ती हजारे यांना रुपये १०,०००/- व धनंजय नारायणकर यांना ५,०००/- चा धनादेश देण्यात आला. यावेळी सरपंच प्रांजली गणेश पवार, सदस्या तबस्सूम शेख तसेच काशिनाथ कदम युवराज पवार, गणेश पवार, अझर शेख, नागनाथ भालेराव, अमोल बोराडे, तायप्पा शेंडगे, ग्रामविकास अधिकारी नंदकुमार पाटील, तलाठी दीपक कावले, कृषी अधिकारी भाऊसाहेब शिरसट, बाळू हजारे उपस्थित होते.

# पालखी मार्गावर १४२ अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती

### वारकऱ्यांना सुरळीत पाणीपुरवठ्याची जबाबदारी; यात्रा आषाढीची तयारी जिल्हा परीषदेची

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३ जून-

जिल्हा परिषद सोलापूर ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या वतीने आषाढी यात्रा पालखी मार्गावर वारकऱ्यांना पुरेसा पाणीपुरवठा व काही अडचणी येऊ नये म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी पंढरपूर येथे नियंत्रण कक्ष स्थापन केला. दहा पालखी मार्गावरील टँकर भरण्याच्या १०७ ठिकाणांचा आढावा घेऊन १४२ अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती केली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, उप कार्यकारी अभियंता सुनिल कटकधोंड , प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, रविंद्र करजगी, सर्व उपकार्यकारी अभियंता उपस्थित होते.

- पालखी मार्गावरील एकुण नियुक्त अधिकारी व कर्मचारी - १४२
- टँकर भरण्याचे ठिकाण - १०७
- संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - २९
- संत तुकाराम महाराज मार्गावरील पालखी नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - १२
- संत सोपानकाका महाराज पालखी मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी- ५
- संत गजानन महाराज पालखी महाराज मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - १०
- संत मुक्ताबाई पालखी मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - ८
- संत निवृत्तीनाथ महाराज पालखी मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - ५
- संत एकनाथ महाराज पालखी मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - ४
- संत निळोबाराय महाराज पालखी मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - ५
- संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज पालखी (पंढरपूर तालुक्यात प्रवेश केल्यानंतर) मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - ४७
- चांगावटेश्वर महाराज मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - ६
- कौडण्यपूर विदर्भ पालखी मार्गावरील नियंत्रण अधिकारी व कर्मचारी - ६
- नियंत्रण कक्ष पंढरपूर येथील नियुक्त अधिकारी व कर्मचारी ५

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अक्कलकोट दौऱ्याकडे तालुकावासियांचे लक्ष



तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. ३ जून-

शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दि. ५ जून रोजी अक्कलकोटच्या दौऱ्यावर येत आहेत. काँग्रेस पक्षाचे नेते माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे हे शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असून या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार असून त्यांच्या दौऱ्याकडे अक्कलकोट तालुकावासियांचे लक्ष लागले आहे.

काँग्रेस पक्षाचे नेते माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी काँग्रेस पक्षाला सोडत शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे जाहिर केले .माजी मंत्री म्हेत्रे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सात वेळा भेट घेऊन चर्चा करून शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याने अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे तसेच त्यांचे बंधू काँग्रेस पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे यांच्या पक्षप्रवेश कार्यक्रमाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. माजी मंत्री म्हेत्रे यांचा शिवसेना शिंदे गटात पक्षप्रवेश कार्यक्रम हा मंगरूळ प्रशाले समोरील मैदानावर होणार आहे. या कार्यक्रमाची तयारी सुरू करण्यात आली असून मैदानाची स्वच्छता तसेच भव्य मंडप उभारण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांचे निस्सीम भक्त आहेत. तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीच्या विकासासाठी भरीव निधीची घोषणा करणार का? याकडे अक्कलकोटकरांचे लक्ष लागले आहे. अक्कलकोट येथे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या शिवसेना शिंदे गटात पक्षप्रवेशासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या होणाऱ्या कार्यक्रमाकडे सर्वांच्या नजरा लागले असून या कार्यक्रमाची राजकीय पटलावर चर्चा सुरू आहे.

# वयोवृद्ध महिलेला लुटणाऱ्या दोघांना अटक

### गुन्ह्यात महिलेचा समावेश; ७ लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा,
टेंभुर्णी, दि. ३ जून-

चारचाकी स्विफ्ट गाडीमध्ये महिला प्रवाशांना बसवून निर्जन ठिकाणी नेवून अंगावरील सोने, चांदी व रोख रक्कम लुटणाऱ्या विशाल उर्फ भैय्या बाळासाहेब शिंदे वय-२४ वर्षे रा. वाखरी ता. पंढरपूर २) सुषमा सागर कांबळे वय २५ वर्षे रा. मंगळवेढेकर नगर, पंढरपूर या दोघांचा टेंभुर्णी पोलिसांनी पर्दाफाश करून एका महिलेसह दोन जणांना अटक करून त्यांच्याकडून जिल्ह्यातील चार विविध गुन्ह्याची कबुली देऊन त्यांचेकडून ७ लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

दि. २२ मे रोजी श्रीमती शंकुतला शिवाजी देवकर वय ६५ वर्षे (रा. खांडवी ता. बार्शी) या मुलीला भेटण्यासाठी बार्शी येथून एस टी बसने टेंभुर्णी येथे आले होते तिथून पुढे फ टजवळगावला जाण्यासाठी पायी जात



असताना बेंबळे चौकात आल्यानंतर संशयित आरोपी विशाल उर्फ भैय्या बाळासाहेब शिंदे व सुषमा सागर कांबळे हे दोघे जण स्विफ्ट कार म धून आले करमाळा चौकात जाणारा रस्ता विचारला व तुम्हालाही करमाळा चौकात सोडतो म्हणून गाडीमध्ये बसवले व गाडी अकलूज रोडवरील देवरे याठिकाणी घेऊन गेले व नंतर त्या वयोवृद्ध महिलेला इतरत्र फिरवून तिच्या डोळ्यात चटणी टाकून त्यांचे अंगावरील सोन्याचे गंठण, बोरमाळ, फुलेझुबे, बुगड्या असे ३५ ग्रॅमचे दागिणे हाताने ओरबडून काढून तिला गंभीर जखमी करीत व ५०,०००/- रूपये रोख रक्कम व दोन मोबाईल फोन असा २,०९,५००/- रूपयेचा ऐवज बळजबरीने लुटून नेला होता.हा गुन्हा गंभीर असल्याने पोलिस निरीक्षक नारायण पवार यांनी तपासाची चक्रे फिरवून सीसीटीव्ही फुटेज तपासून त्या गाडीचा नंबर शोधून आरोपींची खात्री करून त्यांच्याकडे चौकशी करून पोलीसही खाक्या दाखवतास त्यांनी त्यांनी टेंभुर्णी प्रमाणेच गादेगांव, वाडीकुरोली (ता. पंढरपूर व माळशिरस) या ठिकाणी ही चोरी केल्याचे कबुली दिली. यानंतर त्यांचेकडून सहा तोळे सोन्यासह ७ लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, करमाळा उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील यांचे मार्गदर्शनाखाली टेंभुर्णी पोलीस ठाणेचे पोलीस निरिक्षक नारायण पवार यांनी कामगीरी केली. यामध्ये डि बी पथकाचे अधिकारी पोसई कुलदिप सोनटक्के, पो.ह.विलास नलवडे, संदिप गिरमकर, अक्षय कांबळे, अक्षय सरडे, मोहन तळेकर, महिला पोलिस शिंदे यांनी कामगीरी बजावली आहे.

## दुचाकीच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू; वेलानी पेट्रोल पंपासमोर घडलेली घटना

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३ जून -

छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या दरम्यान असलेल्या वेलानी पेट्रोल पंपासमोर रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यास दुचाकीने धडक दिल्याने पादचाऱ्याचा मृत्यू झाला.

शिवाजी झंपले (वय ५०, रा. माशाळ नगर, विजापूर रोड, सोलापूर ) असे मरण पावलेल्या पादचाऱ्याचे नाव आहे. याबाबत निखिल शिवाजी झंपले (वय २१, रा. माशाळ नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून सचिन पांडुरंग नाईकनवरे (रा. वीणा रेसीडेन्सी, बाळे, सोलापूर) या दुचाकीस्वाराविरुद्ध फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ मे रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास वेलानी पेट्रोल पंपासमोर शिवाजी झंपले हे पायी चालत रस्ता ओलांडत असताना सचिन नाईकनवरे याने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्र. एमएच ४५ एआर ७७९१ ही छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून भरधाव वेगाने व हयगयीने चालवून शिवाजी झंपले यांना जोराची धडक दिली. त्यात शिवाजी झंपले यांच्या डाव्या पायास गंभीर दुखापत होऊन त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

## आदर्श पब्लिक स्कूलमध्ये प्रवेश प्रक्रिया मदत केंद्राची निर्मिती

तभा वृत्तसेवा,
कुर्डूवाडी, दि. ३ जून-



आदिशक्ती शिक्षण संस्था वेताळवाडी संचलित आदर्श पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, कुर्डूवाडी येथे अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी मदत केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. अकरावी प्रवेश हे केंद्रीय पद्धतीने ऑनलाईन होणार असून यासाठी विद्यार्थी व पालकांची होणारी धावपळ कमी करण्यासाठी आदर्श पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे विद्यार्थी व पालकांच्या सोयीसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे यांनी दिली.

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा सर्व पालक व विद्यार्थी यांनी २० ते २८ जून दरम्यान प्रवेश अर्ज भरण्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे घेऊन येऊन कॉलेज मार्फत मोफत प्रवेश अर्ज भरण्याच्या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे यांनी केले.

# वारी समाज परिवर्तनाची या विषयावर आळंदी येथे अभ्यास वर्गाचे आयोजन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. ३ जून-

श्री क्षेत्र आळंदी मध्ये सकल वारकरी संप्रदायाच्या वतीने 'वारी समाज परिवर्तनाची' या विषयावर अभ्यासवर्ग नुकताच संपन्न झाला. लाखो वारकरी वारीच्या निमित्ताने आळंदी, देहू, सासवड, पैठण, त्र्यंबकेश्वर या स्थानांवरून पंढरपूरकडे प्रस्थान करतात.

प्रबोधन, संस्कार, पर्यावरण, समरसता आणि गोसेवा या पाच विषयांवर जनजागृती आणि विविध उपक्रम करण्याची आवश्यकता यावर अभ्यासवर्गात चिंतन करण्यात आले. आळंदी, देहू, पंढरपूर, त्र्यंबकेश्वर या संस्थानांच्या सहकार्याने हा अभ्यासवर्ग घेण्यात आला. महाराष्ट्रातून १५० पेक्षा जास्त वारकरी कीर्तनकार, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते या वर्गात उपस्थित होते. यावेळी चैतन्य हाराज देगलूरकर यांनी बीजभाषण



केले. परागमहाराज चातुर्मास्ये यांनी वारकरी संतांच्या मूळ विचारांवर होणाऱ्या वैचारिक आक्रमणा म गील पार्श्वभूमी समजून सांगितली. हभप माधवदास महाराज राठी यांनी वारकरी संप्रदायातील सम रसता या विषयावर मार्गदर्शन केले. संजय महाराज पाचपोर यांनी समाज आरती, संस्कार वर्ग यांचे महत्व पटवून दिले तर शिवाजी महाराज मोरे यांनी हरित वारी आणि पर्यावरण उपक्रम या विषयावर मार्गदर्शन केले. समारोपीय सत्रात चिदंबरमहाराज साखरे यांनी पुढील काळात 'वारी समाज परिवर्तनाची ' याची वाटचाल कशी असावी याची दिशा दिली. या अभ्यासवर्गात आळंदी संस्थानचे विश्वस्त योगी निरंजननाथ, देहू संस्थानचे पालखी सोहळा प्रमुख वैभव म हाराज मोरे व संस्थानचे अध्यक्ष जालिंदर मोरे, विश्वस्त विक्रम महाराज मोरे, त्र्यंबकेश्वर संस्थानचे श्रीपाद कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



## मोहोळ-वैराग रस्त्यावर खड्डे; नागरिकांचे जीव धोक्यात

तभा वृत्तसेवा,
मोहोळ, दि. ३ जून-

मोहोळ-वैराग रस्त्यावर मोहोळपासून नरखेडपर्यंत रस्त्यावर मोठे खडे पडलेले आहेत. या खड्ड्यामुळे अनेक लहान मोठ्या अपघाताला आपोआप निमंत्रण मिळत आहे. या खड्ड्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे. तर वाहनांचेही नुकसान होत आहे.

अपघात होऊन एखादी मोठी घटना घडली तर त्याला जबाबदार कोण? सतत लहान मोठे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे.

पावसाळा चालु झाल्याने रस्त्याचे खड्डयात पाणी साठत असल्याने खड्डयाचा रस्त्याचा वाहनधारकांना अंदाज येत नाही. त्यामुळे खडड्यात वाहने आदळून पडून जखमी होण्याचे व वाहनांचे नुकसान होण्याचे प्रमाण वाढले आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ लक्ष घालून खड्डे बुजवावेत, अशी म गणी प्रवासी वाहनधारकांतून होत आहे.

# ग्रामसेवकांनी जिल्हा दुष्काळमुक्तीसाठी प्रयत्न करावे

### सीईओ कुलदीप जंगम; भारतीय जैन संघटनेतर्फे कार्यशाळा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३ जून-

गाळमुक्त धरण गाळ व गाळयुक्त शिवार त्याचबरोबर अनेक उपक्रम अंतर्गत भारतीय जैन संघटनेचे कार्य कौतुकास्पद आहे. शिवाय जनजागृतीच्या कार्यामध्ये भारतीय जैन संघटनेकडे विशेष प्राविण्यता आहे. त्याचबरोबर बुलढाणा जिल्ह्यामध्ये झालेले भारतीय जैन संघटनेचे कार्य मी स्वतः अनुभवले आहे. असे सागून जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी ग्रामसेवकांनी प्रयत्न करण्याचे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

ते भारतीय जैन संघटनेकडून गाळमुक्त धरण अभियानाच्या प्रसारासाठी जिल्हा परिषदेत आयोजित ग्रामसेवकांच्या कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी सीईओ जंगम





बोलत होते. यावेळी भारतीय जैन संघटना राज्याध्यक्ष केतन शहा, जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय पारसे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळा संपन्न झाली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना कायमस्वरूपी राबविण्याचा म हत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या योजनेचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य भारतीय जैन संघटनेने स्वीकारले आहे. जास्तीत जास्त गावांनी या योजनेत सहभाग घ्यावा यासाठी भारतीय जैन संघटना प्रयत्न करणार आहे. या अनुषंगाने योजनेचा प्रचार करण्यासाठी योजनेची माहिती देण्यासाठी अक्कलकोट, दक्षिण व उत्तर सोलापूर या तीन तालुक्यातील १३० ग्रामसेवक यांचे प्रशिक्षण व कार्यशाळा पार पडली. प्रशिक्षणासाठी जिल्हा समन्वयक साक्षांत वाघमारे व विकास शेळके यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भारतीय जैन संघटना पदाधिकारीमधून राज्य सचिवा संतोष भाभी बंब, राज्य कार्यकारिणी सदस्य शाम पाटील, जिल्हा वाटर की पर्सन- विशाल म हता, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभुते, अशोक भालेराव, विक्रांत बसेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक भारतीय जैन संघटना केतन शहा यांनी केले. सूत्रसंचालन राज्य कार्यकारणी सदस्य शाम पाटील यांनी केले तर विशाल मेहता यांनी आभार मानले.

## सिद्धेश्वर म्हेत्रे यांना कृतज्ञता पुरस्कार जाहीर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३ जून-



मंद्रुप येथील राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त विज्ञान शिक्षक सिद्धेश्वर म्हेत्रे यांना श्री जगद्गुरू विश्वाराध्य ज्ञानसिंहासन जंगमवाडी मठ वाराणसी यांच्याकडून विज्ञान विषयात केलेल्या संशोधनामुळे मंद्रुप येथील सिद्धेश्वर म्हेत्रे यांना विठाबाई देवाप्पा पसारकर कृतज्ञता पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. रोख दहा हजार रूपये, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. रविवार २२ जून रोजी लातूर येथे काशीचे जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वाम ीजी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात येणार आहे. सिद्धेश्वर म्हेत्रे यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल हास्य तुषार ग्रुपकडून तसेच विविध क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## एटीएस स्पर्धा परीक्षेत उपळाई (ठो) शाळा नंबर २ चे यश

### ७१ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ३ जून-**

एटीएस स्पर्धा परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठो) येथील विद्यार्थ्यांनी यात यश मिळविले असून २ विद्यार्थी राज्यात, ४ जिल्ह्यात तर ६५ विद्यार्थ्यांनी केंद्रात स्थान मिळविले आहे.

एटीएस परीक्षेत शाळेतील इयत्ता चौथीतील विद्यार्थी सर्वज्ञ वाघ हा राज्यात सहावा तर मल्हार सदावर्ते हा राज्यात सातवा आला आहे. याच वर्गातील ऋषिकेश बरचे हा जिल्ह्यात दुसरा तर अपूर्व जाधव हा जिल्ह्यात ७ वा आला आहे .इयत्ता १ ली तील विद्यार्थीनी स्वरा खोडवे ही जिल्ह्यात चौथी तर इयत्ता २ री तील शिवानी सुरवसे ही जिल्ह्यात चौथी आली आहे. शाळेचे विविध वर्गातील तब्बल ६५ विध्यार्थ्यांनी केंद्रात स्थान मिळविले आहे . विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक आनंद घाडगे, दिपाली गोरे, हरिभाऊ दळवी, रामचंद्र बरचे, प्रभाकर काटे, सुवर्णगौरी गवळी, आप्पासाहेब पिंगळे, श्रीमती सविता जाधव, मीरा गरड, श्रीमती प्रिया गडदे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सरपंच मधुकर वैद्य, उपसरपंच मीनल ठोंगे, माजी सरपंच विजय ठोंगे, माजी उपसरपंच सुंदरराव पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्रीमती सविता भोंग, उपाध्यक्ष श्रीमती योगीता सदावर्ते सर्व सदस्य, गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके, विस्तार अधिकारी धनाजी जाधवर, केंद्रप्रमुख शिवाजी कांदे, मुख्याध्यापक अनिल काळे, भालचंद्र जामदार, जयवंत कदम यांनी अभिनंदन केले.

## महत्वाचे...



### अन्नछत्र मंडळात गुणवंतांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ३ जून -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखाली तालुक्यातील १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी व विविध क्षेत्रात कामगिरी करणाऱ्यांचा श्री स्वामींचा आशिर्वादरुपी सत्कार करून कौतुकाची थाप नेहमीच न्यास देते. याचाच एक भाग नुकत्याच झालेल्या १० वी. परीक्षेत श्री संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रशांत शिंपी (रा. अक्कलकोट) यांची कन्या श्री शहाजी प्रशालेची विद्यार्थीनी स्वामिनी शिंपी हिने ९८.६० टक्के गुण मिळवून अक्कलकोट तालुक्यात प्रथम क्रमांक पटकिवल्याबद्दल सत्कार सोहळा अन्नछत्र मंडळात संपन्न झाला. न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यास गवळी समाजाचे राज्य उपाध्यक्ष श्रीकांत झिपरे, प्रा. प्रशांत शिंपी, रत्नागिरीचे संतोष गार्डी, दिनकर शिंपी हे उपस्थित होते. न्यासाचे मनोज निकम, बाळासाहेब पोळ, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, बाळासाहेब घाटगे, कुमार सलबत्ते, शहाजी यादव, नामा भोसले, पिंटू हळ्ळूरे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, रोहित कदम, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



### किणी येथे होळकर जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. ३ जून-**

किणी तालुका अक्कलकोट येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त पुण्याचे बाळासाहेब व्हनमाने यांच्या हस्ते पूजन करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अक्कलकोट तालुका धनगर समाज संघटनेचे तालुका कोषाध्यक्ष प्रा. शंकर व्हनमाने हे होते. यावेळी प्राचार्य शंकर व्हनमाने यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास शिवाजी बंदीछोडे, परमेश्वर व्हनमाने, बयाजी बंदीछोडे, यल्लाप्पा व्हनमाने, शेखर व्हनमाने, नितीन व्हनमाने, संतोष घोडके, दत्तात्रय घोडके, मळाप्पा व्हनमाने, सुरेश बंदीछोडे, बाबूराव बंदीछोडे, हनमंत व्हनमाने, महेश व्हनमाने, बगलसिद्ध बंदीछोडे, गोटू व्हनमाने, पिंटू व्हनमाने, संजय व्हनमाने, सातपा व्हनमाने, आनंद बंदीछोडे, पिरापा बंदीछोडे उपस्थित होते. सूत्रसंचालन नितीन व्हनमाने यांनी केले तर आभार संतोष घोडके यांनी मानले.



### लहुजी शक्ती सेनेतर्फे तहसीलदारांना निवेदन

**अक्कलकोट, दि. ३ जून-**

लहुजी शक्ती सेना यांच्यावतीने आधार कार्ड अपडेट दुरुस्ती नविन काढणे सेंटर बंद असल्या बाबत निवेदन देऊन चालू करण्याची मागणी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे जिल्हाध्यक्ष नागेश जाधव यांनी केली. याप्रसंगी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे, जिल्हाध्यक्ष नागेश जाधव, पृथ्वीराज, अनिल झंपले नाईकनवरे, तुकाराम पाटोळे, रिजवान शेख, लखन पाटोळे, शंकर हातागळे, शिवाजी वाघमारे, ज्ञानेश्वर कांबळे, सुमीत हजारे, शुभम महापुरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### जाधववाडी सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर, दि. ३ जून-**

माढा तालुक्यातील जाधववाडी येथील ग्रामपंचायत कर्मचारी विठ्ठल मोरे यांना ग्रामपंचायतीने अन्यायकारकपणे कामावरून कमी केले. त्यामुळे वरीष्ठांकडे तक्रार केल्यानंतर त्यांना कामावर रूजू करून घेण्याचे आदेश असताना सरपंच व ग्रामसेवक टाळाटाळ करीत आहेत. म्हणून यांच्याविरोधात १० जूनपासून आंदोलन करणार असल्याचे विठ्ठल मोरे यांनी सांगितले. सरपंच व ग्रामसेवक यांच्या मनमानी कारभारामुळे विठ्ठल मोरे यांना फेब्रुवारी २०२४ मध्ये अन्यायकारक पद्धतीने ग्रामपंचायतच्या मासिक सभेत चुकीच्या पद्धतीने ठराव घेऊन कामावरून कमी करण्यात आले आहे. वरिष्ठ अधिकार्यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये जाधव वाडी ग्रामपंचायत कर्मचारी विठ्ठल मोरे यांना कामावर हजर करून घेण्याचे आदेश दिले आहेत . वरिष्ठ कार्यालयाने दिलेले आदेशाचे पालन सरपंच सदस्य ग्रामसेवक यांनी केले नाहीत. त्यामुळे मोरे यांच्या कुंटुंबाची उपासमार सुरू आहे. म्हणून जाधववाडी ग्रामपंचायतविरोधात आंदोलन करण्यात येणार असल्याचे युनियनचे प्रदेश सरचिटणीस तथा सोलापूर जिल्हाध्यक्ष दिलीप जाधव यांनी निवेदनाद्वारे कळविले आहे. यावेळी जिल्हा सचिव बालाजी पवार, अमोल बोराडे, पांडुरंग खरात, संतोष गायकवाड, तानाजी उडानशिवे आदी उपस्थित होते.

## जेव्हा 'फॉर्च्युनर' बोलते तेव्हा...

### अतुल खुपसेंच्या गाडीवरील मजकुराने अनेकांच्या भुवया उंचावल्या

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. ३ जून-**




पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण सध्या चांगलंच गाजलंय... सासर कडून झालेल्या छळाला कंटाळून पोटच्या लेकराचा विचार न करता या विवाहितेने आत्महत्येला जवळ केलं... लग्नामध्ये लाखोंची फॉर्च्युनर भेट देऊन सुद्धा माहेर कडून आणखी पैशाचा तगादा लावल्यामुळे, आणि सततच्या त्रासाला कंटाळून वैष्णवी ने हे पाऊल उचलले ही मनाला चटका लावणारी बातमी महाराष्ट्रने पाहिली... हगवणे यांच्या क्रूरकर्माचा महाराष्ट्रभर निषेध नोंदविला गेला.

मात्र लग्न वेळी वैष्णवीच्या कुटुंबाकडून घेतलेली फॉर्च्युनर केंद्रबिंदू ठरली असून हगवणे सारख्या नीच कुटुंबामुळे फॉर्च्यूनर बदनाम झाली असल्याचे सांगून अतुल खूपसे यांनी वैष्णवी हगवणे हिला श्रद्धांजली अर्पण करून तिच्या मारेकऱ्यांना कडक शासन झाले पाहिजे अशी मागणी केली.

प्रामुख्याने या घटनाक्रममध्ये फॉर्च्युनर ही गाडी प्रचंड बदनाम झाली. समाज माध्यमावर फॉर्च्यूनर या गाडीबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होऊ लागले. फॉर्च्युनर गाडी असणाऱ्या लोकांना त्यांचे मित्र मंडळी टिंगल टवाळी करू लागले. नेते, गाडी तुम्ही घेतली आहे की सासऱ्याकडून भांडून घेतली...? ज्या पद्धतीने वैष्णवीला त्रास झाला, तसा त्रास वगैरे वहिनींना देत नाही ना...? अशी विचारणा होऊ लागली. त्यामुळे जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष, शेतकरी चळवळीचे नेते अतुल खूपसे पाटील यांनी त्यांच्या फॉर्च्युनर गाडीवर हगवणे कुटुंबीयाला टार्गेट करत वेगवेगळी वाक्य लिहिली आहेत. यामध्ये तशी तर मी मोठ्या घरची राणी- मात्र मला बदनाम केलं हगवणे यांनी... मी फॉर्च्युनर माझा रुबाबच वेगळा, पण हगवणे यांच्यामुळे नाव ठेवू लागलाय गाव सगळा.. अतुल भाऊंनी मला रोखीत विकत घेतलंय- पण हगवणे मुळे लोकांनी मला धु धु धुतलंय... अशा प्रकारची वाक्य गाडीवर टाकून त्यांनी हगवणे कुटुंबीयांचा बाजार उठविला असून सोशल मीडियावर गाडीचा हा फोटो आणि व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे.

**हगवणे कुटुंबीयांना कठोर शासन झाले पाहिजे**

खरंतर मुलगी एखाद्या गरीब शेतकऱ्याच्या घरी द्या. त्याला एखादी गाई म्हैस घेऊन द्या. तो तुमची आयुष्यभर जाणीव ठेवेल. मात्र मुलगी मोठ्या घरी जाते ही कल्पना मुळात चांगलीच. मात्र समाजातून टाकून दिलेल्या अवलादी त्यांना कितीही कमीच पडते. याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे हगवणे कुटुंब. वैष्णवी ताई वर जो अन्याय झाला आहे, असा अन्याय माझ्या स्वतंत्र भारतातील एकाही मुलीवर पहिला नको. तिच्या मारेकऱ्यांना कठोर शासन झाले तरच तिला श्रद्धांजली ठरेल.

**- अतुल खूपसे-पाटील**
**जनशक्ती संघटना, महाराष्ट्र राज्य**

## माळशिरस ग्रामीण रुग्णालयात १० पदे रिक्त

### ५ वर्षांपासून प्रयोगशाळा तंत्रज्ञ पद रिक्त

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ३ जून-**

येथील ग्रामीण रुग्णालयात २८ पैकी १० पदे रिक्त असून प्रयोगशाळा तंत्रज्ञ हे अत्यावशक असणार पद गेल्या पाच वर्षांपासून रिक्त असल्याने रुग्णाचा तपासणी अहवाल तात्काळ उपलब्ध होत नाही .त्यामुळे रोगाचे निदान होऊन उपचार करण्यास विलंब होत असल्याने रुग्णाला धोका होण्याची शक्यता असल्याने पदे तात्काळ भरवित, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

माळशिरस ग्रामीण रुग्णालयात प्रत्येक महिन्यात चार ते पाच हजार रुग्णाची तपासणी केली जाते. गेल्या आठ दिवसांपासून तालुक्याच्या विविध भागात कोविड रुग्ण आढळून येत आहेत. येत्या महिनाभरात श्री संत ज्ञानेश्वर व श्रीसंत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा तालुक्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर तालूक्यातील आरोग्य विभाग सतर्क व सर्व उपचार करण्यासाठी सक्षम असणे अत्यावशक आहे.या ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक एक्स रे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रयोगशाळा सहाय्यक, परिचारिका ७ पदे,डेंटल,हि पदे रिक्त आहेत वैद्यकीय अधिकारी पदे कंत्राटी पद्धतीने भरली आहेत. विशेष तज्ञ वैद्यकीय अधिकारी नाहीत. तालुक्यातील दोन्ही पालखी मार्गासह टेंभुर्णी-सातारा हा महामार्ग झाला असून रस्ते चांगले असून रस्त्याच्या अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे .यासाठी तालुक्यात महिला व शिशु हॉस्पिटल, १०० बेडचे रुग्णालय, ट्रामा सेंटर होणे अत्यावशक आहे. कोविडच्या पार्श्वभूमीवर या ठिकाणी असलेला ऑक्सिजन प्लांन्ट तयार ठेवण्यात आला असून त्याची चाचणीही घेण्यात आली.






**कोविडसाठी तयार ठेवण्यात आलेला ऑक्सीजन प्लांट. तर दुसऱ्या छायाचित्रात कोविड व पालखीच्या पार्श्वभूमीवर पाच आयसीओ बेड तयार ठेवण्यात आले.**

तालुक्यात कोविड रुग्णात वाढ होत असून त्या पार्श्वभूमीवर व पालखी सोहळ्यासाठी ५ आयसीयू बेड व ३० इतर बेड तयार ठेवण्यात आले आहेत.कोविड रुग्ण व पालखी सोहळा यासाठी ९२ प्रकारची औषधाची मागणी करण्यात आलीआहे.त्याच बरोबर रिक्त कर्मचाऱ्याच्या पूर्ततेसाठी सतत पाठपुरावा करीत आहोत.

**- डॉ. मुकुंद जामदार, प्रभारी वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय माळशिरस**



## हैद्रा-आवाटी बस सेवा पुन्हा सुरु करा

### मुस्लीम बिरादर जमातची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३ जून-**

बार्शी आगारातून पूर्वी सुरु असलेली हैद्रा ते आवाटी बस सेवा काही काळापासून बंद करण्यात आली आहे. ही बससेवा पुन्हा सुरु करावी, अशी मागणी मुस्लीम बिरादर जमात संस्था बार्शी शहर व तालुका यांच्यावतीने करण्यात आली आहे. यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी बार्शी आगार व्यवस्थापक जाधवर यांना निवेदन दिले.

या मार्गावरील बससेवा बंद करण्यामागे अधिकृत कारण स्पष्ट नाही. मात्र, प्रवाशांची सतत व नियमित वर्दळ असूनही सेवा थांबवण्यात आली आहे.

आवाटी येथे विविध सुफी संतांचे धार्मिक स्थळ आहे. तसेच अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराजांचे प्रसिद्ध मंदिर आहे. बार्शी, परांडा, सोलापूर, अक्कलकोट परिसरातील हिंदू व मुस्लीम भाविक मोठ्या संख्येने या मार्गावर प्रवास करतात. सर्वधर्मीय भाविकांच्या सुविधेसाठी ही सेवा पुन्हा सुरु करावी, अशी मागणी करत मुस्लीम बिरादर जमात संस्था बार्शी शहर व तालुका यांच्यावतीने अधिकृत निवेदन आगार व्यवस्थापक जाधवर यांच्याकडे देण्यात आले आहे.

## पिलीव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत अनेक विषयांवर चर्चा

**पिलीव, दि. ३ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील ग्रामपंचायतीची ग्रामसभा विस्तार अधिकारी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली.

यामध्ये पिलीव येथील नागरिकांनी आपणाकडे असणारी घरपट्टी व पाणीपट्टी जमा करावी. बालविवाह रोखणयासाठी समाज प्रबोधन करुन बालविवाहला प्रतिबंधक करावा, पंतप्रधान आवास घरकुल योजनेची माहीती द्यावी. इच्छुक लाभार्थी यांनी ॲपवर नोंदणी करुन घरकुलाचा लाभ घ्यावा. यावेळी पहलगाम हल्ल्यात अतिरेक्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप नागरीकांना श्रद्धांजली अर्पण करुन ग्रामसभेला सुरुवात करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी विलास बाबर यांनी ग्रामसभेतील विषयांचे वाचन केले. यावेळी ग्रामस्थांनी म्हसवड-पंढरपूर महामार्गावरील बचेरी चौकातील व रोडवरील पुलांचे रखडलेल्या कामे पुर्ण करणयाची मागणी केली. पिलीव येथील स्मशानभूमीचा विषय मार्गी लावावा. घोरपडेवस्ती येथील अंगणवाडीला जागा उपलब्ध करुन द्यावी. गावाला जोडणारे रस्ते व पाणंद रस्ते करावेत. नव्याने मिळालेल्या रेशनकार्ड धारकांना रेशन मिळावे यासह या ग्रामसभेत अनेक विषयावर चर्चा झाली.

## फलटण-पंढरपूर, जेऊर-चौंडी-आष्टी रेल्वे प्रकल्पासाठी निवेदन

### खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ जून-**



माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात भेट घेऊन फलटण-पंढरपूर आणि जेऊर-चौंडी-आष्टी रेल्वे प्रकल्पांसाठी राज्य शासनाने ५० टक्के हिस्सा भरण्यास मंजूरी देण्याबाबत निवेदन सादर केले.

सदरचे प्रकल्प हे केंद्र सरकार व राज्य सरकारच्या संयुक्त कंपनीने करणेचे ठरले होते. त्याप्रमाणे सदरच्या दोन्ही प्रकल्पासाठी राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा केंद्र सरकारला देणेबाबत तात्काळ मंजूरी देण्यात यावी ही विनंती केली जेणेकरुन सदरचे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होतील व याचा लाभ नागरिकांना होईल असे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन देत विनंती केली आहे. फलटण-पंढरपूर हा रेल्वे मार्गासाठीचे भूसंपादन अधिग्रहण सन १९२० साली झाले आहे. सदर प्रकल्पाचा विजयदादा खासदार असताना त्यांनी तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांच्याकडे पाठपुरावा केला होता, त्यांच्या प्रयत्नातुन सन २०१७ च्या रेल्वे अर्थसंकल्पामध्ये ११४९ कोटी रुपयास मान्यता देण्यात आली असून सदरच्या प्रकल्पासाठी सन २०१७ साली रेल्वे अर्थसंकल्पामध्ये १० कोटी रुपयाची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

जेऊर-चोंडी-आष्टी हा रेल्वे मार्ग प्रकल्पास सन २०१७ च्या रेल्वे अर्थसंकल्पामध्ये १५६० कोटी रुपयास मान्यता देण्यात आली या प्रकल्पासाठी देखील २०१७ च्या रेल्वे अर्थसंकल्पामध्ये १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी फलटण लोणंद रेल्वे मार्गाचे पूर्णत्वाबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरवा केला याचेच फलित म्हणून भूसंपादनच्या सर्वेक्षणास देखील २.१० कोटी रू देखील मंजूर झाले आहे. आता फक्त राज्य शासनाचे ५० टक्के हिस्सा भरून प्रकल्पाचे काम सुरू करून पूर्णत्वास घेऊन जाणे गरजेचे अशी नागरिकांकडून मागणी होत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या निवेदनाची दखल घेत प्रकल्पांच्या प्रगतीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

## जिल्ह्याला मिळणार 100 समुदाय आरोग्य अधिकारी

### आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचा निर्णय

### समुपदेशनाने होणार आरोग्य अधिकाऱ्यांची विनंती बदली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ जून-**



राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्यात विविध प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकारी यांची सेवाकाळात एक वेळची बाब म्हणून बदली करण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्याबाबतचा शासन निर्णय नुकताच पारित करण्यात आला आहे. २३ ते २५ जून समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या आंतरजिल्हा व जिल्हा अंतर्गत विनंती बदल्या करण्यात येणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नेमणूक झालेले समुदाय आरोग्य अधिकारी कार्यरत आहेत. गेली काही वर्ष समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या विविध संघटनांकडून विनंती बदली करण्याची सातत्याने मागणी करण्यात येत होती. तृतीय स्तरीय आरोग्य व्यवस्था बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने एक वेळची बाब म्हणून माननीय मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक निर्णय घेत सेवाकालातील एक वेळची बाब म्हणून राज्यातील समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची बदली धोरणास मान्यता दिली आहे.

सध्या वेगवेगळ्यात जिल्ह्यात कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना आपल्या पसंतीच्या जिल्ह्यात बदलीसाठी विनंती करता येणार आहे. सदर आंतरजिल्हा बदली संचालक-१ आरोग्य सेवा, मुंबई यांच्या स्तरावर करण्यात येणार आहे. आंतरजिल्हा बदली करीता इच्छुक समुदाय आरोग्य अधिकारी यांचेकडून १२ जून पर्यंत अर्ज मागविण्यात येणार असून प्राप्त अर्जांची छाननी १३ जून ते १९ जून पर्यंत होणार आहे. बदली पात्र समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची यादी २० जून रोजी आरोग्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. २३ ते २५ जून या कालावधीत विनंती बदली संदर्भाने समुपदेशन आयोजित करण्यात येणार आहे. समुपदेशनानंतर बदली करण्यात आलेल्या समुदाय अधिकाऱ्यांना ७ जुलै पर्यंत रुजू होण्यासाठी मुदत देण्यात येणार आहे. जिल्हा अंतर्गत बदली करणेकरीता शासनामार्फत सक्षम प्राधिकारी म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच आवश्यकतेनुसार बदली प्रक्रिये संदर्भाने समिती स्थापन करणेबाबतच्या सूचना जिल्ह्यांना दिले आहेत.

**आरोग्य यंत्रण बळकट होणार**

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतलेल्या समुदाय आरोग्य अधिकार्यांच्या बदली प्रक्रियेत इतर जिल्ह्यातून ७० ते ८० अधिकारी येण्यास विनंती केली आहे. शिवाय समुपदेशनाने ही संख्या १०० वर जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा बळकट होऊन लोकाभिमुख सेवा मिळण्यास मदत होणार आहे.